CMYK




सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

लातूर | बुधवार, ११ फेब्रुवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३४२ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# ओम बिर्ला यांच्याविरुद्ध लोकसभेत अविश्वास प्रस्ताव

## विरोधकांनी लोकसभा महासचिवांकडे केला सादर

◆ **नवी दिल्ली, १० फेब्रुवारी**

काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी मंगळवारी लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्याविरुद्धचा अविश्वास प्रस्ताव लोकसभा महासचिवांकडे सादर केला.



या अविश्वास प्रस्तावाची सूचना सादर झाल्यानंतर ओम बिर्ला यांनी सभागृहाच्या कामकाजापासून स्वतःला दूर ठेवले आणि आपल्याविरुद्धच्या या अविश्वास प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करावी, असा निर्देश लोकसभा सचिवालयाला दिला आहे.

नियम ९४-सी अंतर्गत आम्ही लोकसभा सभापती ओम बिर्ला यांच्याविरुद्धचा अविश्वास प्रस्ताव लोकसभा महासचिवांना सादर केला, असे काँग्रेसचे नेते गौरव गोगोई यांनी सांगितले. या



प्रस्तावावर काँग्रेससह द्रमुक, समाजवादी पक्ष आणि अन्य विरोधी पक्षांच्या ११८ खासदारांच्या स्वाक्षऱ्या आहेत. महत्त्वाचे म्हणजे, तृणमूल काँग्रेसच्या सदस्यांनी या प्रस्तावावर स्वाक्षऱ्या केल्या नाहीत.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची या प्रस्तावावर स्वाक्षरी नाही. संसदीय प्रथा आणि परंपरेनुसार लोकसभा अध्यक्षांविरुद्धच्या अविश्वास प्रस्तावावर विरोधी पक्षनेते स्वाक्षरी करीत नाही. त्यामुळे या प्रस्तावावर राहुल गांधी यांनी स्वाक्षरी केली नाही.

पक्षाच्या निर्देशाप्रमाणे या अविश्वास प्रस्तावाला माझा पठिंबा असल्याचा दावा काँग्रेसचे नेते शशी थरूर यांनी केला.

ओम बिर्ला यांची सभागृहातील वागणूक भेदभावाची आणि पक्षपाती असल्याचा आरोप करीत विरोधी पक्षांनी त्यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्तावाची सूचना दिली आहे. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना बोलू दिले नाही, काँग्रेसच्या आठ सदस्यांना निलंबित केले तसेच भाजपाचे निशिकांत दुबे यांच्यावर बिर्ला यांनी कारवाई केली नाही, असा काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांचा आरोप आहे.

अविश्वास प्रस्ताव नियमाला धरून असेल तर, सामान्यपणे १४ दिवसानंतर तो सभागृहात चर्चेसाठी ठेवला जातो. लोकसभेत रालोआचे बहुमत असल्यामुळे हा प्रस्ताव पारित होण्याची कोणतीही शक्यता नाही. ◀(तभा वृत्तसेवा)

### 'तो'पर्यंत लोकसभेत जाणार नाही

»» विरोधी पक्षांनी अविश्वास प्रस्तावाची सूचना दिल्यामुळे या अविश्वास प्रस्तावावर निर्णय होत नाही, तोपर्यंत लोकसभेत न जाण्याचा निर्णय लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी घेतला असल्याचे समजते. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यातील कामकाज १३ फेब्रुवारीला संपत आहे. ९ मार्चपासून दुसऱ्या टप्प्यातील अधिवेशन सुरू होणार आहे. त्यामुळे अविश्वास प्रस्तावावर ९ मार्च रोजी लोकसभेत चर्चा होण्याची शक्यता आहे. ■

अजितदादांच्या अपघाताचा तातडीने छडा लावावा : रोहित पवार ▶ वृत्त पान ३

# उबाठाची साथ; चंद्रपुरात भाजपाचा महापौर

## धानोरकर-वडेट्टीवार वादाचा काँग्रेसला फटका

◆ **चंद्रपूर, १० फेब्रुवारी**

काँग्रेसच्या खा. प्रतिभा धानोरकर व आ. विजय वडेट्टीवार यांच्यातील भांडण, वडेट्टीवार यांच्यासोबत उबाठाची फिस्कटलेली 'बोलणी' आणि भाजपाने उबाठाला दुसऱ्या फेरीत महापौरपदाची दिलेली 'ऑफर' यामुळे चंद्रपुरात नवे राजकीय समीकरण आकारास आले आणि भाजपाच्या संगीता खांडेकर यांची चंद्रपूरच्या महापौरपदी, तर प्रशांत दानव यांची उपमहापौरपदी निवड झाली.

महापौरपद निवडणुकीत खांडेकर यांना ३२ मते, तर प्रतिस्पर्धी काँग्रेसच्या उमदेवार वैशाली महाडोळे यांना ३१ मते मिळाली. एका मताने खांडेकर विजयी झाल्या. उपमहापौरपदी प्रशांत दानव आणि जनविकास सेनेचे पप्पू देशमुख या दोघांनाही प्रत्येकी ३२ मते मिळाल्याने शेवटी ईश्वरचिठ्ठीने दानव विजयी झाले. मनपात सर्वांत मोठा पक्ष असलेल्या काँग्रेसला प्रतिभा धानोरकर व विजय वडेट्टीवार यांच्यातील पराकोटीच्या भांडणामुळे सत्ता हस्तगत करता आली नाही. एआयएमआयएमचे एकमेव सदस्य अजरूद्दीन शेख यांनी केवळ उपमहापौरपदासाठी मतदान केले, तर वंचित बहुजन आघाडीचे लता साव व लहू मरस्कोल्हे यांनी निवडणूक प्रक्रियेत भागच घेतला नाही.



निवडणुकीनंतर विजयी मुद्रेत महापौर संगीता खांडेकर, उपमहापौर प्रशांत दानव, आमदार किशोर जोरगेवार, आमदार देवराव भांगळे आदी मान्यवर

कोणत्याही परिस्थितीत भाजपाला सत्तेपासून दूर ठेवा, असा आदेश उद्धव ठाकरे यांनी दिल्याचे ठामपणे सांगणारे संजय राऊत तोंडघशी पडले. कारण, चंद्रपुरात उबाठाच्या नगरसेवकांनी भाजपाशी हातमिळवणी केली. या युतीने काँग्रेस पक्ष मात्र सत्तेबाहेर राहिला. ◀(तभा वृत्तसेवा)

## विचारपुष्प



'एकात्म मानवदर्शन'चे प्रणेते, भारतीय संस्कृतीचे गाढे अभ्यासक पं. दीनदयाल उपाध्याय यांची आज पुण्यतिथी.

मनुष्य हा केवळ एक 'आर्थिक प्राणी' नसून तो शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा यांचा समुच्चय आहे. जसा प्रत्येक व्यक्तीला आत्मा असतो, तसाच प्रत्येक राष्ट्राचाही एक 'आत्मा' असतो, ज्याला 'चिती' (राष्ट्रीय चेतना) म्हणतात. भारताची ही 'चिती' त्याच्या गावांमध्ये आणि संस्कृतीमध्ये वसलेली आहे.

**- पं. दीनदयाल उपाध्याय**
पूर्व अध्यक्ष भारतीय जनसंघ

## महत्त्वाचे

### टीना अंबानींना नवीन समन्स जारी करणार ईडी

**नवी दिल्ली** : अंमलबजावणी संचालनालय (ईडी) लवकरच रिलायन्स ग्रुपचे अध्यक्ष अनिल अंबानी यांच्या पत्नी टीना अंबानी यांना नवीन समन्स जारी करेल. अधिकाऱ्यांनी मंगळवारी सांगितले की, मनी लॉन्ड्रिंगच्या एका प्रकरणात चौकशीसाठी त्यांना पुन्हा बोलावले जाईल. ६८ वर्षीय माजी अभिनेत्री टीना अंबानी यांना ९ फेब्रुवारी रोजी तपास यंत्रणेसमोर हजर राहायचे होते, पण त्या पोहोचल्या नाहीत. अधिकाऱ्यांनुसार, आता त्यांना लवकरच पुन्हा बोलावले जाईल.

# मणिपूरच्या उखरूलमध्ये हिंसाचार उफाळला

**इम्फाळ** : मणिपूरच्या उखरूल जिल्ह्यात तंगखुल नागा समुदायाच्या सदस्यावर लितान सारीखोंग गावात झालेल्या कथित हल्ल्यानंतर प्रतिबंधित संघटनेच्या बंडखोरांनी जिल्ह्यातील विविध भागांत हैदोस घातला. सोवारी रात्री हल्लेखोरांनी गावातील ३० घरांना आग लावली. जिल्ह्यातील विविध भागांत वाहनांची तोडफोड आणि जाळपोळीच्या घटनेनंतर प्रशासनाने संचारबंदी लागू करीत, इंटरनेट सेवा पाच दिवसांसाठी बंद केली.

उखरूल शहर आणि ग्रामीण भागात पोलिस आणि सुरक्षा दलाचे अतिरिक्त पथके तैनात करण्यात आली. हिंसाचारानंतर महाम ार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. सुरक्षा दल आणि हल्लेखोरां ध्ये झालेल्या संघर्षानंतर गोळीबार झाला. यात जखमी आणि मृतकांची आकडेवारी समोर आली नाही, अशी माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली.

# आयकर नियमांमध्ये मोठे बदल होणार

**नवी दिल्ली** : सर्वसामान्य करदात्यांना दिलासा देत केंद्र सरकारने आयकर नियमांध्ये आमूलाग्र बदल करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

१ एप्रिल २०२६ पासून लागू होणाऱ्या नव्या नियम ांनुसार, बँकां धील रोख व्यवहार, घर-गाडीची खरेदी आणि हॉटेलमधील बिलांसाठी 'पॅन कार्ड' अनिवार्य करण्याची मर्यादा वाढविण्यात आली आहे. घरभाडे भत्ता सवलतीसाठी आता पुणे आणि बंगळुरूसारख्या शहरांचाही 'मेट्रो सिटी'मध्ये समावेश करण्यात आला आहे. मसुद्यानुसार एका आर्थिक वर्षात एखाद्या व्यक्तीच्या एक किंवा अधिक खात्यां धून एकूण १० लाख रुपयांपेक्षा जास्त रोख ठेवी किंवा पैसे काढताना 'पॅन' अनिवार्य राहील. सध्या एका दिवसात ५० हजार रुपयांपेक्षा जास्त रोख ठेवीसाठी 'पॅन' आवश्यक आहे.






# निवडणुका संपल्या आता बॅक टू वर्क प्रशासनासमोर कामाचा डोंगर

- विकास प्रकल्प, तक्रारींच्या निपटाऱ्याचे मोठे आव्हान
- मार्चअखेर निधी खर्चाची मर्यादा, निधी परत जाण्याचा धोका टाळणे

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.१० फेब्रुवारी-**

गेल्या जवळपास शंभर दिवसांपासून सोलापूर जिल्ह्यात सुरु असलेली निवडणूक प्रक्रियेची धामधूम अखेर संपुष्टात आली असून, आता जिल्हा महसूल व प्रशासकीय यंत्रणेसमोर नियमित कामकाजाचा खोळंबा भरुन काढण्यासह विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या प्रकल्पांना गती देण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. निवडणुकीमुळे ठप्प झालेली प्रशासकीय घडी पुन्हा रुळावर आणण्यासाठी प्रशासनाला वेगाने आणि नियोजनबध्द पावले टाकावी लागणार आहेत.

गेल्या आठ ते नऊ वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थात प्रशासकराज नंतर महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती येथे सदस्यांचे आगमन झाल्याने, कामांचा आराखडा तयार करावा लागणार आहे. ओबीसी आरक्षणाचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने सन २०२२ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मुदती संपूनही निवडणुका होऊ शकल्या नव्हत्या. न्यायालयाच्या निकालानंतर निवडणूक प्रक्रिया सुरु झाली. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात नगरपालिकांसाठी मतदान झाले. जानेवारी महिन्यात सोलापूर महानगरपालिकेची निवडणूक पार पडली. त्यानंतर लगेचच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका झाल्या. या सलग निवडणुकांमुळे जिल्ह्यातील बहुतांश अधिकारी व कर्मचारी पूर्णपणे निवडणूक कामात व्यस्त होते.

या कालावधीत प्रशासनाचे नियमित कामकाज जवळपास ठप्प झाले होते. नागरिकांच्या तक्रारी, विकास प्रकल्पांवरील बैठका, निधी वितरण यांसारखी महत्त्वाची कामे प्रलंबित राहिली. आचारसंहितेमुळे प्रशासकीय निर्णय घेण्यावर मर्यादा आल्या होत्या. आता आचारसंहिता संपुष्टात आल्याने प्रशासनासमोर प्रलंबित कामांचा मोठा ढिगारा उभा राहिला आहे. जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले अनेक प्रकल्प निवडणुकीमुळे रखडले. होटगी येथे प्रस्तावित



असलेला आयटी पार्क, तसेच पंढरपूर येथे कॉरिडॉरच्या माध्यमातून होणारा विकास प्रकल्प यामध्ये भूसंपादनाची प्रक्रिया महत्त्वाची आहे. मात्र, आचारसंहितेमुळे या प्रकल्पांबाबत निर्णय घेणे शक्य झाले नव्हते. आता निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्याने प्रकल्पांवर प्रशासकीय बैठका घेण्याचा मार्ग मोकळा झाला असून, त्यांना गती देण्याची अपेक्षा आहे.

**औद्योगिक विकास, कॉरिडॉर :** होटगी येथे प्रस्तावित असलेला आयटी पार्क हा जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी महत्त्वाचा प्रकल्प आहे. पंढरपूर येथे कॉरिडॉरच्या माध्यमातून विकास करण्याचा प्रस्ताव असून, त्यासाठी मोठ्या प्रमाणावर भूसंपादन आवश्यक आहे. मात्र, आचारसंहितेमुळे या प्रकल्पांवर निर्णय प्रक्रिया थांबली होती.

**पिकांचे मोठे नुकसान :** गेल्या वर्षी मे ते ऑक्टोबर या कालावधीत अतिवृष्टी आणि महापुरामुळे जिल्ह्यातील शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र, आचारसंहिता आणि प्रशासकीय व्यस्ततेमुळे जिल्हा नियोजन समितीची बैठक जुलै महिन्यापासून झालेली नाही. परिणामी विकास निधीचा वापर रखडला आहे.

दुसरीकडे, गेल्या वर्षी मे ते ऑक्टोबर या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी आणि महापुरामुळे सोलापूर जिल्ह्यातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. मात्र, आचारसंहिता आणि अन्य कारणांमुळे जिल्हा नियोजन समितीची बैठक जुलै महिन्यापासून झालेली नाही. त्यामुळे विकास निधीचा वापर रखडला आहे. आता मार्चअखेरपर्यंत जिल्हा नियोजन समितीचा निधी खर्च करण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर आहे. त्यासाठी तातडीने निविदा प्रक्रिया पूर्ण करून कामांना सुरुवात करावी लागणार आहे. निवडणुकीच्या काळात अनेक अधिकारी व कर्मचारी नियुक्त टेबलवर उपलब्ध नसल्याने नागरिकांना प्रशासनाशी संपर्क साधणे अवघड झाले होते. विविध विभागांमध्ये दाखल झालेल्या तक्रारींचा निपटारा प्रलंबित राहिला आहे. आता निवडणुकीचे काम संपल्यानंतर नागरिकांकडून आलेल्या तक्रारी, अर्ज आणि मागण्यांचा वेगाने निपटारा करणे ही प्रशासनाची प्रमुख जबाबदारी ठरणार आहे.एकीकडे विकास प्रकल्पांना गती देणे, दुसरीकडे निधी खर्चाची वेळेत पूर्तता करणे आणि तिसरीकडे नागरिकांच्या तक्रारींना न्याय देणे, अशी त्रिसूत्री जबाबदारी जिल्हा महसूल प्रशासनावर येऊन ठेपली आहे.

# शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी ऐनवेळी बदलली ‘कॅटेगरी’

- माजी महापौर आरिफ शेख यांचा आरोप
- माजी आमदार विश्वनाथ चाकोतेंनी केली राजीनाम्याची मागणी
- पक्षातंर्गत वादावर दैनिक तरुण भारतने टाकला होता प्रकाशझोत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १५ मधील ‘क’ आणि ‘ड’ अशा दोन ‘कॅटेगरी’तून मी आणि काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी उमेदवारी अर्ज भरले होते. परंतु चेतन नरोटे यांनी ऐनवेळी ‘कॅटेगरी’ बदलली, असा आरोप माजी महापौर आरिफ शेख यांनी पत्रपरिषदेत केला. काँग्रेस पक्षातंर्गत सुरु असलेल्या वादावर दैनिक सोलापूर तरुण भारतने दि.९ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या अंकात प्रकाशझोत टाकला होता.







काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी ‘भाजपा’चे उमेदवार विनोद भोसले यांच्याशी हातमिळवणी करुन प्रभाग क्रमांक १५ मध्ये क्रॉस व्होटिंग करुन घेतले. महापालिका निवडणुकीत काँग्रेस व मित्रपक्षांच्या उमेदवारांच्या पराभवास नरोटे हेच कारणीभूत आहेत. काँग्रेस पक्षाच्या पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारुन शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी माजी महापौर आरिफ शेख व माजी आमदार विश्वनाथ चाकोते यांनी यावेळी केली.चेतन नरोटे यांच्याकडे प्रभाग क्र.१५-क व १५-ड चे काँग्रेस पक्षाचे एबी फॉर्म होते. ऐन छाननीच्या वेळेस त्यांच्या गल्लीत राहणारे, भाजपाचे उमेदवार विनोद भोसले यांच्या विरोधात प्रभाग क्र.१५-क चे बी फॉर्म दिले व स्वतः नरोटे यांनी प्रभाग क्र.१५-ड मधून भाजपाचे उमेदवार बाबा करगुळे यांच्या विरोधात बी बी फॉर्म दाखल केले. पक्षाचा एबी फॉर्म देण्यास उशीर केला व काही अडचणी निर्माण होऊ नये म्हणून चेतन नरोटे यांनी ४ ते ५ वकिलांची नेमणूक केली होती.

प्रभाग क्रमांक १५ मधून ते स्वतः उमेदवार असल्याने त्यांच्याकडील शहराध्यक्षपद अन्य व्यक्तींकडे सोपविणे अपेक्षित होते. निवडणुकीत होम टू होम प्रचाराच्या वेळी त्यांचे नातेवाईक व कार्यकर्ते त्यांच्या समाजाची नांवे व मोबाईल नंबरची नोंदणी करीत होते. परंतु मुस्लिम, दलित व ख्रिश्चन समाजाच्या व्यक्तींची कोणतीही माहिती घेत नव्हते. याचा कारण म्हणजेच माझ्यामुळे त्यांना सर्व मते मिळतील याची त्यांना खात्री होती, असा आरोपही माजी महपौर आरिफ शेख यांनी केला.

पाडापाडीचे राजकारण करण्याची परंपरा ही चेतन नरोटे यांची पूर्वीपासूनच आहे. त्यांनी यापूर्वी काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष कै.धर्मा भोसले व हेमा चिंचोळकर यांना देखील पाडण्याचे काम केलेले आहे. शहराध्यक्ष या नात्याने सर्व उमेदवारांना निवडून आणण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. परंतु त्यांनी फक्त आपल्याकरीता ही निवडणूक असल्याचे दाखवून काँग्रेस कमिटीला वाऱ्यावर सोडले, असे सांगायलाही विश्वनाथ चाकोते व आरिफ शेख विसरले नाहीत.



सोलापूर : शहरातील फुटपाथवरील अतिक्रमणाची कारवाई सुरु होताच व्यापारी आपले साहित्य गोळा करत पळ काढला.

# शिवजयंतीनिमित्त मंगळवेढ्यात आजपासून कार्यक्रम

**भव्य मिरवणूक आणि भरगच्च कार्यक्रमांनी सजणार सुवर्ण महोत्सवी शिवजयंती**

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. १० फेब्रुवारी**

मंगळवेढा येथील सार्वजनिक शिवजयंती उत्सव मंडळाच्या वतीने शिवजन्मोत्सव सोहळ्याचे सुवर्ण महोत्सवी ५० वे वर्ष विविध सांस्कृतिक कार्यक्रम व सामाजिक उपक्रमातून साजरा होणार आहे. ११ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत शिवप्रेमी चौकातील शिवतीर्थावर होणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील कलाकारांची उपस्थिती राहणार असल्याचे स्वागताध्यक्ष आ. समाधान आवताडे यांनी सांगितले.

**कार्यक्रम असे : ११ फेब्रुवारी :** सायं ५ वाजता भगवी पदयात्रा, सायं ६ वाजता शिवमंचाचे पूजन, सायं ७ वाजता संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या हस्ते शिवमुर्तीची प्रतिष्ठापना, हत्तीकडून छत्रपतींना मानवंदना. **१२ फेब्रुवारी :** नितीन बानुगडे पाटील यांचे व्याख्यान. **१३ फेब्रुवारी :** ह.भ.प. गोविंद महाराज गायकवाड, यांचे प्रबोधनात्मक सोंगी भारूड. **१४ फेब्रुवारी :** स्वराजरक्षक संभाजी महाराज फेम शिवशाहीर संतोष साळुंखे, यांचा स्फूतीगीते व पोवाड्याचा कार्यक्रम.



**१५ फेब्रुवारी :** लोककवी प्रशांत मोरे मुंबई व मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा या कवितेचे सुप्रसिद्ध कवी अनंत राऊत, अकोला यांचा काव्यमय समाज प्रबोधनाचा कार्यक्रम. **१६ फेब्रुवारी :** संगीत सम्राट फेम रामानंद उगले यांचा महाराष्ट्राची लोकगाणी हा लोकगीतांचा कार्यक्रम. **१७ फेब्रुवारी :** हभप पुरषोत्तम महाराज पाटील यांचे किर्तन. १८ फेब्रुवारी : स्वराज्याचे व्याख्यान. १९ फेब्रुवारी : सुवर्ण महोत्सवी वर्षी शिवजयंतीदिनी सकाळी १० वाजता महिलांच्या भव्य भगवा फेटा रॅली. स्वराज्य रक्षक संभाजी मालिका फेम प्रतीक्षा लोणकर यांची उपस्थिती. दुपारी ३ वाजता : मंगळवेढा शहरातून विविध वांद्यासहित शिवमुर्तीची भव्य मिरवणूक.

# महावस्त्र विभागातील कर्मचाऱ्यांच्या सचोटीने भाविक भारावले

**पंढरपूर, दि.१० फेब्रुवारी-**

पश्चिम बंगाल राज्यातील कोलकाता येथील आशिष भिमनवार हे पत्नी डॉ.रुपाली भिमनवार यांच्यासह श्रीविठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे आले होते.

दर्शनानंतर त्यांनी महावस्त्र दालनास भेट देऊन माता रुक्मिणीची साडी व पांडुरंग पूजेचे वस्त्र आशीर्वाद म्हणून खरेदी केले. बिलानुसार संपूर्ण रक्कम अदा करुन ते परतले. मात्र, तीन दिवसांनंतर महावस्त्र विभागातील कर्मचाऱ्यांनी त्या भाविकाशी संपर्क साधत खरेदीदरम्यान चुकून रुपये दहा हजार जास्त रक्कम जमा झाल्याची माहिती दिली. आणि अवघ्या दहा मिनिटांत ही रक्कम त्या भाविकांना परत करण्यात आली. त्यांच्या या सचोटीने भाविक



भारावले. आजच्या काळात सरकारी संस्थांमध्येही अशी प्रामाणिकता, सचोटी व निस्वार्थ सेवाभाव पाहून भाविकांनी समाधान व्यक्त केले. या प्रकरणात महावस्त्र विभागातील मनीषाताई जायकर यांनी दाखवलेली जबाबदारी, कर्तव्यनिष्ठा व प्रामाणिकपणा विशेष उल्लेखनीय आहे. मंदिर संस्थेची विश्वासार्हता अधिक दृढ झाली असून इतर कर्मचाऱ्यांनाही प्रेरणा मिळणार आहे. या कर्मचाऱ्यांच्या सन्मानासाठी छोटेखानी सन्मान कार्यक्रम आयोजित करण्यात यावा, अशी अपेक्षा आशिष भिमनवर यांनी व्यक्त केली आहे. भिमनवर कुटुंबीयांच्या वतीने रोख पारितोषिक देण्याचीही इच्छाही व्यक्त केली असून, त्यांनी तसा ई-मेल मंदिर समितीला केला आहे. दरम्यान, मनीषाताई जायकर यांच्यासह एकनाथ दर्शने, इंदू रणदिवे, स्नेहा वाडेकर, सपना सोनार, स्नेहल वाघमारे या कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प.गहिनीनाथ औसेकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक संदेश भोसले, विभाग प्रमुख अतुल बक्षी यांनी कौतुक केले.



सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेज येथे इ.१२ वी परीक्षेनिमित्त विद्यार्थ्यांचे स्वागत करताना प्रशालेचे संस्थापक.

# पहिल्या १०० दिवसात दिशादर्शक निर्णय घेणार!

- नव्या उर्जेने सोलापूर शहर घडवूया
- शहराच्या विकासाचा मांडला रोडमॅप

**विशेष मुलाखत**

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. १० फेब्रुवारी-**

सोलापूरच्या प्रथम नागरिकपदी विराजमान झालेले महापौर विनायक कोंड्याल यांनी पदभार स्वीकारल्यानंतर शहराच्या सर्वांगीण विकासाचा स्पष्ट रोडमॅप मांडला. शहर विकास, डिजिटल प्रशासन, तरुणाई, महिला सहभाग आणि वारसा, सांस्कृतिक जतन या विषयांवर त्यांनी दैनिक सोलापूर तरुण भारतशी बोलताना मनमोकळेपणाने संवाद साधला. सोलापूरकरांचा विश्वास हेच माझे बळ आहे. सर्वांना सोबत घेऊन पारदर्शक आणि विकासाभिमुख कारभार करणार, असा विश्वास महापौर विनायक कोंड्याल यांनी व्यक्त केला.

**प्रश्न :** महापौर म्हणून तुमच्या कार्यकाळातील पहिल्या १०० दिवसांचा स्पष्ट रोडमॅप काय असेल? नागरिकांना नेमका काय बदल दिसणार?

**उत्तर :** पहिल्या १०० दिवसांत आम्ही मूलभूत सुविधांवर लक्ष केंद्रीत करू. प्रलंबित कामांचा आढावा, विभागनिहाय जबाबदाऱ्या निश्चित करणे आणि वेळबद्ध अंमलबजावणी हा पहिला टप्पा असेल. तक्रार निवारण प्रणाली अधिक वेगवान करून नागरिकांना थेट प्रतिसाद मिळेल याची खात्री करु. नागरिकांना प्रशासन अधिक सक्रिय आणि उत्तरदायी दिसेल, हा आमचा प्रयत्न असेल.

**प्रश्न :** सोलापूर शहरातील पाणी, रस्ते आणि कचरा व्यवस्थापन हे कायमचे प्रश्न आहेत. यावर ठोस आणि वेळबद्ध कृती आराखडा काय आहे?

**उत्तर :** पाणीपुरवठ्यासाठी गळती रोखणे, वितरण व्यवस्थेचे आधुनिकीकरण आणि नियोजनबद्ध वेळापत्रक जाहीर करणे यावर भर असेल. रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी प्राधान्यक्रम निश्चित करून टप्प्याटप्प्याने कामे पूर्ण केली जातील. कचरा व्यवस्थापनात घरगुती कचऱ्याचे वर्गीकरण, प्रक्रिया प्रकल्पांची कार्यक्षमता वाढवणे आणि स्वच्छतेसाठी नागरिकांचा सहभाग वाढवणे हे तीन मुख्य मुद्दे असतील.

**प्रश्न :** महापालिकेतील प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वय कसा वाढवणार? गेल्या काही वर्षांत प्रशासकीय राजवट होती, त्यानंतरची ही नवी सुरुवात कशी वेगळी असेल?

**उत्तर :** नियमित समन्वय बैठक, स्पष्ट संवाद आणि संयुक्त जबाबदारीची पद्धत राबवू. लोकप्रतिनिधी आणि प्रशासन एकत्रितपणे निर्णय घेतील, यावर भर राहील. ही नवी सुरुवात अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि सहभागात्मक असेल.

**प्रश्न :** तरुणाई आणि महिलांसाठी शहर विकासात कोणत्या विशेष योजना आणणार आहात? ५० टक्के महिला प्रतिनिधित्वाचा प्रत्यक्ष निर्णयप्रक्रियेत कसा उपयोग होईल?

**उत्तर :** तरुणांसाठी कौशल्यविकास, क्रीडा सुविधा आणि उद्योजकता प्रोत्साहन योजना राबवण्याचा विचार आहे. महिलांसाठी सुरक्षित सार्वजनिक सुविधा, आरोग्य व स्वावलंबन उपक्रमांवर भर दिला जाईल. ५० टक्के महिला प्रतिनिधित्व हे केवळ आकडेवारी नसून निर्णय प्रक्रियेत संवेदनशील आणि समतोल दृष्टीकोन आणणारी ताकद आहे.

**प्रश्न :** सोलापूरच्या आर्थिक विकासासाठी उद्योग, रोजगार आणि गुंतवणूक याबाबत तुमची ठोस भूमिका काय आहे?

**उत्तर :** स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन, नवीन गुंतवणुकीसाठी सुलभ प्रक्रिया आणि औद्योगिक पायाभूत सुविधा मजबूत करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. टेक्सटाईल, लघुउद्योग आणि सेवा क्षेत्राला चालना देऊन रोजगारनिर्मिती वाढवण्याचा प्रयत्न राहील.

**प्रश्न :** महापालिकेतील पारदर्शकता आणि भ्रष्टाचारमुक्त कारभारासाठी कोणती यंत्रणा राबवणार? ऑनलाइन तक्रार निवारण, ई-गव्हर्नन्स यावर काय भर असेल?

**उत्तर :** सर्व महत्त्वाच्या सेवा ऑनलाइन करण्यात आल्या आहेत



आणि कामकाजाची माहिती सार्वजनिक करण्याचा आमचा मानस आहे. तक्रार निवारण प्रणाली अधिक प्रभावी करून वेळबद्ध उत्तर देण्याची जबाबदारी निश्चित करण्यात येईल. पारदर्शकता आणि उत्तरदायित्व हीच आमच्या प्रशासनाची ओळख राहील.

**प्रश्न :** महापौर म्हणून सोलापूरसाठी तुमची दीर्घकालीन विकासाची संकल्पना काय आहे?

**उत्तर :** माझी संकल्पना स्पष्ट आहे. सोलापूर हे केवळ ऐतिहासिक शहर नसून आधुनिक, उद्योगप्रधान आणि नागरिककेंद्री शहर व्हावे. पायाभूत सुविधा मजबूत करताना शिक्षण, आरोग्य आणि रोजगार या तीन स्तंभांवर आम्ही भर देणार आहोत.

**प्रश्न :** पुढील काही महिन्यांत नागरिकांना कोणते ठोस बदल दिसतील?

**उत्तर :** पाणीपुरवठा, स्वच्छता आणि रस्ते दुरुस्ती या मूलभूत सुविधांवर तातडीने लक्ष केंद्रित केले जाईल. तक्रार निवारण प्रणाली अधिक गतिमान केली जाईल, जेणेकरून नागरिकांना वेळेवर प्रतिसाद मिळेल.

**प्रश्न :** स्मार्ट सिटी आणि डिजिटल प्रशासनाबाबत तुमची भूमिका काय असेल?

**उत्तर :** सर्व सेवा ऑनलाइन सुरू आहेत. ई-गव्हर्नन्स अधिक सक्षम करून पारदर्शक आणि वेळबद्ध करण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. नागरिकांना महापालिकेच्या कामकाजाची माहिती सहज उपलब्ध व्हावी, हा आमचा उद्देश आहे.

**प्रश्न :** तरुणाई आणि उद्योग क्षेत्रासाठी काय विशेष उपक्रम राबवणार?

**उत्तर :** सोलापूरमध्ये लघुउद्योग, टेक्सटाईल आणि स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी महापालिका पातळीवर सहकार्याचे व्यासपीठ निर्माण करणार आहोत. तरुणांसाठी कौशल्यविकासाशी निगडित उपक्रमांना चालना दिली जाईल.

**प्रश्न :** महिलांचे वाढते प्रतिनिधित्व शहराच्या निर्णय प्रक्रियेत कसे उपयोगी ठरेल?

**उत्तर :** महिलांचा सहभाग म्हणजे संवेदनशील आणि समतोल निर्णयप्रक्रिया. शहर विकासात त्यांचे मत आणि नेतृत्व निर्णायक ठरेल, याची मला खात्री आहे.

**प्रश्न :** सोलापूरच्या सांस्कृतिक वारशाबाबत तुमचा दृष्टिकोन काय आहे?

**उत्तर :** विकास आणि परंपरा यांचा समतोल राखणे अत्यावश्यक आहे. पारतंत्र्यात तिरंगा ध्वज फडकलेली नवी पेठेतील जुनी नगरपालिकेची इमारत, श्री सिद्धरामेश्वर मंदिर परिसरासह ऐतिहासिक वारसा स्थळांचे जतन करत पर्यटनवृद्धीवर भर देण्यात येईल.

**प्रश्न :** नागरिकांशी थेट संवादासाठी काय योजना आहे?

**उत्तर :** नियमित ‘जनसंवाद’ बैठक, सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमातून थेट संवादाची व्यवस्था उभारणार आहोत. महापौर कार्यालय सर्वसामान्यांसाठी खुले राहील.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### रणवीरसिंहला जीवे मारण्याची धमकी

**मुंबई** : अभिनेता रणवीरसिंला जीवे मारण्याची धमकी मिळाली आहे. ही धमकी व्हॉट्सॲपवर पाठवलेल्या एका व्हॉइस नोटद्वारे देण्यात आली आहे. यात आरोपीने कोट्यवधी रुपयांच्या खंडणीची मागणी केली आहे. धमकी मिळाल्यानंतर लगेचच मुंबई पोलिसांनी रणवीरच्या वांद्रे येथील निवासस्थानाबाहेर सुरक्षा वाढवली आहे. अतिरिक्त पोलिस दल तैनात करण्यात आले आहे आणि ये-जा करणाऱ्यांवर कडक नजर ठेवली जात आहे. ही घटना चित्रपट दिग्दर्शक रोहित शेट्टी यांच्या मुंबईतील घराबाहेर ३१ जानेवारी रोजी झालेल्या गोळीबारानंतर घडली आहे. त्यामुळे मुंबई पोलिस या प्रकरणात अधिक सतर्क आहेत. पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले की, धमकीच्या व्हॉइस नोटमध्ये आरोपीने स्वतःला गंभीर गुन्हेगारीशी संबंधित असल्याचे सांगितले आहे आणि मोठी रक्कम न दिल्यास परिणाम भोगण्याची धमकी दिली आहे. पोलिसांनी व्हॉइस नोट न्यायवैद्यक तपासणीसाठी पाठवली आहे. ■

### सोन्याची खाण कोसळली, सात कामगार ठार

**बीजिंग** : चीनच्या पूर्वेकडील शेडोंग प्रांतात सोन्याची खाण कोसळून सात कामगारांचा मृत्यू झाला, तर १५ जखमींवर उपचार सुरू आहे. प्रशासनाने अपघाताच्या चौकशीचा आदेश जारी केला. खोदकाम सुरू असताना खाणीचा एक भाग कोसळला. घटनेची माहिती मिळताच बचाव पथकाने शोधमोहीम सुरू केली. आतापर्यंत सात कामगारांचे मृतदेह आणि १५ जखमींना बाहेर काढल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली. आपत्कालीन व्यवस्थापन आणि सार्वजनिक सुरक्षा विभाग अपघाताच्या कारणाचा शोध घेत आहे. ही खाण झाओजिन मायनिंग कंपनीची आहे. ही कंपनी प्रमुख सोने उत्पादक आहे.

### ब्रिटनमध्ये मुस्लिम महिला पंतप्रधान होणार?


**लंडन** : अमेरिकन लैंगिक गुन्हेगार जेफ्री एपस्टीनशी संबंधित वादामुळे ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांची खुर्ची धोक्यात आहे. आता त्यांच्याच लेबर पक्षाच्या एका गटाने राजीनाम्याची मागणी केली आहे. मात्र, स्टार्मर सध्या पद सोडण्यास नकार देत आहेत. दरम्यान, नवीन पंतप्रधानपदाच्या शर्यतीत गृहमंत्री शबाना महमूद यांच्यासोबतच आरोग्य मंत्री वेस्ट स्ट्रीटिंग आणि माजी उपपंतप्रधान अँजेला रेनर यांची नावे समोर येत आहेत.शबाना महमूद मीरपूरच्या मूळ रहिवासी आहेत. त्या ब्रिटनच्या गृहमंत्री बनणाऱ्या पहिल्या मुस्लिम महिला आहेत. जर त्या पंतप्रधान बनल्या, तर ब्रिटनच्या पहिल्या मुस्लिम पंतप्रधानही असतील. ब्रिटनमध्ये एपस्टीन फाईलशी संबंधित वादामुळे पंतप्रधान स्टार्मर यांचे सर्वांत विश्वासू सहकारी आणि डाऊनिंग स्ट्रीटचे चीफ ऑफ स्टाफ मॉर्गन मॅकस्वीनी यांना राजीनामा द्यावा लागला आहे.

### जयपूरला फिरायला आलेले दोन जपानी पर्यटक बेपत्ता

**जयपूर** : जयपूरला फिरायला आलेले दोन जपानी पर्यटक बेपत्ता झाले आहेत. टॅक्सी ड्रायव्हरला जेवण करून येतो असे सांगून ते दोघे मॅकडोनाल्ड्स रेस्टॉरंटमध्ये गेले होते, पण परत आले नाहीत. त्यांचे सामान टॅक्सीमध्येच होते. अशोकनगर पोलिस ठाण्यात ड्रायव्हरने दोघांच्या बेपत्ता होण्याची तक्रार दाखल केली आहे. माहितीनुसार, ते दोघे तीन दिवसांपूर्वीच भारतात आले होते. पोलिस आता त्यांचा शोध घेत आहेत. टॅक्सी ड्रायव्हर पिकेंद्रकुमार यांनी सांगितले की, ६ फेब्रुवारी रोजी दोन्ही जपानी पर्यटक (हिबिक्की शिब्बा आणि युमा) पर्यटक व्हिसावर दिल्लीत आले होते. दुसऱ्या दिवशी तो त्या दोघांना घेऊन जयपूरमधील ब्रह्मपुरी येथील एका हॉटेलमध्ये आला होता. ■

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| **सेन्सेक्स** | ८४,२७३.९२ (+२०८.१७) |
| **निफ्टी** | २५,९३५.१५ (+६७.८५) |



### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,५७,४०० |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु. २,६३,५०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अकोला | ३४.६ | १६.७ |
| अमरावती | ३४.८ | १५.५ |
| सोलापूर | ३४.७ | १७.८ |
| बुलडाणा | ३३.० | १७.६ |
| चंद्रपूर | ३३.४ | १६.८ |
| गडचिरोली | ३२.२ | १४.४ |
| गोंदिया | ३०.४ | १२.५ |
| नागपूर | ३१.९ | १३.२ |
| वर्धा | ३३.० | १४.० |
| वाशीम | -.- | -.- |
| यवतमाळ | ३२.० | १४.० |

# धर्माचरणानेच मानव जातीचे कल्याण शक्य

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन

◆ **नाशिक, १० फेब्रुवारी**

धर्माचा मार्ग सोडून भौतिकवादाला स्वीकारणाऱ्या जगात सोयी-सुविधा खूप मिळाल्या. पण, सुख दुरावले. याच कारणाने आज मानवतेसमोर अनेक समस्या उभ्या ठाकल्या आहेत. आधुनिक तंत्रज्ञान आणि प्राचीन ज्ञानाचा समन्वय साधून धर्माचरण केल्यानेच मानव जातीचे कल्याण शक्य आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.



ते चांदवड तालुक्यातील मलसाणे येथील णमोकार तीर्थक्षेत्री आयोजित दिगंबर जैन पंथाच्या आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सवात बोलत होते. सरसंघचालक म्हणाले, धर्मपरायण समाजामुळेच भारताच्या विविधतेत एकतेची निर्मिती झाली आहे. अहिंसा, अनेकांतवाद आणि अपरिग्रह यासारख्या मूल्यांनीच मानव समाजाच्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त केला आहे.

णमोकार हा केवळ एक शब्दसमूह नाही तर मानव आणि सृष्टी कल्याणाचा मार्गदर्शक मंत्र आहे. आता संपूर्ण जगाला हा कल्याणकारी मंत्र देण्याची वेळ आली आहे. तीर्थक्षेत्र तपस्येचे साधन आणि मानव कल्याणाच्या विचारांचे प्रेरणास्रोत आहे, असेही डॉ. भागवत म्हणाले.

यावेळी आचार्य देवनंदी महाराज म्हणाले की, स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानामुळेच आज आपण स्वातंत्र्याचा अनुभव घेत आहोत. साधू-संत अशा या देशाची खरी वारसा संपत्ती आहेत आणि त्यांच्याच आध्यात्मक आणि भक्तीने देशाची प्रगती होते आहे. (वृत्तसंस्था)

# सुनेत्रा पवारांनी स्वीकारली उपमुख्यमंत्रिपदाची सूत्रे

◆ **मुंबई, १० फेब्रुवारी**

महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेत राज्याच्या राजकारणात एक नवा इतिहास रचला आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर तेराव्या दिवशी, दुःख, शोक आणि आठवणींच्या ओझ्यातून बाहेर पडत त्यांनी उपमुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतली.



२८ जानेवारीच्या पहाटे बारामतीत अजित पवार यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला. त्या दुःखातून सावरत, पतीच्या अपूर्ण राहिलेल्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी सुनेत्रा पवार पुढे सरसावल्या आहेत.

मंगळवारी त्या बारामतीहून मुंबईत दाखल झाल्या. यावेळी त्यांच्या सोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकारी अध्यक्ष व राज्यसभेचे खासदार प्रफुल्ल पटेल आणि पुत्र पार्थ पवार होते. मुंबईत दाखल होताच त्यांनी उपमुख्यमंत्रिपदाचा पदभार स्वीकारला. त्यानंतर त्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीसाठी रवाना झाल्या.

मुंबईत आल्यानंतर सुनेत्रा पवार सर्वप्रथम देवगिरी बंगल्यावर गेल्या. उपमुख्यमंत्री असताना अजित पवार याच बंगल्यात वास्तव्यास होते. आता हाच बंगला सुनेत्रा पवार यांना देण्यात आला आहे. आठवणी आणि जबाबदाऱ्या दोन्हींचा संगम असलेले ते स्थान आहे.

उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारण्याआधी त्यांनी प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मंदिरात जाऊन बाप्पाचे आशीर्वाद घेतले. त्यानंतर चैत्यभूमी येथे जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना वंदन केले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्ष कार्यालयात पोहोचून अजित पवार यांच्या केबिनमध्ये त्यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. (तभा वृत्तसेवा)

# अजितदादांच्या अपघाताचा तातडीने छडा लावावा

## रोहित पवारांची मागणी

◆ **मुंबई, १० फेब्रुवारी**

अजित पवारांच्या विमान घातपाताबाबत लोकांच्या मनामध्ये अनेक प्रश्न पडले आहेत. अजित दादांचा मृत्यू झाला यावर विश्वास बसत नव्हता.



मात्र, ही घटना सत्य आहे. आज अजितदादा आपल्यामध्ये नसले तरीसुद्धा विचाराने ते कायम आपल्या सोबत आहेत, असे म्हणत रोहित पवार यांनी दादांच्या अपघातामागील खऱ्या कारणांचा सरकारी यंत्रणांनी तातडीने छडा लावण्याची मागणी केली.

अजित पवारांच्या अपघाताबतचे सविस्तर प्रेझेंटेशन रोहित पवार यांनी सादर केले. दादा परत आले तर मी त्यांना घट्ट मिठी मारेल, असे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे. मात्र, आज अजित दादा आपल्यात नाही. आम्ही प्रयत्न करून आम्हाला ही सर्व माहिती मिळाली आहे. मग सरकारच्या एजन्सीने जर काम केले, तर या अपघाताचे रहस्य लवकरात लवकर आपल्याला कळेल, असे म्हणत रोहित पवार यांनी अजितदादांचा घातपात झाल्याचा आरोप केला. तसेच विमान कंपनीसह वैमानिकावरही संशय व्यक्त केला.

दादांच्या अपघातानंतर लोकांमध्ये अनेक संभ्रम निर्माण झाले होते. लोकांना सत्य कळावे, म्हणून ही पत्रकार परिषद घेतल्याचे त्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### दादा नेहमी घड्याळ १५ मिनिटे पुढे ठेवत

या प्रसंगी रोहित पवार अत्यंत भावुक झाले. त्यांनी सांगितले की अपघातानंतर सलग सहा दिवस त्यांना हे सर्व एखाद्या वाईट स्वप्नासारखे वाटत होते. दादांचा अपघात झालाच नाही, असे सतत वाटत होते. मात्र, जेव्हा अपघातानंतर मिळालेल्या काही वस्तू प्रत्यक्ष पाहिल्या, तेव्हा वास्तव समोर आले. जळालेला स्वेटर, चप्पल आणि अजितदादांच्या हातातील घड्याळ पाहिले. दादा नेहमी घड्याळ १५ मिनिटे पुढे ठेवत असत. त्या घड्याळात ९ वाजलेले होते आणि ते पूर्णपणे बंद पडले होते. ते दृश्य पाहून त्यांना खात्री पटली की अजितदादा आता हयात नाहीत, असे ते म्हणाले. ■

# कामकाजातील आठवडाभराची कोंडी फुटली

## अर्थसंकल्पावरील चर्चा लोकसभेत सुरू

◆ **नवी दिल्ली, १० फेब्रुवारी**

लोकसभेच्या कामकाजाबाबत जवळपास एक आठवड्यापासून निर्माण झालेली कोंडी मंगळवारी अखेर फुटली आणि लोकसभेत अर्थसंकल्पावरील चर्चा सुरू झाली.

लोकसभेत निर्माण झालेला गतिरोध दूर करण्यासाठी सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दुपारी लोकसभेतील सर्व गटनेत्यांची बैठक बोलावली. त्यात सभागृहाचे कामकाज सुरळीत चालवण्यावर मतैक्य झाल्याचे समजते. मात्र, कोणत्या मुद्यावर आणि कशी सहमती झाली ते जाहीर करण्यात आले नाही.

दोनदा स्थगित झाल्यानंतर दुपारी दोन वाजता लोकसभेचे कामकाज सुरू होताच पीठासीन अधिकारी कृष्णप्रसाद तेन्नटी यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेसाठी काँग्रेसचे शशी थरूर यांचे नाव पुकारले आणि थरूर यांनी आपले भाषण सुरू केले.



आज सकाळी ११ वाजता कामकाज सुरू होताच सभागृहात गोंधळ सुरू झाला. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना बोलू द्यावे, अशी विरोधकांची मागणी होती. सभागृहातील कामकाज सुरळीत चालू द्यावे, असे आवाहन पीठासीन अधिकारी पी. सी. मोहन यांनी केले. मात्र, विरोधक ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्यामुळे त्यांनी कामकाज दुपारी १२ वाजपर्यंत स्थगित केले. दुपारी १२ वाजता कामकाज सुरू होताच पुन्हा विरोधकांचा गोंधळ सुरू झाला, त्यामुळे कामकाज दुपारी दोन वाजपर्यंत स्थगित करण्यात आले.

लोकसभेत सुरू असलेल्या गोंधळामुळे राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेचे उत्तर पंतप्रधान मोदी यांना देता आले नाही. चर्चा आणि पंतप्रधानांच्या उत्तराविनाच धन्यवाद प्रस्ताव लोकसभेत पारित करण्यात आला.

**राज्यसभेत चर्चा सुरू**

अर्थसंकल्पावर राज्यसभेत सुरळीत चर्चा सुरू आहे. पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार अर्थमंत्री निर्मला सीतारामन् अर्थसंकल्पावरील चर्चेला ११ फेब्रुवारीला लोकसभेत तर १२ फेब्रुवारीला राज्यसभेत उत्तर देणार होत्या. (तभा वृत्तसेवा)



हिमाचल प्रदेशात निसर्ग बहरला असून, अलौकिक सौंदर्य धारण केले आहे. पालमपूर येथील ट्युलिप गार्डनमध्ये निसर्गाने मुक्तहस्ताने केलेली उधळण डोळ्यांत साठवताना पर्यटक

# सुप्रिया सुळेंची मुलगी होणार नागपूरची सून!

◆ **नागपूर, १० फेब्रुवारी**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांची मुलगी रेवती सुळे हिचा विवाह ठरला आहे. रेवती सुळे यांचा विवाह सारंग अरुण लखानी यांच्यासोबत होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे सारंग अरुण लखानी हे नागपूरचे राहिवासी आहेत, मात्र ते मूळचे मलकापूर येथील आहेत. रेवती सुळे आता नागपूरची सून होणार आहे.

ही माहिती सोशल मीडियावर सुशील कुमार शिंदे यांची मुलगी स्मृती शिंदे यांनी शेअर केली आहे. सारंग लखानी हे नागपुरातील विश्वराज ग्रुपचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक अरुण लखानी यांचे पुत्र आहेत. ते एक उत्कृष्ट बॅडमिंटनपटू देखील आहेत. त्यांनी अनेक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग घेतला आहे. विश्वराज ग्रुप ही नागपूरची कंपनी आहे. ही कंपनी



पाणी व्यवस्थापनाचे प्रकल्प हाताळते. सुप्रिया आणि सदानंद सुळे यांना रेवती आणि विजय असे दोन अपत्य आहेत. रेवती सुळे यांनी प्रतिष्ठित लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून पदवी पूर्ण केली आहे. बारामती लोकसभा निवडणुकीत रेवती सुळे यांनी पहिल्यांदाच आपल्या आईसाठी सक्रिय प्रचार केला होता. (तभा वृत्तसेवा)

# काँग्रेसच्या ‘त्या’ महिला सदस्यांवर कठोर कारवाई करा : भाजपा

◆ **नवी दिल्ली, १० फेब्रुवारी**

लोकसभेत पंतप्रधानांच्या आसनाजवळ येत त्यांना घेराव घालणाऱ्या काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या महिला खासदारांवर कठोर कारवाई करा, अशी मागणी भाजपाच्या महिला खासदारांनी केली आहे.

भाजपाच्या लोकसभेतील महिला खासदारांनी सभापती ओम बिर्ला यांना पत्र पाठवत ही मागणी केली आहे. काँग्रेसच्या महिला खासदारांनी सोमवारी ओम बिर्ला यांना पत्र पाठवत त्यांच्यावर पक्षपाती वागणुकीचा आरोप केला होता. त्याला प्रत्युत्तर म्हणून भाजपच्या महिला खासदारांनी बिर्ला यांना पत्र पाठवत पंतप्रधानांच्या आसनाजवळ येत त्यांच्या जिवाला धोका निर्माण करणाऱ्या काँग्रेसच्या महिला खासदारांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. दरम्यान सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी ४ फेब्रुवारीचा लोकसभेतील काँग्रेसच्या महिला खासदारांच्या गोंधळाचा व्हिडीओ ‘एक्स’वर जारी केला. या व्हिडीओत काँग्रेसच्या महिला खासदार हातात बॅनर घेऊन पंतप्रधानांच्या आसनाला घेराव घालून त्यांच्याविरुद्ध घोषणाबाजी करताना दिसत आहे. काँग्रेसच्या खासदारांपासून पंतप्रधानांच्या जिवाला असलेला संभाव्य धोका जाणवल्यामुळे ओम बिर्ला यांनी नरेंद्र मोदी यांना सभागृहात येण्यापासून रोखले होते. त्यामुळे संभाव्य अप्रिय प्रसंग टळला होता. (तभा वृत्तसेवा)

# जनरल तिकिटांसाठी यूटीएस ॲप बंद होणार

◆ **नवी दिल्ली, १० फेब्रुवारी**

जर तुम्ही लोकल ट्रेन किंवा अनारक्षित तिकिटांसाठी दररोज यूटीएस ऑन मोबाईल ॲप वापरत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. भारतीय रेल्वेने प्रवाशांना कळवले आहे की १ मार्च २०२६ पासून यूटीएस ऑन मोबाईल ॲप पूर्णपणे बंद केले जाईल. याचा अर्थ असा की या तारखेनंतर, यूटीएस ॲप तिकीट बुकिंग किंवा इतर सेवांसाठी वापरला जाणार नाही.

रेल्वेने प्रवाशांना त्यांच्या दैनंदिन प्रवासादरम्यान कोणतीही गैरसोय टाळण्यासाठी वेळेवर रेलवन ॲपवर स्विच करण्याचे आवाहन केले आहे. रेलवन हे एक नवीन ॲप आहे जे तिकीट बुकिंगपासून ते एकाच प्लॅटफॉर्मपर्यंत विविध प्रवासाशी संबंधित सेवा देते. लाखो प्रवासी दररोज त्यांच्या मोबाईल फोनचा वापर करून तिकिटे बुक करतात. म्हणूनच, यूटीएस ॲप बंद करणे हा एक महत्त्वाचा बदल मानला जात आहे. रेल्वेचे म्हणणे आहे की रेलवन ॲप प्रवाशांना अधिक सोयीस्कर, जलद आणि विश्वासार्ह अनुभव देईल. (वृत्तसंस्था)

# महसूल विभागातील सुनावणीसाठी इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाचा वापर

◆ **मुंबई, १० फेब्रुवारी**

जमिनीच्या वादासंदर्भातील महसूल विभागातील सुनावणी प्रक्रियेत पक्षकारांना नोटीस बजावण्यासाठी इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाचा वापर करता यावा, यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता-१९६६ मध्ये सुधारणा करण्यास मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

महसूल विभागातील विविध प्रशासकीय कार्यपद्धतींमध्ये सुधारणा सुचविण्यासाठी पुणे विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीने सादर केलेल्या अहवालात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता-१९६६ मधील कलम २३० अंतर्गत नोटीस बजावण्यासाठी इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करण्याची शिफारस करण्यात आली आहे. या शिफारशीनुसार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम-१९६६ मधील कलम २३०(१) मध्ये सुधारणा करून नोटीस बजावण्यासाठी एसएमएस, व्हॉट्सॲप मेसेजिंग सेवा, टेलिग्राम चॅनेल तसेच इलेक्ट्रॉनिक मेलचा समावेश करण्यात येणार आहे.

**अपर जिल्हाधिकारी संवर्गातील ११ नवीन पदांना मंजुरी**

राज्यातील जिल्हा प्रशासनावरील वाढता प्रशासकीय ताण कमी करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी संवर्गातील ११ नवीन पदांच्या निर्मितीस मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. सध्या अपर जिल्हाधिकाऱ्यांकडे तब्बल ३९ विषयांचे कामकाज असून, त्यामध्ये भूसंपादन, पुनर्वसन, जमीन व्यवस्थापन, अपील प्रकरणे, अतिक्रमणविरोधी कारवाई, ग्रामपंचायत व नगरपरिषद विषयक बाबी, कृषीगणना, शासकीय वसुली आदींचा समावेश आहे. (तभा वृत्तसेवा)

### विज्ञान प्रदर्शनातील विजेत्यांच्या बक्षिसात वाढ

राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात यश मिळविणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक आणि प्रयोगशाळा परिचर यांना देण्यात येणाऱ्या बक्षिसांच्या रकमेत वाढ करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. विद्यार्थ्यांमधील विज्ञान, गणित आणि नवोपक्रमशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रीय बाल वैज्ञानिक प्रदर्शन आयोजित करण्यात येते. राज्यस्तरीय प्रदर्शनातील विजेते राष्ट्रीय स्तरावर राज्याचे प्रतिनिधित्व करतात. प्रथम क्रमांकाला ५१ हजार, द्वितीय ३१ हजार, तृतीय २१ हजार, चतुर्थ ११ हजार आणि १० हजार रुपयांची तीन उत्तेजनार्थ बक्षिसांचा यात समावेश आहे. ■

# बांगलादेशात पुन्हा हिंदू व्यावसायिकाची हत्या

## निवडणुकीपूर्वी हिंसाचार उफाळला ● चाकूने वार करीत दुकानातच संपविले

◆ **ढाका, १० फेब्रुवारी**

बांगलादेशच्या मैमनसिंग जिल्ह्यात त्रिशाल पोलिस ठाणे भागात सोमवारी रात्री एका हिंदू व्यावसायिकाची चाकूने भोसकून निर्घृण हत्या करण्यात आली. सुसेन चंद्र सरकार असे मृतक व्यक्तीचे नाव आहे आणि ते साउथकांडा गावचे रहिवासी होते. सरकार यांचा तांदूळ खरेदी-विक्रीचा व्यवसाय होता. मंगळवारी पहाटे त्यांचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात आढळला.



सार्वत्रिक निवडणुकीच्या तीन दिवस आधीच हिंदू नागरिकाला लक्ष्य केल्याने अल्पसंख्यकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. त्रिशाल पोलिस ठाण्याचे प्रभारी मोहम्मद फिरोज हुसेन यांनी सांगितले की, सोमवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास हल्लेखोराने सरकार यांची बोगर बाजार चौकात असलेल्या दुकानातच हत्या केली आणि शटर बंद करून तो पसार झाला. रात्री उशिरापर्यंत घरी न परतल्याने त्यांचा मुलगा शोध घेत दुकानात आला असता, वडिलाचा मृतदेह रक्ताने माखलेल्या अवस्थेत आढळला. त्यानंतर घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. प्राथमिक तपासात चाकूने हत्या केल्याचे उघड झाले आहे, हत्येमागील हेतू अद्याप स्पष्ट झालेला नाही.

याप्रकरणी गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला आहे. दरम्यान दोन दिवसांपूर्वीच पटुआखली जिल्ह्यात निवडणूक प्रचारादरम्यान बीएनपी आणि जमाती इस्लामीच्या कार्यकर्त्यांत हिंसक संघर्ष झाला, त्यानंतर विविध जिल्ह्यांत तोडफोड आणि जाळपोळीचे प्रकार घडले. (वृत्तसंस्था)

### अल्पसंख्यकांच्या सुरक्षेवर अमेरिकेची चिंता

निवडणुकीपूर्वी सुरू असलेला हिंसाचार आणि अल्पसंख्यकांवरील हल्ल्याच्या पृष्ठभूमीवर अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने चिंता व्यक्त केली आहे. मानवाधिकार आयोगाच्या अहवालाची दखल घेत जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, निवडणुकीपूर्वी धार्मिक अल्पसंख्याकांना, विशेषतः हिंदू, बौद्ध आणि ख्रिश्चनांवर हल्ले दुर्दैवी आहे आणि अंतरिम सरकारने हल्लेखोरांवर कठोर कारवाई करायला हवी. बांगलादेश एका गंभीर राजकीय वळणावर उभा आहे, जिथे लोकशाही, धार्मिक स्वातंत्र्य आणि प्रादेशिक स्थिरता धोक्यात आहे. बांगलादेशातील अमेरिकन नागरिकांनी संघर्षापासून दूर राहावे, आवश्यक आहे. ■

# रशियात भारतीय विद्यार्थ्यांचे शोषण

◆ **नवी दिल्ली, १० फेब्रुवारी**

रशियात भारतीय विद्यार्थ्यांच्या छळाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे, २०२५ मध्ये भारतीय दूतावासाला शोषण, छळ आणि वांशिक भेदभावाशी संबंधित २०० तक्रारी मिळाल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने संसदेत लिखित स्वरूपात दिली.

रशियातील एका विद्यापीठाच्या वसतिगृहात ७ फेब्रुवारी रोजी झालेल्या चाकू हल्ल्यात चार भारतीय विद्यार्थी जखमी झाले, या घटनेची दखल घेत काँग्रेस नेते शशी थरूर यांनी रशियात भारतीय विद्यार्थ्यांवर होणाऱ्या हिंसाचाराची माहिती मागितली होती. यानंतर सरकारच्या वतीने केंद्रीय परराष्ट्र राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी रशियात भारतीय विद्यार्थ्यांवर होणाऱ्या छळाची आकडेवारी लिखित स्वरूपात सादर केली. २०२५ मध्ये १९६ देशांमध्ये शिकणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांनी शोषण, छळ आणि वांशिक भेदभावाशी संबंधित सुमारे ३५० तक्रारी दाखल केल्या. यापैकी २०० हून अधिक तक्रारी केवळ रशियातून आल्या. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# भाजपाच्या संघटनेचे यश

कधीकाळी भारतीय जनता पक्षाकडे पाहताना एक ठरावीक समज लोकांच्या मनात ठसविला जायचा. तो असा की, हा पक्ष शहरातला, उच्चभ्रू, 'भटा-ब्राह्मणांचा' आणि मर्यादित सामाजिक पाया असलेला आहे. ही प्रतिमा राजकीय प्रतिस्पर्ध्यांनी मुद्दाम रुजवली होती. सामाजिक कारणांमुळे ती लोकांच्या चर्चेत दीर्घकाळ टिकूनही राहिली. पण गेल्या दोन दशकांत, विशेषतः महाराष्ट्रातील अलिकडच्या महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांतील निकालांनी हा समज पुरता निकालात काढला आहे. भाजपा आणि त्या पक्षाच्या नेतृत्वाखालील महायुतीला सर्वत्र मोठे यश मिळाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वासह भाजपाच्या संघटनात्मक ताकदीचे अर्थात शेवटच्या थरातील कार्यकर्त्यांच्या मेहनतीचे हे यश आहे.

भाजपाचा विजय फक्त महानगरांत नव्हे, तर लहान शहरांत, तालुक्यांत, गावकुसाबाहेरच्या वस्त्यांत आणि ग्रामीण पट्ट्यातही होताना दिसून येतो. भाजपाचा हा विजय संघटनशक्ती, शिस्त, नियोजन आणि अंमलबजावणी यांच्या राजकीय परिणामकारकतेचा जिवंत पुरावा आहे. राजकारणात विचारसरणी, नेतृत्व, कार्यक्रम यांचे महत्त्व असतेच; परंतु त्यामागे उभे असलेले संघटन हेच प्रत्यक्ष विजयाचे खरे इंजिन असते. संघटन म्हणजे फक्त पदांची उतरंड नव्हे. ती असते पक्षनिष्ठ कार्यकर्त्यांची शृंखला, जबाबदाऱ्यांची स्पष्ट विभागणी, निर्णयांची वेगवान अंमलबजावणी आणि सतत चालणारी प्रशिक्षण-प्रबोधनाची प्रक्रिया. भाजपाने गेल्या अनेक वर्षांत हेच केले. शाखा, मंडळ, बुथ, शक्तिकेंद्र, जिल्हा, विभाग, प्रदेश अशा बहुस्तरीय रचनेतून कार्यकर्त्यांना सतत कार्यरत ठेवणे फक्त भाजपाला जमते; निवडणूक असो वा नसो, यात खंड पडू दिला जात नाही. दुसरीकडे काँग्रेस किंवा अन्य पक्षांची झोप निवडणूक आली तरच उघडते. एरवी त्या पक्षांचे नेते-कार्यकर्ते आणि संघटना हे सारे झोपलेलेच असतात. भाजपाला निवडणूक आली म्हणून संघटना नव्याने उभी करावी लागत नाही; ती आधीपासून सज्ज असते आणि त्यामुळेच आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी भाजपाला वेळ लागत नाही. महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर ग्रामीण भागातले राजकारण प्रामुख्याने घराणेशाही, जातीय समीकरणे आणि काही स्थानिक लोकांचा दबदबा या भोवती फिरत असायचे. जिल्हा परिषदा, नगर पालिका या संस्था अनेकदा मोजक्या लोकांच्या प्रभावाखाली असायच्या. उमेदवारी देताना कार्यकर्त्यांचा दीर्घकालीन कामाचा इतिहास न पाहता, कोण 'कोणाचा' आहे हे पाहिले जात असे. परिणामी, पक्षापेक्षा व्यक्ती मोठी आणि संघटना दुय्यम ठरायची. भाजपाने राजकारणाची ही धाटणी मोडली. बुथपातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यालाही वर येण्याची संधी आहे, ही भावना निर्माण केली गेली. कार्यकर्ता हा केवळ पोस्टर लावणारा किंवा सभा आयोजित करण्यासाठी झटणारा नसून, भविष्यातील नेतृत्व त्याच्या माध्यमातून पुढे येणार आहे, ही धारणा भाजपात रुजविली गेली. यामागे संघटन आणि शिस्तीचा मोठा वाटा आहे. निर्णयप्रक्रियेवर सर्वांचा विश्वास असणे आणि एकदा निर्णय झाला की सर्वांनी एकजुटीने त्याची अंमलबजावणी करणे महत्त्वाचे ठरले. भाजपात अंतर्गत चर्चा, मतभेद, विचारविनिमय होतोच; ते स्वाभाविकही आहे. मतदारांना पक्ष एकसंध दिसतो. इतर अनेक पक्षांत याउलट चित्र दिसते. निवडणुकीच्या तोंडावर गटबाजी, नाराजी, बंडखोरी, उघड टीका असे सारे घडते. आता ते थोडे फार भाजपातही घडू लागले आहे. त्याकडे भाजपा नेत्यांनी लक्ष दिले पाहिजे. इतर पक्षांमध्ये असलेले गटबाजीचे आजार या पक्षाला जडू नयेत, याचीही काळजी घेतली गेली पाहिजे. पक्षांतर्गत व्यवस्थेत नियोजन आणि अंमलबजावणी या दोन घटकांची सांगड भाजपाने कौशल्याने घातली आहे. निवडणुकीच्या आधी मतदारसंघांचे सूक्ष्म विश्लेषण, सामाजिक रचना, स्थानिक प्रश्न, लाभार्थी वर्ग, मतदारांची प्रवृत्ती या सर्वांचा अभ्यास करून रणनीती आखली जाते. केवळ मोठ्या सभा आणि प्रचारयात्रांवर भर न देता, घराघरांत पोहोचणारे नेटवर्क तयार केले जाते. केंद्र व राज्य सरकारच्या कामांची माहिती, स्थानिक प्रश्नांवर उपाय आणि त्यावरील पक्षाची भूमिका हे सर्व लोकांना सांगितले जाते. यामुळे राजकीय आणि मतदार हे एरवी जाणवणारे अंतर फार कमी होत जाते. भाजपाच्या विस्तारामागे व यशामागे सामाजिक समावेशकतेची भूमिकाही महत्त्वाची आहे. पूर्वी ज्या पक्षावर विशिष्ट समाजघटकाचा ठसा होता, त्याने आज विविध जाती, पंथ, भाषा, व्यवसाय, वयोगटांतील लोकांना नेतृत्वात व पक्ष कार्यात स्थान दिले आहे. नगरसेवकापासून खासदारापर्यंत आणि बुथप्रमुखापासून प्रदेशाध्यक्षांपर्यंत विविध पृष्ठभूमीचे कार्यकर्ते दिसतात. ही विविधता केवळ प्रतीकात्मक नाही; ती निर्णयप्रक्रियेतही प्रतिबिंबित होते. पदे देतानाही समावेशकता दिसतेच. ग्रामीण भागात भाजपाचा वाढता प्रभाव हा इतर पक्षांसाठी विशेष अभ्यासाचा विषय ठरावा. शेतकरी, शेतमजूर, लघुउद्योग, स्वयंरोजगार, महिला बचतगट, युवक या सर्व घटकांशी भाजपकडून सातत्याने संवाद ठेवला जातो. केवळ निवडणुकीदरम्यान नव्हे, तर एरवीही शिबिरे, प्रशिक्षण, कार्यक्रम, जनसंपर्क यामधून पक्ष कार्यकर्त्यांच्या आणि लोकांच्या संपर्कात असतो. हे सातत्य विश्वास निर्माण करण्यासाठी महत्त्वाचे असते. काँग्रेससह इतर अनेक पक्ष अजूनही जुन्याच पद्धतीत अडकलेले दिसतात. घराणेशाही, दरबारी राजकारण, गटबाजी, कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष या गोष्टींमुळे संघटना कमकुवत होते. निर्णय काही मोजक्या लोकांच्या हातात राहतात. कार्यकर्त्याला वाटते की त्याचे श्रम केवळ वरच्या लोकांसाठी आहेत, त्याला स्वतःला पुढे जाण्याची संधी नाही. त्यामुळे त्याची इच्छा आणि ऊर्जा कमी होते. निवडणुकीच्या वेळी कार्यकर्त्यांमध्ये जोश नसतो आणि पक्ष यंत्रणा निष्क्रिय होते. स्वाभाविकच निवडणुकीतील यशावर त्याचा परिणाम होतो.

भाजपाच्या यशाने एक मूलभूत सत्य पुन्हा अधोरेखित केले आहे आणि ते असे की, राजकारणात संघटना हीच खरी ताकद आहे. मोठे नेते, मोठ्या घोषणा, मोठे प्रचारयुद्ध यापेक्षा जास्त प्रभावी असते ते बुथपातळीवरील कार्यकर्त्याचे काम. मतदाराच्या घरात जाऊन संवाद साधणारा, त्याच्या प्रश्नांची नोंद घेणारा, योजनांची माहिती देणारा कार्यकर्ता हा पक्षाचा खरा चेहरा असतो. भाजपाने या चेहऱ्याला सक्षम केले. त्याचा हा परिणाम होय. शिस्त आणि नियोजन यांची सांगड घातल्यास परिणाम कसे मिळतात, हे या निवडणुकांतील यशाने दाखवून दिले. उमेदवारी वाटपापासून प्रचारयोजनेपर्यंत आणि मतमोजणीपर्यंत सर्व प्रक्रिया भाजपात फार शिस्तबद्ध रीतीने पार पडतात. नाराजी असली तरी ती संघटनात्मक चौकटीत हाताळली जाते. परिणामी, बाहेर फारसे दिसत नाही. मतदारांनाही असा पक्ष अधिक विश्वासार्ह वाटणे स्वाभाविकच. यातून इतर पक्षांनी शिकण्यासारखे बरेच आहे. संघटन उभे करणे, कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणे, त्यांना निर्णयप्रक्रियेत सामावून घेणे, शिस्त राखणे आणि नियोजनपूर्वक अंमलबजावणी करणे या गोष्टी कोणत्याही राजकीय पक्षासाठी उपयुक्त आहेत. पण त्यासाठी मानसिकता बदलावी लागते. व्यक्तिकेंद्री राजकारणातून संघटनकेंद्री राजकारणाकडे वळावे लागते. आज महाराष्ट्रात आणि देशात भाजपाचा विस्तार पाहिला तर तो दीर्घकालीन संघटनप्रक्रियेचा परिणाम आहे हे कुणाच्याही लक्षात यावे. शहरापासून गावापर्यंत, उच्चवर्गापासून सर्वसामान्यांपर्यंत, तरुणांपासून ज्येष्ठांपर्यंत अशा सर्व स्तरांवर पक्षाचे जाळे निर्माण झाले आहे. त्यामुळे 'हा अमुक समाजाचा पक्ष' ही लेबले आपोआप गळून पडली आहेत. राजकीय यश योगायोगाने मिळत नाही. त्यामागे वर्षानुवर्षांची मेहनत, शिस्त, नियोजन आणि कार्यकर्त्यांचा त्याग असतो. भाजपाने हे देशभरात सर्वत्र आणि वारंवार सिद्ध केले आहे. महाराष्ट्रातील अलिकडच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील यश हे याचे ठोस उदाहरण आहे. या यशाने राजकारणातील संघटनशक्तीचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. शेवटी, लोकशाहीत मतदार हा सर्वोच्च असतो. तो केवळ नेतृत्वाने, भाषणांनी किंवा घोषणांनी प्रभावित होत नाही; तर त्याला दिसणाऱ्या कामाने, संघटनेच्या उपस्थितीने आणि विश्वासार्हतेने प्रभावित होतो. भाजपाने हे समजून घेतले आणि त्यानुसार काम केले. त्यामुळेच आज तो देशात आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात स्वीकारला जात आहे. इतर पक्षांनीही या अनुभवातून धडा घेतला, तर लोकशाही अधिक सुदृढ होईल, संघटनात्मक राजकारणाला नवी दिशा मिळेल आणि राजकीय स्पर्धा अधिक गुणवत्तापूर्ण बनेल. ▮

## विशेष

# महत्त्वाकांक्षी कॉरिडॉरसाठी हवा अर्थपुरवठा

**प्रा. सुखदेव बखळे**

पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत प्रवासी प्रणालींना प्रोत्साहन देण्यासाठी सात 'हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर' विकसित करण्याची घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी अर्थसंकल्पात केली. त्यात मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद, हैदराबाद-बंगळुरू, हैदराबाद- चेन्नई, चेन्नई-बंगळुरू, दिल्ली-वाराणसी आणि वाराणसी-सिलिगुडी या मार्गांचा समावेश आहे. याशिवाय तीन नवीन समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर जाहीर करण्यात आले आहेत. त्यांचे व्यवहार्यता अहवाल रेल्वेकडून तपासून पाहिले जात आहेत. त्यात फक्त एका समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरचा उल्लेख करण्यात आला. दुसरीकडे, सात नवीन 'हाय-स्पीड कॉरिडॉर'ची घोषणा काहीशी आश्चर्यकारक होती. कारण ते खूप महागडे आहेत. भारतातील पहिला 'हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर' अद्याप कार्यान्वित झालेला नाही आणि २०२९ पर्यंत कार्यान्वित होण्याची शक्यता कमी आहे. या अर्थसंकल्पात रेल्वेच्या भांडवली खर्चासाठी वाढीव तरतूददेखील समाविष्ट आहे. २०१४-१५ पासून केंद्रीय अर्थसंकल्पात भारतीय रेल्वेला भांडवली खर्चासाठी विक्रमी निधी मिळत आहे आणि गेल्या तीन वर्षांमध्ये दरवर्षी दोन लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त विक्रमी निधीचे वाटप झाले आहे. या वर्षीचे हे वाटप गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे २५ टक्के जास्त आहे. अतिरिक्त अर्थसंकल्पीय संसाधनांमधून मिळणारा १२ हजार कोटी रुपयांचा निधी जोडल्यास २०२६-२७ चा एकूण भांडवली खर्च दोन लाख नव्वद हजार कोटी रुपयांपर्यंत वाढतो. तो २०२५-२६ च्या सुधारित अर्थसंकल्पातील दोन लाख ६२ हजार कोटी रुपयांच्या तुलनेत जास्त आहे. या पृष्ठभूमीवर हाय स्पीड आणि मालवाहतूक कॉरिडॉरची घोषणा भारताला वेगवान रेल्वेच्या जागतिक नकाशावर नेण्याचा महत्त्वाचा प्रयत्न ठरत आहे.

भांडवली खर्च वाटप आणि विविध मागणी शीर्षकांमध्ये त्याचे वितरण यांचे विश्लेषण करण्यापूर्वी अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या प्रस्तावित सात 'हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर' आणि एका समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरच्या खर्च घटकाचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे. प्रस्तावित सात नवीन 'हाय-स्पीड' कॉरिडॉरमध्ये अंदाजे चार हजार किलोमीटरच्या 'हाय-स्पीड रेल्वेलाईन्स' टाकाव्या लागणार आहेत. त्यासाठी अंदाजे १६ लाख कोटी रुपये खर्च करावा लागू शकतो. दानकुनी आणि सुरतदरम्यानचा पूर्व-पश्चिम समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर अंदाजे दोन हजार किलोमीटर लांबीचा असेल. त्यासाठी अंदाजे २.७ लाख कोटी रुपये खर्च येईल. या सर्व प्रस्तावित कॉरिडॉरना अद्याप मंजुरी मिळालेली नाही. अहमदाबाद ते मुंबई हा भारतातील पहिला 'हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर' ५०८ किलोमीटर लांबीचा आहे. त्याचा मूळ खर्च अंदाजे एक लाख कोटी रुपये इतका होता. ताज्या अहवालांनुसार या प्रकल्पाला बराच वेळ लागल्यामुळे खर्च जवळजवळ दुप्पट होऊन अंदाजे दोन लाख कोटी रुपये झाला आहे. हा 'हाय-स्पीड' प्रकल्प २०१६ मध्ये मंजूर झाला होता आणि २०२९ पर्यंत पूर्णपणे कार्यान्वित करण्याचे लक्ष्य आहे. सात नवीन 'हाय-स्पीड कॉरिडॉर' पूर्ण होण्यास एक दशकाहून अधिक काळ लागू शकतो. या 'हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर'साठी नावीन्यपूर्ण वित्तपुरवठा यंत्रणादेखील उभारावी लागेल. कारण त्यांना रेल्वेसाठीच्या भांडवली खर्चासाठी सध्याच्या बजेट वाटपाद्वारे निधी दिला जाऊ शकत नाही. असे असले तरी या प्रकल्पांच्या पूर्णत्वाची आवश्यक गती सुनिश्चित करून, जागतिक बँकेसारख्या बहुपक्षीय वित्तीय संस्था आणि खाजगी क्षेत्राला सहभागी करून घेतले पाहिजे. ते अहमदाबाद ते मुंबईला जोडणाऱ्या सध्याच्या 'हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर'पेक्षा कमी कालावधीत पूर्ण केले जाऊ शकतात. हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे आणि त्याला प्राधान्य देऊन, २०४० पर्यंत 'हाय-स्पीड रेल नेटवर्क' असलेल्या जगातील पहिल्या पाच देशांमध्ये भारताला निश्चितच स्थान मिळेल. ताशी २२० किलोमीटरपेक्षा जास्त वेग असलेले 'हाय-स्पीड रेल नेटवर्क' जगभरात विस्तारत आहेत. चीन 'हाय-स्पीड रेल नेटवर्क'च्या विकास आणि विस्तारात आघाडीवर आहे. त्यानंतर स्पेन, फ्रान्स, जर्मनी, जपान, स्वीडन, दक्षिण कोरिया, ब्रिटन आणि इटली यांचा क्रमांक लागतो. मोरोक्को, सौदी अरेबिया, हाँगकाँग, इंडोनेशिया आणि तुर्कीसह अनेक विकसनशील अर्थव्यवस्थांनीही 'हाय-स्पीड रेल नेटवर्क' सुरू केले आहेत. सध्या चीनमध्ये पन्नास हजार किलोमीटरपेक्षाही जास्त 'हाय-स्पीड रेल नेटवर्क' आहे. इतर सर्व देशांच्या एकत्रित 'हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क'पेक्षा ते जास्त आहे. चीननंतर स्पेन, जपान, फ्रान्स आणि जर्मनीमध्ये अंदाजे तीन ते चार हजार किलोमीटर लांबीचे 'हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क' कार्यरत आहेत. या पृष्ठभूमीवर भारतात निर्माणाधीन असलेल्या आणखी सात 'हाय-स्पीड कॉरिडॉर'च्या प्रस्तावात एकूण साडेचार हजार किलोमीटरचे 'हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क' असेल.



'हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क'च्या कामाची गती समजून घेण्यासाठी चीनने या क्षेत्रात केलेल्या प्रगतीकडे पाहणे आवश्यक आहे. २०२१ ते २०२५ दरम्यानच्या १४ व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात चीनचे 'हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क' ३३ टक्क्यांनी वाढले आहे. ३८ हजार किलोमीटरवरून ५० हजार चारशे किलोमीटरपर्यंत म्हणजेच पाच वर्षांच्या कालावधीमध्ये अंदाजे १२ हजार किलोमीटर 'हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क' पूर्ण झाले आहे. अहवालांनुसार २०३० पर्यंत चीनने आपले एकूण रेल्वे नेटवर्क एक लाख ऐंशी हजार किलोमीटरपर्यंत वाढवण्याची योजना आखली आहे. त्यात अंदाजे साठ हजार किलोमीटर 'हाय-स्पीड रेल्वे'चा समावेश आहे. भारताला असे मोठे प्रकल्प हाती घ्यायचे असतील तर भारतीय रेल्वे प्रकल्पांसाठी लागणारा खर्च आणि वेळ लक्षणीयरीत्या कमी करणे आवश्यक आहे. या मेगा प्रकल्पांना रेल्वेसाठी वाटप केलेल्या भांडवली खर्चातून वित्तपुरवठा करता येत नाही. जागतिक बँकेने प्रदान केलेल्या नावीन्यपूर्ण 'पीपीपी' वित्तपुरवठा यंत्रणांचा शोध घेणे आवश्यक आहे. खासगी क्षेत्र 'ईस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर' आणि 'हाय-स्पीड रेल्वे नेटवर्क'चा विचार करू शकते. घोषित केलेल्या 'फ्रेट कॉरिडॉर'ला जागतिक बँकेसारख्या बहुपक्षीय वित्तीय संस्थांकडून वित्तपुरवठा येऊ शकतो. या मालवाहतूक कॉरिडॉरसाठी खाजगी भांडवलदेखील मिळवता येईल. 'हाय-स्पीड कॉरिडॉर'पेक्षा या मालवाहतूक कॉरिडॉरमधून खूप जास्त आर्थिक परतावा मिळतो.

भारतीय रेल्वेने उद्योगांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी आणि भारतीय रेल्वेच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी मालवाहतूक क्षमता वाढावी या उद्देशाने तीन नवीन समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरचा विचार केला आहे. या समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरमध्ये उत्तर-दक्षिण समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर आणि पूर्व किनारपट्टी समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर यांचा समावेश आहे. विद्यमान पूर्व आणि पश्चिम समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरच्या कामगिरीवरून दिसून आले आहे, की हे समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर भारतीय रेल्वेसाठी सर्वात आवश्यक प्रकल्प आहेत. ऊर्जा/खनिज/सिमेंट वाहतूक, बंदर कनेक्टिव्हिटी आणि उच्च वाहतूक घनता असलेल्या विभागांसाठी विशिष्ट मार्गांवर हे कॉरिडॉर फायदेशीर ठरणार आहेत. भारतीय रेल्वे बहुतेक व्यस्त मार्गांवर पूर्ण क्षमतेसह काम करत आहे. यामुळे, वाढलेली मालवाहतूक हाताळण्याची तिची क्षमता मर्यादित होते. आता पूर्ण झालेल्या पूर्व आणि पश्चिम समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरने हे दाखवून दिले आहे, की सध्याच्या भारतीय रेल्वेमार्गावरची गर्दी कमी करण्यासाठी आणि उद्योग आणि ऊर्जा क्षेत्रांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी अधिक समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरची आवश्यकता आहे. भारतीय रेल्वेने अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर आणि इतर समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरना जलद मंजुरी देणे आणि खर्च तसेच वेळेचा अतिरेक न करता निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करणे शहाणपणाचे ठरेल. ▮

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# श्रीचंद तेजवानी सिंधी समाजाचे पहिले महापौर

भाजपाने गेल्या काही वर्षांत गल्लीपासून दिल्लीपर्यंत सोशल इंजिनीयरिंग अतिशय चांगल्या पद्धतीने राबविले आहे. त्याचे यशस्वी परिणाम आपल्याला चौफेर पाहायला मिळत आहेत. महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या नगर परिषद, नगर पंचायत, महानगर पालिका आणि आता जिल्हा परिषद निवडणुकांचे निकाल असो भाजपा क्रमांक एकचा पक्ष म्हणून समोर आला आहे. लोकसभा निवडणुकीपासून तर भाजपाने देशभरात विविध निवडणुकांमध्ये घवघवीत यश मिळविले आहे. मजबूत संघटन, अभ्यासपूर्ण नियोजन आणि योग्य सामाजिक समीकरणांची मोट बांधून भाजपा मैदानात उतरते आणि यश मिळविते हा आता सिद्धांत झाला आहे. अर्थात या पाठीमागे निष्ठावान कार्यकर्त्यांचे परिश्रम आहेत. त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नातून भाजपा शिखरावर पोहोचत आहे. विविध ठिकाणचे नगराध्यक्ष असो की महापौरांची निवड करताना भाजपाने सोशल इंजिनीयरिंग साधत कार्यकर्त्यालाच संधी दिली आहे. भाजपाची प्रत्येकच निवड वैशिष्ट्यपूर्ण ठरली असून अनेकांना आश्चर्याचे धक्के बसले आहेत. त्यातीलच एक अमरावतीच्या महापौरपदासाठी निवडलेली व्यक्ती आहे. श्रीचंद तेजवानी असे त्यांचे नाव आहे. प्रसार माध्यमांमध्ये वेगवेगळी नावे चर्चेत होती. अशी सगळी नावे दूर सारत भाजपाने श्रीचंद यांना संधी देत सामाजिक समरसतेचा आणखी एक चांगला संदेश दिला आहे.



अमरावतीचे नवनिर्वाचित महापौर श्रीचंद तेजवानी हे सिंधी समाजाचे राज्यातले पहिले महापौर आहेत. यापूर्वी उल्हासनगर येथे सिंधी समाजाचे महापौर झाले आहेत. त्या व्यतिरिक्त अन्य कुठेच सिंधी समाजाला आजपर्यंत महापौरपद मिळाले नाही. भाजपाने अमरावतीत श्रीचंद यांना संधी देऊन सिंधी समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. मुळात सिंधी समाज भाजपाचा परंपरागत मतदार राहिला आहे. तो फक्त महाराष्ट्रापुरताच नाही तर देशभरात भाजपासोबत सातत्याने उभा राहतो. त्यांचे संपूर्ण श्रेय भारतरत्न लालकृष्ण अडवाणी यांना आहे. व्यवहारकुशलता व प्रामाणिकपणाच्या जोरावर सिंधी समाजाने संपूर्ण देशात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांची दखल पदोपदी घेतली जाते. राज्याच्या राजकारणात अगदी बोटावर मोजता येतील, इतकेच सिंधी समाजाचे नेते आहेत. या सर्वांकडून चांगले काम होत आहे. श्रीचंद तेजवानी महापौर झाल्यामुळे सिंधी समाज आनंदी झाला आहे. राज्यासह संपूर्ण देशातल्या सिंधी समजाकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. एका प्रमुख पदावर आपल्या समाजाची व्यक्ती विराजमान झाल्याचे अप्रूप जवळपास सर्वांनाच आहे. स्वागत समारंभातून ते दिसते आहे. वेगळेपण हे नेहमी अनमोल असते. श्रीचंद यांची राजकीय कारकीर्द भाजपातूनच सुरू झाली. पहिले ते वॉर्ड अध्यक्ष झाले. २०१२ मध्ये त्यांना नगरसेवकपदाची निवडणूक महिला आरक्षणामुळे लढता आली नाही. पण, त्यांनी काम सुरूच ठेवले. २०१७ महापालिका निवडणुकीत भाजपाने त्यांना संधी दिली आणि ते विजयी झाले. नुकत्याच झालेल्या निवडणुकीतही त्यांना सिंधीबहुल रामपुरी कॅम्प प्रभागातून भाजपाने पुन्हा उमेदवारी दिल्याने त्यांनी विजयाचा झेंडा फडकविला. भाजपाच्या २५ नरसेवकांमध्ये १७ महिला व ८ पुरुष विजयी झाले आहेत. दोन महिला सलग तिसऱ्यांदा तर १२ नगरसेवक दुसऱ्यांदा आणि उर्वरित पहिल्यांदा विजयी झाले आहेत. या सर्वांमधून ५७ वर्षीय श्रीचंद यांची निवड महापौरपदासाठी भाजपाच्या नेतृत्वाने केली. ते अमरावती महानगर पालिकेचे १७ वे तर भाजपाचे ७ वे महापौर आहेत. श्रीचंद यांचे शिक्षण जेमतेम जरी असले तरी त्यांच्याकडे उत्तम व्यावसायिक, व्यावहारिक व राजकीय ज्ञान आहे. त्यांच्या मुलाचे मोबाईल विक्रीचे दुकान आहे. अर्थात त्यांनीच ते सुरू केले होते. आता पूर्णवेळ ते राजकारणात आहेत. भाजपाने दिलेल्या संधीचे सोने करण्याचा निर्धार श्रीचंद यांचा आहे. त्यांच्या समाजबांधवांसह शहरातल्या नागरिकांच्या त्यांच्याकडून खूप अपेक्षा आहेत. गेल्या चार वर्षांपासून महापालिकेत प्रशासकराज आहे. नागरिकांना छोट्याछोट्या कामांसाठी हेलपाटे घ्यावे लागतात. तंत्रज्ञानाचा पूर्ण अभाव दिसतो. जनतेला आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासह प्रशासन गतिमान करण्याचे मोठे आव्हान श्रीचंद यांच्यासमोर राहणार आहे. महापालिकेचे उत्पन्न वाढविणे आणि त्यातून विकासकामे करण्यासाठी एक कृती आरखडा त्यांना तयार करावा लागणार आहे. तेव्हाच श्रीचंद यांची ओळख निर्माण होईल आणि भाजपाने त्यांच्यावर दाखविलेला विश्वास सार्थकी ठरेल. श्रीचंद यांना खूप शुभेच्छा! ▮

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# अग्निपुराण!

**प्रा. दिलीप जोशी**

अग्निपुराण हे प्रत्यक्ष अग्निदेवांनी सांगितलेले वेदतुल्य पुराण आहे. प्रत्यक्ष भगवान विष्णू काळाग्नी कालरुद्राग्नी रूपाने विराजमान होऊन जे सारभूत तत्त्वज्ञान सांगतात ते अग्निपुराण आहे.

''आग्नेय ही पुराणेस्मिन सर्वा विद्या प्रदर्शिताः'' यावरून या पुराणात मानवी जीवनाशी निगडित आधिदैविक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक बाबींवर चिंतन आहे हे लक्षात येते.

व्यक्तिगत आयुष्यातील सांसारिक रचना, समाजरचना, राजव्यवस्थापन, वास्तू अशा अनेक बाबींच्या आचारसंहिता या अग्निपुराणात आहेत. यालाच सर्वविद्या म्हणतात. हे पुराण स्वतः अग्निनारायण भगवंतांनी महर्षी वसिष्ठांना सांगितले आहे. म्हणजे या पुराणाचे वक्ता अग्नी आहेत. अग्निदेवता म्हणजे साक्षात विष्णू रूप आहेत.

**विष्णवे विष्णवे नित्यं विष्णवे नमः।**
**नमामि विष्णुं चित्तस्थमहंकारगतिं हरिम् ।**

हे अग्निपुराण स्वतःच विशद करते.

म्हणूनच या पुराणात प्रारंभीच भगवंताच्या मत्स्य, कूर्म, मोहिनी, वराहादी अवतारांचे वर्णन आहे. श्रीरामअवताराच्या सर्व कांडांसह विस्तृत वर्णन तथा श्रीकृष्ण अवताराचे, महाभारताचे संक्षिप्त वर्णन या पुराणात आहे.

विशेष म्हणजे या पुराणात बुद्ध अवतार आणि कल्की अवताराचाही उल्लेख आहे. सृष्टीची उत्पत्ती, स्वायंभुव मनुची वंशावळ, कश्यप आणि अदितीचे पुत्र याबाबत माहिती आहे.

या पुराणात विविध मुद्रांचे बोटांच्या स्थितीसह अभ्यासनीय संदर्भ आहेत. अंजली, वंदनी, हृदयानुगा मुद्रा अशा विविध अष्टमुद्रा दिल्या आहेत. गुरूंनी शिष्यांना द्यावा तो दीक्षा विधी, मंत्रसाधना विधी सोबत विविध पूजा प्रयोगातील सर्वतोभद्रमंडलादिचे नितांतसुंदर वर्णन इथे आहे.

रक्षाकवच असलेले अपामार्जन विधी आणि कुशापामार्जन स्तोत्र याच पुराणात आहे. कुश नावाच्या दर्भापासून बनलेले 'पवित्र' बोटात धारण करण्याचा पवित्र धारण विधी, यज्ञ विधी देऊन यज्ञसंस्था या पुराणात दिली आहे.

देवालय निर्माण शास्त्र, भूपरिग्रह, वास्तुमंडल, शालिग्राम मूर्ती, विग्रह याबाबत वास्तू विवेचन अग्निपुराणात आहेत.

भगवान विष्णूंच्या चार हातातील आयुधांच्या स्थितीनुसार केशव, नारायण अशी चोवीस नावे मूर्तींच्या स्थितीसह या पुराणात आहेत. सूर्यादी ग्रहमंडल, दिक्पाल, चौसष्ट योगिनी प्रतिमा लक्षण यावर चर्चा इथे आहे. शिवलिंग रचनेवर विस्तृत माहिती, प्राणप्रतिष्ठा, अधिवास विधी, प्रतिष्ठापना, विहिरीची पूजा, भवन निर्माण, गृहप्रवेश विधी, देवता प्रतिष्ठा, जीर्णोद्धार विधी यावर माहिती आहे. वास्तुपूजन विधी, द्वार प्रतिष्ठा विधी दिला आहे. नगर रचना शास्त्र हे वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे.

या पुराणात गंगा, यमुना, नर्मदा यांचे महत्त्व सोबत काशी, प्रयाग, गया, गया श्राद्ध याबाबत वर्णन आहे.

भारताचे सुंदर वर्णन, भूमी विस्तार, मूल्ये सोबतच इथचे ज्योतिषशास्त्र, पंचांग, कालगणना, राशी चक्र, नक्षत्र, कोट चक्र, घात चक्र, सेवा चक्र, राशी बल, त्रिनाडी चक्र, फणीश्वर चक्र अशा विविध ज्योतिष विषयक बाबींचा अभ्यास या पुराणात आहे.

काळी विद्या जसे महामारी विद्या, तंत्रविषयक सहा कर्म जसे वश्य, स्तंभन, उच्चाटन, जारण मारण यासंबधात माहिती इथे आहे. विविध तांत्रिक औषधी वनस्पती, शनी राहू, अपराजित मंत्र तथा औषधी वनस्पती अशा बाबींचेही वर्णन आहे.

लक्ष तथा कोटी होमात्मक वर्णन, महापातक वर्णन, विभिन्न प्रायश्चित्त, तिथी व्रत वर्णन, शिवरात्री व्रत, अशोक पौर्णिमा व्रत, विविध वार व्रत, विविध नक्षत्र व्रत, विविध मास व्रत, दीपदान व्रत, भीष्म पंचक व्रत, धेनुदान इत्यादी बाबत शास्त्रोक्त माहिती मिळते. संध्या विधी, गायत्री मंत्र विधी यात आहे.

राष्ट्राची सुरक्षा, प्रजेकडून घेण्यात येणारी करप्रणाली, राजधर्म पालन, विविध पुरुषार्थ, युद्धनीती अशा राज्यव्यवस्थापन विषयक बाबींवर यावर विवेचन या पुराणात आहे.

शुभाशुभ, शकुन, अपशकुन, विविध प्राणी जसे मांजर, घोडा, हत्ती, मुंगूस यांच्या दर्शनावरून होणारे शकुन-अपशकुन अशा बाबी देखील इथे येतात.

भगवान श्ररामाची राजनीती, मंत्रबळाने विविध अस्त्र, युद्धसेनेचे सहा भेद आणि बलबलाचे सहा अंग, शस्त्र लक्षण, धनुर्वेद, गदायुद्ध, मल्ल युद्ध, अशा विविध युद्ध प्रकार आणि विविध शस्त्रांचा परिचय या पुराणात आहे.

या पुराणात पैतृक संपत्तीचे अधिकारी, स्त्रीधन यापासून सीमा विवाद मग तो गावसीमा किंवा देशसीमा याबाबत नियम आहेत. वेतन, अर्थ व्यवहार दिला इथे आहे.

सिद्ध औषधी वर्णन, सर्वरोगहर वनस्पती, विविध औषधी रस, औषधी मंत्र, संजीवनी मंत्र, अश्व चिकित्सा, गज चिकित्सा, सापाचे प्रकार दिले आहेत.

शिक्षा निरूपण, नाटक निरूपण, काव्य निरूपण, नऊ रस निरूपण, रीती निरूपण, नृत्य निरूपण, अभिनय आणि अलंकार निरूपण, व्याकरण निरूपण, समास निरूपण, योग निरूपण असे विविध निरूपण या पुराणात दिले आहे.

थोडक्यात, मानवी जीवनाचे कोणतेच अंग या पुराणाने शिल्लक ठेवले नाही.

**अग्नौ प्रस्थानहुतिः सम्यग् आदित्यमुपतिष्ठते ।**
**आदित्याज्जायते स्त्रीर् वृष्तिर्वृष्टेर्नत्रं ततः प्रजाः॥**

अग्निपूजनाने दिलेल्या आहुती सूर्यनारायणाला पोचतात. त्यायोगाने पर्जन्य, वर्षावृष्टी होऊन प्रजाजनांना सुख समृद्धी प्राप्त होते.

ॐ महाज्वालाय विद्महे अग्नि मध्याय धीमहि तन्नोः अग्नि प्रचोदयात
अग्निगायत्री आपल्या जीवनावर इष्ट परिणाम करते.

खर तर अग्नीचे विविध स्वरूप आहेत. श्रौताग्नी, अलौकिक अग्नी, यज्ञाग्नि, गार्हपत्य अग्नी, दक्षिणाग्नी, आहवनिय अग्नी, वडवाग्नी, जठराग्नी, लौकिक अग्नी असे विविध अग्नी आहेत. जातवेद नावाचा अग्नी हा अरणीमंथनातून यज्ञस्थळी प्रकट होणारा अग्नी आहे.

थोडक्यात अग्निभगवान मानव आणि माधव यांना जोडणारा सेतू आहे. अग्निपुराणातील सर्व बाबी याची साक्ष देतात. ▮

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### ऑनलाईन गेम्सचा विळखा...!

दररोज वृत्तपत्रात ऑनलाईन गेम्सच्या नादात घडलेल्या हृदयद्रावक घटना वृत्तपत्रांतून समोर येत आहेत. पालकांना काळजी वाटावी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. विज्ञान युगात माणसाने फार मोठा प्रगतीचा टप्पा गाठला आहे, पण जीवघेणे खेळ म्हणजे अधोगती आहे. लहान मुले, तरुणाई या विळख्यात अडकली आहे आणि त्यांचा जीव धोक्यात आहे याची दखल घेतली पाहिजे. मुलांच्या हातातील भ्रमणध्वनी अत्यंत घातक ठरत आहे. वेळेचे भान नाही, मेंदू कार्य करत नाही, योग्य-अयोग्य याची जाणीव नाही. एक व्यसन म्हणून याची नोंद आता होऊ लागली आहे. ऑनलाईन गेम्सच्या चक्रव्यूहात अडकलेला जीव तो गेल्यावरच सुटतो हे भयानक वास्तव आहे. शालेय वय हे मुलांच्या विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे, पण इथे बौद्धिक, शारीरिक विकास खुंटला आहे असे चित्र दिसते. मुले चिडचिडी आणि संभ्रमित आहेत. मुलांना मैदानी खेळ, वाचन, छंद यासाठी वेळ नाही आणि परिवार, नाती यांची दखल देखील नाही. या सर्वांचा परिणाम त्यांच्या आयुष्याला विपरीत वळण मिळाले आहे. पालक आणि शिक्षक यांची भूमिका याबाबत अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येकाने मुलांना या भ्रमणध्वनीपासून आता दूर केले पाहिजे अन्यथा भविष्य अवघड आहे. ही विकृती जीवन संपवीत आहे. थोडा वेळ मुलांना दिला आणि त्यांना ऑनलाईन गेम्सपासून दूर ठेवले तरच यातून बाहेर पडण्याचा मार्ग गवसेल. मुले आपले भविष्य आहे आणि ती वेळीच सावरणे आपल्या हाती आहे. जागे होण्याची वेळ आली आहे.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

●● ●●

### कोपरगावला गरीब रथसाठी थांबा द्या

कोपरगाव रेल्वेस्थानकावरील प्रवाशांच्या सोयीसाठी, १२११३ पुणे-नागपूर गरीब रथला दोन मिनिटांचा थांबा देण्याची मागणी आहे. सध्या या स्थानकावर या गाडीचा थांबा नाही. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. कोपरगाव हे एक महत्त्वाचे शहर आहे आणि येथील प्रवाशांना पुणे आणि नागपूरला जाण्यासाठी इतर पर्यायांचा अवलंब करावा लागतो. गरीब रथासाठी दोन मिनिटांचा थांबा दिल्यास प्रवाशांसाठी सोयीचे आणि वेळेची बचत करणारे ठरेल. प्रवाशांच्या सोयीसाठी १२११३ पुणे-नागपूर गरीब रथला कोपरगाव रेल्वे स्थानकावर दोन मिनिटांचा थांबा देण्याची लोकांची मागणी असून रेल्वे प्रशासन मागणीचा विचार करेल आणि आवश्यक पावले उचलेल, अशी अपेक्षा आहे.

**राजेश पी. कारिया**/अकोला

●● ●●

### महाशिवरात्रीचे महत्त्व

महाशिवरात्री भगवान शिवाचा एक प्रमुख सण आहे, जो शिव-पार्वती विवाह, तांडव नृत्य आणि सृष्टीला वाचवण्यासाठी शिवांनी हलाहल विष प्राशन केल्याचे स्मरण करून साजरा केला जातो. या दिवशी उपवास, रात्रीचे जागरण आणि शिवलिंगाची पूजा करून अंधारावर ज्ञानाचा विजय आणि आत्मशुद्धी साजरी केली जाते. महाशिवरात्री ही भगवान शिव आणि माता पार्वती यांचा विवाह सोहळा म्हणून साजरे केले जाते, जे पुरुष आणि प्रकृतीच्या मिलनाचे प्रतीक आहे.



या दिवशी उपवास आणि रात्रीचे जागरण करून ध्यान केल्याने शारीरिक, मानसिक आणि आत्मिक शुद्धी होते. वैज्ञानिकदृष्ट्या ग्रहांच्या विशिष्ट स्थितीमुळे या दिवशी मानवी शरीरातील ऊर्जा नैसर्गिकरीत्या ऊर्ध्वगामी होते, ज्यामुळे ध्यान साधनेसाठी ही रात्र अत्यंत महत्त्वाची मानली जाते. प्रत्येक चंद्र महिन्यातील १४ वा दिवस किंवा प्रतिपदेच्या आधीचा दिवस शिवरात्री म्हणून ओळखला जातो. वर्षभर येणाऱ्या बारा शिवरात्रींमध्ये फेब्रुवारी-मार्च मध्ये येणाऱ्या महाशिवरात्रीला सर्वांत अधिक आध्यात्मिक महत्त्व आहे. या रात्री पृथ्वीच्या उत्तर गोलार्धाची स्थिती अशी असते की मनुष्यात नैसर्गिक ऊर्जेचा उद्रेक होतो. या दिवशी निसर्ग एखाद्या व्यक्तीला त्याच्या आध्यात्मिक शिखरावर ढकलत असतो. याचा वापर करून घेण्यासाठी, या संस्कृतीमध्ये आपण रात्रभर सुरू असणारा उत्सव साजरा करायला सुरुवात केली. नैसर्गिक ऊर्जेच्या या उद्रेकाला योग्य दिशा देण्यासाठी, रात्रभर सुरू असणाऱ्या या उत्सवातील प्राथमिक आवश्यकता म्हणजे आपण आपल्या पाठीचा कणा ताठ ठेवून संपूर्ण रात्र न झोपता, जागे राहणे. ▮

**शंकर कुळकर्णी**/९७६४४६५५७०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९४२२६१२२४५/८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Published at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# टी-२० विश्वचषकाचा थरार



## महत्त्वाचे

### कुटुंबासोबत राहणार नाहीत भारतीय खेळाडू

**नवी दिल्ली** : टी-२० विश्वचषक २०२६ दरम्यान भारतीय क्रिकेटपटू त्यांच्या कुटुंबासोबत राहू शकणार नाहीत. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) संघ व्यवस्थापनाची ती मागणी फेटाळून लावली आहे, ज्यामध्ये खेळाडूंच्या पत्नी आणि इतरांना टीम हॉटेलमध्ये एकत्र राहण्याची परवानगी मागितली होती. बीसीसीआयने स्पष्ट केले आहे की, स्पर्धेदरम्यान खेळाडूंच्या कुटुंबाला संघासोबत राहण्याची परवानगी नाही. तथापि, जर एखाद्या खेळाडूला हवे असेल तर तो आपल्या कुटुंबासाठी हॉटेलमध्ये स्वतंत्र राहण्याची व्यवस्था स्वतः करू शकतो. याची संपूर्ण जबाबदारी त्याला उचलावी लागेल. यासाठी बीसीसीआयकडून कोणतीही व्यवस्था केली जाणार नाही.

### तरुण मेश्रामला कराटे स्पर्धेत सुवर्ण पदक



सुवर्ण पदक पटकाविणारा तरुण मेश्राम प्रशिक्षक रवि भांदककरसह.

**अहेरी** : हैदराबाद येथील सारुनगर इनडोअर स्टेडियम स्पोर्ट्स ॲथॉरिटी ऑफ तेलंगणा येथे झालेल्या ५ व्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत ग्रीन बेल्ट ६० कि. ग्रॅ. वजनगटात रवि सर्स कराटे मार्शल आर्ट शाखा आलापल्लीचा लिटील मास्टर तरुण रमेश मेश्रामने प्रतिस्पर्ध्याला नॉकआऊट टु टाय करून सुवर्ण पदक प्राप्त केले आहे. ५ व्या कराटे आतंरराष्ट्रीय स्पर्धेचे आयोजक सेन्साई रामुलुगारु हैदराबाद हे होते. ही स्पर्धा दक्षिणचे सुपरस्टार सुमन तलवार गारु तथा दक्षिणचे सुप्रसिद्ध सिनेस्टार भानू चंदरगारू यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक रवि भांदककर, भानू चंदरगारू व रामुलुगारु यांच्या हस्ते तरुण मेश्रामचा शाल, श्रीफळ व शिल्ड देऊन सत्कार करण्यात आला. तरुण मेश्राम हा आलापल्ली येथील असून त्याचे स्वप्न त्यांच्या महागुरूसारखे देदीप्यमान यश संपादन करणे आहे. त्याने यापूर्वी अनेक स्पर्धांमध्ये प्रावीण्य मिळविले आहे. प्रशिक्षक रवि भांदककर व वडील माजी बीएसएफ जवान सेन्साई रमेश मेश्राम हे त्याचे आदर्श आहेत. या यशाबद्दल तरुणचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

### भारत-पाकिस्तान सामन्यासाठी विमान तिकिटांत तेजी

**नवी दिल्ली** : टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये भारत-पाकिस्तान सामन्याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. कोलंबोमध्ये होणाऱ्या या सामन्यासाठी विमान तिकिटांचे दर वाढले आहेत. स्पर्धेतील बहुचर्चित भारत विरुद्ध पाकिस्तान सामना १५ फेब्रुवारीला नियोजित वेळेनुसार कोलंबोमध्ये होणार आहे. या सामन्यावर स्पर्धेला सुरुवात होण्यापूर्वी प्रश्नचिन्ह होते. मात्र, सामना होणार हा निर्णय जाहीर होताच मुंबई ते कोलंबोचे विमान भाडे १० हजारांहून अधिक वाढल्याचे दिसले. भारत विरुद्ध पाकिस्तान हा हायव्होल्टेज सामना आहे. या सामन्यातून मोठा आर्थिक फायदाही आयसीसी, आयोजक आणि दोन्ही क्रिकेट बोर्डांनाही होतो. इतकेच नाही, तर या सामन्यासाठी चाहत्यांमध्येही उत्सुकता असल्याने तिकिटांची मागणीही मोठ्या प्रमाणात असते. मुंबई-कोलंबो-मुंबई या फेरीसाठी आता विमानभाडे जवळपास ६० हजारांच्या आसपास गेल्याचे दिसत आहे. इंडिगोच्या एअरलाईनच्या वेबसाईट नुसार १३ ते १५ फेब्रुवारीदरम्यान साधारण १५ हजार ते ५० हजारादरम्यान विमानाचे भाडे आहे.

### भारत करणार बेल्जियम, अर्जेंटिनाविरुद्ध दमदार सुरुवात

**राऊरकेला** : भारतीय पुरुष हॉकी संघ बुधवारपासून बेल्जियम आणि अर्जेंटिना विरुद्ध एफआयएच प्रो लीगमध्ये आपल्या मोहिमेची चांगली सुरुवात करण्याचा प्रयत्न करेल, गेल्या वेळी भारत आठव्या स्थानावर होता. भारत बुधवारी बलाढ्य बेल्जियमविरुद्ध, त्यानंतर गुरुवारी अर्जेंटिनाविरुद्ध खेळणार आहे. भारतीय संघ शनिवारी पुन्हा एकदा बेल्जियमविरुद्ध खेळणार असून रविवारी अर्जेंटिनाविरुद्धच्या मोहिमेची सांगता करणार आहे. अनुभवी आंतरराष्ट्रीय खेळाडू आणि युवा प्रतिभा यांचा समतोल मिलाफ असलेला भारतीय संघ जगातील दोन अव्वल मानांकित संघांविरुद्धच्या परिस्थितीचा फायदा घेण्याचा प्रयत्न करेल. भारताने प्रो लीगमध्ये अद्याप आपली मोहीम सुरू केलेली नाही.

# नेदरलॅण्ड्सचा ७ गड्यांनी विजय

◆ **नवी दिल्ली, १० फेब्रुवारी**

बास डी लीडेच्या ४८ चेंडूत नाबाद ७२ धावा आणि दोन गड्यांच्या जोरावर नेदरलॅण्ड्सने मंगळवारी येथे झालेल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेतील अ गटातील सामन्यात नामिबियाचा सात गडी आणि १२ चेंडू राखून पराभव केला.

नाणेफेक जिंकून नामिबियाला फलंदाजीला आमंत्रित करणाऱ्या नेदरलॅण्ड संघाने आपल्या गोलंदाजांच्या शिस्तबद्ध कामगिरीमुळे त्यांना आठ गडी बाद १५६ धावांवर रोखले. डी लीडेने तीन षटकांत २० धावांत दोन तर लोगान व्हॅन बीकने तीन षटकांत १३ धावांत दोन बळी घेतले.

प्रत्युत्तरात डी लीडेच्या ४८ चेंडूत केलेल्या नाबाद ७२ धावांच्या खेळीच्या जोरावर नेदरलॅण्ड्सने १८ षटकांत तीन गड्यांच्या मोबदल्यात १५९ धावा केल्या. डी लीडेने आपल्या डावात पाच चौकार आणि चार षटकार मारले आणि कॉलिन अकरमन (२८ चेंडूत ३२) सोबत तिसऱ्या गड्यासाठी ७० धावांची भागीदारीही केली. त्याच्या अष्टपैलू कामगिरीसाठी त्याला सामनावीर म्हणून निवडण्यात आले.




अरुण जेटली स्टेडियमवर टी-२० विश्वचषकाचा हा पहिलाच सामना होता पण शाळेच्या परीक्षा आठवड्याच्या मध्यावर असल्याने मैदान रिकामेच होते. या मैदानावर भारतीय संघ १२ फेब्रुवारीला नामिबियाशी खेळणार आहे.

नेदरलॅण्ड्सची सुरुवात खराब झाली आणि तिसऱ्याच षटकात मॅक्स ओ'डॉडला (७) बर्नार्ड स्कोल्झने पॅव्हेलियनमध्ये पाठवले. १५ चेंडूत २८ धावा करून मायकेल लुईसही बाद झाला, त्यानंतर डी लीडे आणि अकरमन यांनी संघाला विजयापर्यंत नेले.

तत्पूर्वी, नामिबियासाठी लॉफ्टी ईटन (३८ चेंडूत ४२ धावा) आणि सलामीवीर जॉन फ्रायलिंक (२६ चेंडूत ३० धावा) यांनी दुसऱ्या गड्यासाठी ५० धावांची भागीदारी केली. याशिवाय जेजे स्मितने १५ चेंडूत २२ धावा केल्या.

नेदरलॅण्ड्ससाठी डी लीडेशिवाय व्हॅन बीकने तीन षटकांत १३ धावांत दोन बळी घेतले आणि फिरकीपटू आर्यन दत्तने तीन षटकांत १३ धावांत एक बळी घेतला. नवीन चेंडूने सुरुवात करून, दत्तने पहिले षटक अत्यंत किफायतशीर टाकले ज्यामध्ये केवळ चार धावा झाल्या. दुसऱ्या षटकात लॉरेन स्टीनकॅम्पने व्हॅन बीकला चौकार मारून हात उघडण्याचा प्रयत्न केला पण पुढच्याच षटकात दत्तने त्याला पॅव्हेलियनमध्ये पाठवून नेदरलँड्सला पहिले यश मिळवून दिले. एका चेंडूवर स्टीनकॅम्प चुकला पण स्कॉट एडवर्ड्सने विकेटच्या मागे तत्परतेने यष्टिचित करण्यात कोणतीही चूक केली नाही. यावेळी केवळ दहा धावा धावफलकावर होत्या. सलामीवीर फ्रायलिंकने चौथ्या षटकात फ्रेड क्लासेनला शॉर्ट मिडविकेटवर चौकार आणि नंतर गोलंदाजाला षटकार ठोकून ११ धावा घेतल्या. मात्र, दुसऱ्या टोकाकडून दत्तने आपली किफायतशीर गोलंदाजी सुरू ठेवली आणि केवळ पाच धावा दिल्या.

पॉवरप्लेच्या सहा षटकांत नामिबियाची धावसंख्या एक गडी बाद ४० धावा होती. कॉलिन अकरमनला सहाव्या षटकात ईटनने षटकार आणि फ्रायलिंकने चौकार ठोकला. ईटन आणि फ्रायलिंक यांच्यातील धोकादायक भागीदारी व्हॅन बीकने मोडली ज्याने फ्रायलिंकला यष्टीमागे मागे झेलबाद केले. या दोन्ही फलंदाजांनी दुसऱ्या गड्यासाठी ५० धावा जोडल्या. कर्णधार गेरहार्ड इरास्मस काही विशेष करू शकला नाही आणि नऊ चेंडूत १८ धावा केल्यानंतर तो बास डी लीडेच्या चेंडूवर मिडविकेटवर दत्तकरवी झेलबाद झाला. त्याचवेळी एका टोकाला दमदार खेळ करणाऱ्या ईटनचेही अर्धशतक हुकले आणि ३८ चेंडूत एक चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ४२ धावा करून तो व्हॅन बीकचा बळी ठरला. नवीन फलंदाज जेजे स्मितने १६व्या षटकात व्हॅन डेरवर दोन षटकार खेचून १६ धावा घेतल्या, परंतु डी लीडेच्या पुढील षटकात त्याची विकेट गमावली. त्याने १५ चेंडूत २२ धावांची खेळी केली. ◂(वृत्तसंस्था)

# आयर्लंडविरुद्ध ऑस्ट्रेलियाचा वरचष्मा

◆ **कोलंबो, १० फेब्रुवारी**

अलिकडील खराब कामगिरी आणि दोन प्रमुख वेगवान गोलंदाजांना दुखापत होऊनही, ऑस्ट्रेलियन संघ बुधवारी येथे होणाऱ्या आयर्लंड विरुद्धच्या टी-२० विश्वचषक सामन्यात विजयाचा प्रबळ दावेदार म्हणून सुरुवात करेल.

पॅट कमिन्स, मिचेल स्टार्क आणि जोश हेझलवूड हे आधुनिक क्रिकेटमधील सर्वांत मजबूत वेगवान गोलंदाजांपैकी एक आहेत आणि ऑस्ट्रेलियाला या प्रतिष्ठित स्पर्धेत त्यांची उणीव भासेल.

कमिन्स आणि हेझलवूड दुखापतींमुळे बाहेर पडले होते, तर डावखुरा वेगवान गोलंदाज स्टार्कने आंतरराष्ट्रीय स्तरावर या फॉरमॅटमधून निवृत्ती घेतली आहे. त्याच्या अनुपस्थितीत, नॅथन एलिस वेगवान गोलंदाजी आक्रमणाचे नेतृत्व करू शकतो, परंतु तो देखील दुखापतीच्या छायेत आहे. हॅमस्ट्रिंगच्या समस्येमुळे बिग बॅश लीग फायनलमधून बाहेर पडल्यानंतर तो अद्याप एकही सामना खेळलेला नाही.

अनुभवी लेगस्पिनर डम झाम्पा पाठीच्या दुखापतीतून सावरल्यानंतर स्पर्धेत उतरत आहे. उपखंडातील सध्याची परिस्थिती पाहता या स्पर्धेत ऑस्ट्रेलियाच्या आशा पल्लवित करण्यासाठी झाम्पा निर्णायक ठरेल.

२०२२ मध्ये ऑस्ट्रेलियाने शेवटची ही स्पर्धा जिंकली होती. गेल्या वेळी त्यांचा संघ उपांत्य फेरीत भारताकडून पराभूत झाला होता. कूपर कॉनोली आणि मॅट कुहनेमन या सहकारी फिरकीपटूंसह अनुभवी झाम्पा ऑस्ट्रेलियाचे फिरकी आक्रमण मजबूत करेल. ऑस्ट्रेलियाला त्यांचे ग्रुप स्टेजचे चारही सामने श्रीलंकेत खेळायचे आहेत.

ऑस्ट्रेलियाचे गोलंदाजी युनिट निःसंशयपणे पूर्वीच्या तुलनेत कमकुवत दिसते. ऑस्ट्रेलियाकडे फलंदाजीची आवश्यक ताकद आहे आणि संघात अनेक अष्टपैलू खेळाडू आहेत जे प्रतिस्पर्धी संघांना अडचणीत आणू शकतात.

पॉल स्टर्लिंगच्या नेतृत्वाखालील आयर्लंडला ब गटातील पहिल्या सामन्यात सह-यजमान श्रीलंकेकडून २० धावांनी पराभव पत्करावा लागला आणि आता त्यांना ऑस्ट्रेलियाचे कडवे आव्हान असेल.

श्रीलंकेविरुद्धच्या पॅचमध्ये आयर्लंडने चांगली कामगिरी केली, परंतु विजय मिळवण्यासाठी ऑस्ट्रेलियाविरुद्ध सर्वोत्तम कामगिरी करणे आवश्यक आहे.

आयर्लंड संघातील १५ खेळाडूंपैकी १२ खेळाडू असे आहेत जे गेल्या टी-२० विश्वचषकातही खेळले होते. टीम टेक्टर, बेन कॅलिट्झ आणि मॅथ्यू हम्फ्रीज हे त्याच्या संघात नवीन खेळाडू आहेत.

या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत आयर्लंड नवव्यांदा सहभागी होत आहे. त्याची सर्वोत्तम कामगिरी २००९ आणि २०२२ मध्ये होती जेव्हा त्याने माजी विजेता वेस्ट इंडीज आणि इंग्लंडला पराभूत करून दुसरी फेरी गाठली. यातून प्रेरणा घेण्याचा आयर्लंड नक्कीच प्रयत्न करेल. ◂(वृत्तसंस्था)

### आजचे सामने

**अफगाणिस्तान विरुद्ध दक्षिण आफ्रिका**
**स्थळ** : नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद
**वेळ** : सकाळी ११ वाजतापासून

**ऑस्ट्रेलिया विरुद्ध आयर्लंड**
**स्थळ** : आर. प्रेमदासा स्टेडियम कोलंबो
**वेळ** : दुपारी ३ वाजतापासून

**इंग्लंड विरुद्ध वेस्ट इंडीज**
**स्थळ** : वानखेडे स्टेडियम, मुंबई
**वेळ** : संध्याकाळी ७ वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# ॲलन, सेफर्टच्या खेळीने न्यूझीलंड विजयी

## सुपर ८ मध्ये प्रवेशाचा मार्ग मोकळा

◆ **चेन्नई, १० फेब्रुवारी**

२०२६ च्या टी-२० विश्वचषकात न्यूझीलंडने सलग दुसरा विजय मिळवला. न्यूझीलंडच्या आक्रमक फलंदाजीमुळे चेन्नईमध्ये यूएईविरुद्ध एकतर्फी विजय मिळाला. प्रथम फलंदाजी करताना कर्णधार मोहम्मद वसीम (नाबाद ६६) आणि अलिशान शराफू (५५) यांच्या अर्धशतकांमुळे यूएईने १७३ धावा केल्या. प्रत्युत्तरात, टीम सेफर्ट (नाबाद ८९) आणि फिन ॲलन (नाबाद ८४) यांनी न्यूझीलंडला फक्त १५.२ षटकांत १० गड्यांनी विजय मिळवून दिला. सामनावीर टीम सेफर्ट ठरला.




न्यूझीलंडच्या विजयाचे शिल्पकार सलामीवीर टीम सेफर्ट आणि फिन ॲलन

यूएईने पॉवरप्लेमध्ये ५० धावा करत चांगली सुरुवात केली. तथापि, त्यांनी डावादरम्यान एक गडी गमावला. यूएईने ११ षटकांत फक्त ८४ धावाच केल्या. त्यानंतर दोन्ही फलंदाजांनी खेळण्याची पद्धत बदलली आणि ६९ चेंडूंत १०० धावांची भागीदारी पूर्ण केली. येथून, संघ सहजपणे २०० धावांपर्यंत पोहोचेल असे वाटत होते. दरम्यान, शराफू बाद झाला आणि तेथून सामना बदलला.

पुढील तीन षटकांमध्ये फक्त १० धावा आणि दोन गडी बाद झाले. त्यामुळे यूएईचा डाव पूर्णपणे डळमळीत झाला. वसीमने १४ व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर चौकार मारला. त्यानंतर, पुढील १९ चेंडूंसाठी एकही चौकार नव्हता. तथापि, सँटनरने १८ व्या षटकात फिलिप्सकडे चेंडू दिला. जो महागडा ठरला. या षटकात एकूण २७ धावा मिळाल्या. दोन षटकार आणि एका चौकाराव्यतिरिक्त, वाईड आणि नो-बॉलसह असंख्य अतिरिक्त धावा होत्या. तथापि, १४ षटकांनंतर न्यूझीलंडने उल्लेखनीय पुनरागमन केले आणि फिलिप्सची २७ धावांची षटके वगळता उर्वरित पाच षटकांमध्ये फक्त २७ धावा झाल्या. टी-२० विश्वचषकात ही यूएईची सर्वोच्च धावसंख्या आहे.

१७४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, न्यूझीलंडने सेफर्ट आणि ॲलनच्या मदतीने सावध सुरुवात केली. पहिल्या तीन षटकांत न्यूझीलंडने फक्त २२ धावा केल्या होत्या, परंतु चौथ्या षटकात खेळण्याची गती बदलली. ॲलनने जुनैद सिद्दीकीचे एका षटकारासह स्वागत केले, त्यानंतर आणखी दोन चौकार आणि एक षटकार मारला. या २२ धावांच्या षटकात न्यूझीलंडच्या सलामीवीरांना सलामीची संधी मिळाली. संघाचे अर्धशतक फक्त ४.३ षटकांत पूर्ण झाले. पाचव्या षटकातून १४ आणि पॉवरप्लेच्या शेवटच्या षटकातून २० धावा आल्या. अशाप्रकारे, न्यूझीलंडने पहिल्या सहा षटकांत ७८ धावा करून यूएईवर पूर्ण दबाव आणला. न्यूझीलंडचे सलामीवीर सेफर्ट आणि ॲलन यांनी पहिल्या १० षटकांतच युएईला सामना जवळजवळ संपवला. सेफर्टने केवळ २३ चेंडूत स्पर्धेतील सलग दुसरे अर्धशतक पूर्ण केले. १० षटकांनंतर न्यूझीलंडने ११९ धावा केल्या. ॲलननेही अवघ्या २७ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. त्यानंतर, फक्त औपचारिकता बाकी होती. दोन्ही फलंदाजांनी एकामागून एक चौकार मारले. सलग दुसऱ्या मोठ्या विजयासह, न्यूझीलंडचा आता सुपर ८ मध्ये प्रवेश करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ◂(वृत्तसंस्था)

# अफगाणिस्तानची नजर विजय मिळविण्यावर

◆ **अहमदाबाद, १० फेब्रुवारी**

अफगाणिस्तानचा बुधवारी येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा टी-२० विश्वचषक सामना करा किंवा मरो असा होईल कारण प्रत्येक गटातून फक्त दोन संघ सुपर एटमध्ये पोहोचतील.

ड गटात दक्षिण आफ्रिका अव्वल आहे आणि इतर संघांपेक्षा खूप पुढे आहे. कॅनडावर ५७ धावांनी विजय मिळवल्याने त्यांना केवळ दोन गुणच मिळाले नाहीत तर त्यांची निव्वळ धावगती २.८५० वर पोहोचली. दुसरीकडे, अफगाणिस्तान न्यूझीलंडकडून (१.१६२) पाच गड्यांनी पराभूत झाल्यानंतर -१.१६२ च्या निव्वळ रनरेटसह तिसऱ्या स्थानावर आहे. पुढील फेरी गाठण्याच्या आशा जिवंत ठेवण्यासाठी त्याला केवळ सामना जिंकावाच लागणार नाही तर निव्वळ धावगती सुधारावी लागेल.

अशा परिस्थितीत दक्षिण आफ्रिका आणि अफगाणिस्तान यांच्यात रोमांचक सामना होण्याची शक्यता आहे. अफगाणिस्तान संघ कधीही हार मानत नाही आणि दक्षिण आफ्रिकेला याची चांगलीच जाणीव असेल. दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड आणि अफगाणिस्तानसारख्या संघांच्या उपस्थितीमुळे तो ग्रुप ऑफ डेथ बनला आहे. न्यूझीलंडविरुद्ध प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तानने गुलबदिन नायबच्या ३५ चेंडूत ६३ धावांची खेळी आणि इतर फलंदाजांच्या उपयुक्त योगदानाच्या जोरावर १८२ धावांची मजबूत धावसंख्या उभारली.

पण चेपॉकमध्ये न्यूझीलंडविरुद्ध टी-२० क्रिकेट खेळण्याचा अनुभव असलेल्या नूर अहमदला संघातून वगळण्याचा निर्णय अफगाणिस्तानसाठी हानिकारक ठरला कारण त्याच्या जागी वेगवान गोलंदाजांना संधी देण्यात आली जे त्यांची रणनीती अंमलात आणण्यात अपयशी ठरले. ◂(वृत्तसंस्था)



इटलीतील लिविग्नो येथे २०२६ च्या हिवाळी ऑलिम्पिकमध्ये मंगळवारी स्नोबोर्डिंग प्रशिक्षण सत्रादरम्यान जपानचा रयुसेई यामादा सराव करताना

# इंग्लंड सर्वोत्तम कामगिरीच्या प्रतीक्षेत

◆ **मुंबई, १० फेब्रुवारी**

नेपाळविरुद्धच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेतील क गटातील पहिल्या सामन्यात निराशा टाळणाऱ्या इंग्लंड संघाला बुधवारी वेस्ट इंडीजविरुद्धच्या महत्त्वाच्या आणि बरोबरीच्या सामन्यात अधिक आत्मविश्वासाने कामगिरी करावी लागणार आहे.

दोन्ही संघांनी यापूर्वी दोनदा ही स्पर्धा जिंकली आहे आणि स्पर्धेतील सह-यजमान आणि गतविजेत्या भारताप्रमाणे तिसऱ्यांदा विजेतेपद मिळवण्याचा त्यांचा विचार आहे. त्यांच्यासमोर सातत्य राखण्याचे मोठे आव्हान असेल कारण टी-२० क्रिकेटमध्ये विजय-पराजयाचे अंतर खूपच कमी असू शकते. यामध्ये कोणत्याही संघाला कमी लेखणे ही मोठी चूक ठरू शकते.

नेपाळने एका क्षणी त्यांना पराभवाच्या उंबरठ्यावर आणले होते, तेव्हा इंग्लंडला गेल्या सामन्यात याची जाणीव झाली. अखेरीस इंग्लंडने हा सामना चार धावांनी जिंकला आणि हे पाहता हॅरी ब्रूकच्या नेतृत्वाखालील संघाला भविष्यात सावध राहावे लागेल.

इंग्लंड देखील क गटात आपले स्थान सुधारण्यास उत्सुक असेल कारण विजय मिळवूनही ते ०.२०० च्या निव्वळ धावगतीसह तिसऱ्या स्थानावर आहेत तर स्कॉटलंड दोन गुण आणि ०.९५० च्या निव्वळ धावगतीने दुसऱ्या स्थानावर आहे. वेस्ट इंडीजचेही दोन गुण आहेत आणि त्यांची धावगती १.७५० आहे.

तथापि, वेस्ट इंडीजने हे समजणे आवश्यक आहे की त्रुटीचे अंतर फारच मर्यादित आहे, विशेषतः अशा मैदानावर जेथे पहिल्या दोन सामन्यांमध्ये खेळपट्टी गोलंदाजांना अनुकूल आहे.

भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांनी या मैदानावर फलंदाजीत चांगली कामगिरी केली. वानखेडे स्टेडियमवर छोट्या चौकारांचा परिणाम नेपाळच्या फलंदाजीवरही दिसून आला. वेस्ट इंडीजने आपल्या मोहिमेची शानदार सुरुवात केली. शिमरॉन हेटमायरची ६४ धावांची जलद खेळी आणि रोमारियो शेफर्डच्या पाच गडी बादमुळे त्यांनी स्कॉटलंडचा सहज पराभव केला. ◂(वृत्तसंस्था)

# घरामीच्या २९९ धावांनी बंगाल उपांत्य फेरीत

## आंध्रप्रदेशचा एक डाव आणि ९० धावांनी पराभव

◆ **कल्याणी, १० फेब्रुवारी**

येथे खेळल्या गेलेल्या रणजी चषकाच्या तिसऱ्या उपउपांत्य सामन्यात बंगालने आंध्र प्रदेशचा एकतर्फी सामना खेळून एक डाव आणि ९० धावांनी पराभव केला आणि उपांत्य फेरीत प्रवेश केला. १५ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या उपांत्य फेरीत त्यांचा सामना पहिल्यांदाच पात्र ठरलेल्या जम्मू आणि काश्मीरशी होईल. बंगालच्या सुदीप कुमार घरामीला त्याच्या २९९ धावांच्या शानदार खेळीसाठी सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले.



सामनावीर सुदीप कुमार घरामी फटका मारताना

कर्णधार रिकी भुईच्या ८३ धावांच्या जोरावर आंध्रने पहिल्या डावात २९५ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल बंगालने ६२९ धावांचा प्रचंड धावसंख्या उभारली आणि ३३४ धावांची आघाडी घेतली. घरामीच्या व्यतिरिक्त, हबीब गांधीने ९५, सुमंता गुप्ताने ८१ आणि मोहम्मद शमीने ५३ धावा केल्या.

चौथ्या दिवसअखेर, आंध्रने ६४ धावांत तीन गडी गमावले होते. नितीश कुमार रेड्डीने शेवटच्या दिवशी ९० धावांची उत्तम खेळी केली पण संघाला मोठ्या पराभवापासून वाचवू शकला नाही. नितीश व्यतिरिक्त, इतर कोणत्याही फलंदाजाने प्रभाव पाडला नाही आणि शेवटी, त्रिपुराण विजयच्या ४६ धावांनी आंध्रला २०० धावांचा टप्पा ओलांडण्यास मदत केली. दुसऱ्या डावात बंगालकडून शाहबाज अहमदने सर्वाधिक चार बळी घेतले. शमीने फलंदाजीने उत्कृष्ट कामगिरी केली, परंतु संपूर्ण सामन्यात तो फक्त एकच बळी घेऊ शकला.

बंगाल आणि जम्मू-काश्मीर यांच्यातील उपांत्य सामन्याव्यतिरिक्त, कर्नाटक आणि उत्तराखंड यांच्यातील उपांत्य सामना १५ फेब्रुवारी रोजी खेळला जाईल. ◂(वृत्तसंस्था)

# विजेत्या आरसीबी महिला संघाच्या प्रत्येक खेळाडूला मिळणार चेतक सी २५

◆ **पुणे, १० फेब्रुवारी**

जगातील सर्वांत मौल्यवान दुचाकी आणि तीन चाकी वाहन कंपनी असलेल्या बजाज ऑटो लिमिटेडने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू महिला संघाचे या वर्षीच्या महिला टी-२० लीगमधील विजयाबद्दल अभिनंदन केले. ते विजेत्या संघातील प्रत्येक खेळाडूला संपूर्ण हंगामात दाखवलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल एक नवीन चेतक सी २५ भेट देणार असल्याचे घोषित केले.

ही मान्यता एका संस्मरणीय हंगामाची आहे ज्यामध्ये चेतकने आरसीबी महिला संघाचा अधिकृत राइड पार्टनर म्हणून काम केले. संघ आणि बंगळुरू शहर पुन्हा एकदा या मोहिमेत एकत्र आले. आत्मविश्वास, ताकद आणि महत्त्वाकांक्षेने भरलेले, प्रगती, ऊर्जा आणि आधुनिक शहरी ओळख यावर सामायिक विश्वास दर्शवितात.

चेतक सी २५ हे चेतक श्रेणीतील नवीन मॉडेल आहे, जे जलद गतीच्या शहरी जीवनासाठी विकसित केले गेले आहे. त्याची हलकी रचना आणि स्थिर रचना शहरांमध्ये आरामदायी आणि विश्वासार्ह राईड अनुभव प्रदान करते. सी २५ महिला संघाच्या विजेतेपद मोहिमेतील गुणांचेच प्रतीक आहे. यामध्ये चपळता, दबावाखाली संयम राखण्याची क्षमता आणि प्रत्येक आव्हानाला आत्मविश्वासाने स्वीकारण्याची क्षमता यांचा समावेश आहे. ते चेतकच्या ताकद, स्थिरता आणि विश्वासार्ह कामगिरी या मूलभूत मूल्यांचे देखील प्रतीक आहे.

याप्रसंगी बोलताना, बजाज ऑटो लिमिटेडचे मार्केटिंग अध्यक्ष सुमित नारंग म्हणाले, २०२६ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू महिला संघाचे त्यांच्या ऐतिहासिक विजयाबद्दल हार्दिक अभिनंदन. त्यांची दृढता आणि आत्मविश्वास चेतकच्या मूल्यांशी पूर्णपणे जुळते.

ही भागीदारी आमच्या मजबूत वारशाला नवीन पिढीच्या महत्त्वाकांक्षेशी जोडते. या प्रभावी कामगिरीचा आनंद साजरा करण्यासाठी, आम्ही महिला २० संघातील प्रत्येक खेळाडूला एक नवीन चेतक सी २५ भेट देत आहोत.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे सीओओ राजेश मेनन म्हणाले, चेतकने या हंगामात आमच्या संघात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे, ज्यामुळे मैदानावर आणि मैदानाबाहेर चाहत्यांचा सहभाग आणखी वाढला आहे. वा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### सह्याद्री फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्समध्ये यश

**सांगोला, दि. १० फेब्रुवारी-**
मेथवडे (ता.सांगोला) येथील सह्याद्री फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी कै. लक्ष्मीबाई फडतरे कॉलेज ऑफ फार्मसी, कळंब, इंदापूर व लँगबसटेक युनिव्हर्सिटी न्यू जर्सी, अमेरिका, आफ्रिका, आशिया, स्कॉलर्स ग्लोबल नेटवर्क लंडन यांच्या संयुक्त विद्यमाने इंटरनॅशनल समिट ऑन फ्युचर रेडी फार्मसी, इंजिनीरिंग अँड मॅनेजमेंट सायन्स या विषयावर आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्समध्ये पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत सहभाग घेऊन सना जमादार या विद्यार्थिनीच्या सादरीकरणाने तृतीय क्रमांक पटकावला. या यशस्वी विद्यार्थिनीचे संस्थेच्या अध्यक्षा अनिता इंगवले, प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांनी सन्मान केला. तसेच एम.फार्मसी द्वितीय वर्षाचे विद्यार्थी वृषाली सरतापे, अनुप कुंभार, आकांक्षा झाडबुके व एम.फार्मसी प्रथम वर्षाचे श्रुती देशमुख, शुभांगी चव्हाण, सानिका पुजारी, शीतल खताळ या विद्यार्थ्यांनी केमिकल मॉलिक्युलर डॉकिंग व फायटोकेमिकॅल स्टडी अँड हर्बल टॅबलेट या विषयावर आपले सादरीकरण करत या आंतरराष्ट्रीय पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी बनवलेले पोस्टर व माहिती सादरीकरण याचे परीक्षकांनी कौतुक केले. यशस्वी विद्यार्थ्यांना डॉ.ए.एम.तांबोळी, डॉ.एन.ए.तांबोळी यांनी मार्गदर्शन केले.





### अकलूजच्या विविध उपक्रमाद्वारे रमाई जयंती साजरी

**अकलूज, दि. १० फेब्रुवारी-**
येथील रमामाता महिला मंडळ ,रमामाता चौक यांच्या वतीने त्यागमुर्ती माता रमाई यांच्या १२८ व्या जयंती निमित्त तीन दिवसाच्या रमाई मोहत्सवाचे आयोजन करुन विविध कार्यक्रमाच्या माध्यमातुन अभिवादन करण्यात आले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी त्यागमूर्ती रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अकलूज येथील रमामाता महिला मंडळाच्या वतीने रमाई मोहत्सव वर्ष २ रे आयोजित करण्यात आले होते. यामध्ये आठ दिवस रमाई यांच्या चारित्र्य ग्रंथाचे वाचन करण्यात आले तर महीलांनच्या संगीत खुर्ची, प्रश्न मंजुषा,रांगोळी स्पर्धा व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. दि.६ फेब्रुवारी रोजी लहान मुलींच्या डान्स स्पर्धा पार पडल्या, तद्नंतर महीलांनी रात्री १२ वाजता पाळणा बांधुन रमाई जन्म उत्सव साजरा केला. शनिवार दि.७ फेब्रुवारी रोजी सकाळी महामानवाच्या व माता रमाईच्या प्रतिमांचे पुजन करुन वंदना सुत्तपठण घेण्यात आले. सायंकाळी रमामाता महिला मंडळ व आंबेडकरनगर मित्र मंडळ यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाईच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती.

### फवारणी औषध पिऊन आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. १० फेब्रुवारी-**
घरच्यांनी लग्नाला नकार दिल्याने पिकावर फवारणी करणारे औषध पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न एक युवकाने केला. श्रीराज लक्ष्मण खानापुरे वय १८ राहणार कुंभारी ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर यांनी कुंभारी ते होटगी जाणाऱ्या रस्त्याच्या मध्ये असलेल्या मैदानात लग्नाला घरच्यांनी नकार दिल्याने त्या रागाचा भरात त्यांनी पिकावर फवारणी करण्याचे औषध पिल्याने त्रास होत असल्याने उपचारासाठी अश्विनी रुग्णालय कुंभारी येथे दाखल करण्यात आले, त्यानंतर रेफरने शासकीय रुग्णालय येथे त्यांना दाखल करण्यात आल्याची माहिती सिव्हिल पोलीस चौकीत नोंद झाली आहे

### मध्यप्रदेशच्या व्यक्तीचा सोलापूर शहरात मृत्यू

**सोलापूर, दि. १० फेब्रुवारी-**
मध्यप्रदेशच्या व्यक्ती सोलापुर शहरात एका ट्रकच्या ड्रायव्हर सीटवर बेशुद्ध अवस्थेत आढळला त्याला पोलिसांच्या मदतीने शासकीय रुग्णालयात दाखल केले असता उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. याबाबतची अधिकची माहिती अशी की, राधेश्याम कालू धनगर वय ४५ रा. वार्ड क्रमांक १२ झोन नंबर एक, नगरपरिषद धर्मपुरी राज्य मध्य प्रदेश हा दि. ९ फेब्रुवारी रोजी प्रीतम सेल्स मार्केट यार्ड सोलापूर येथे एम.एच. १८ बी.जी ८६९१ या क्रमांकाच्या ट्रकमध्ये ड्रायव्हर सीटवर बेशुद्ध अवस्थेत आढळून आल्याने त्याला उपचारासाठी जेलरोडचे पोलीस राठोड यांनी शासकीय रुग्णालय सोलापूर येथे दाखल केले असता उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे

### केबल वायरच्या साह्याने घेतला गळफास

**सोलापूर, दि. १० फेब्रुवारी-**
स्वतःच्या शेतात अज्ञात कारणाने चिंचेच्या झाडाला केबल वायरच्या साह्याने एका व्यक्तीने गळफास घेतला, त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. उपचारापूर्वी त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. याबाबतची अधिक माहिती अशी की, नागेश माळप्पा सुरवसे वय २३ राहणार नांदणी ता. दक्षिण सोलापूर यांनी नांदणी येथील स्वतःच्या शेतातील चिंचेच्या झाडाला केबल वायरच्या साह्याने अज्ञात कारणाने गळफास घेतलेल्या स्थितीत मिळून आल्याने त्यांना नातेवाईकांनी खाली उतरवून बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी शासकीय रुग्णालय सोलापूर येथे भाऊ लक्ष्मण सुरवसे यांनी दाखल केले असता उपचारापूर्वी त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे

## निधन वृत्त...

### बबन मदने



**पिलीव, दि. १० फेब्रुवारी-**
माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती येथील बबन सिताराम मदने (वय ६५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, जावई, सुना नातवंडे असा परिवार आहे.

# जि.प.च्या अध्यक्षपदी कोण होणार विराजमान?

### संपूर्ण जिल्ह्याचे लागले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० फेब्रुवारी-**
आष्टी मतदार संघातील विजयराज डोंगरे वगळता सोलापूर झेडपीमध्ये नवे चेहरे निवडून आले आहेत. सोलापूर झेडपीचे अध्यक्षपद ओबीसी सर्वसाधारण गटासाठी राखीव असून, याचे नेतृत्व कोणाला मिळेल? याकडे आता जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. नव्या सभागृहात भाजपचे ३८, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ११, शिवसेनेचे आठ, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे पाच आणि स्थानिक आघाड्यांचे सहा सदस्य असणार आहेत. विरोधी पक्षनेतेपद अर्थातच राष्ट्रवादी अजित पवार गटाकडे जाणार आहे.

### पंचायत समितीचे विजयी उमेदवार

*** अक्कलकोट**

**चपळगाव** : सागर कल्याणशेट्टी, भाजप
**कुरनूर** : विनोद मोरे,भाजप
**वागदरी** : अप्पासाहेब किवडे, भाजप
**शिरवळ** : गणेश मोरे, शिवसेना शिंदे
**दहिटणे** : आशा इंगळे, भाजप
**मंगरूळ** : रश्मी हिप्परगे,भाजप
**सुलेर जवळगे** : उत्तम वाघमारे,भाजप
**नागणसूर** : वैष्णवी सलगरे,भाजप
**तोळनूर** : शितल म्हेत्रे,शिवसेना शिंदे
**सलगर** : भिमण्णा सोलापुरे, शिवसेना शिंदे
**मुगळी** : संगीता पाटील, शिवसेना शिंदे

*** सांगोला**

**चिकमहूद** : बाळासाहेब बंडगर, शिवसेना शिंदे
**महूद** : सोनाली पाटील ,शिवसेना शिंदे
**वाकी शिवणे** : स्मिता गोडसे ,शेकाप
**एखतपूर** : सुवर्णा नवले ,शेकाप
**वाढेगाव** : वंदना शेळके ,शेकाप
**जवळा** : पुनम इंगवले ,स्थानिक आघाडी
**कडलास** : राणी पाटील, शिवसेना शिंदे
**अजनाळे** : बापू जावीर ,दिपक आबा गट
**राजुरी** : सदाशिव दबडे , भाजप
**चोपडी** : अजय सरगर , शिवसेना शिंदे
**कोळा** : छाया कोळेकर , शेकाप
**हातीद** : अमृत पाटील, शेकाप
**सोनंद** : काजल काशीद , शेकाप
**घेरडी** : अशोक चोरमले, शेकाप

*** दक्षिण सोलापूर**

**कासेगाव** : विजय राठोड,भाजप
**बोरामणी** : वर्षा पटणे,भाजप
**कुंभारी** : सूरज पाटील,भाजप
**धोत्री** : शिल्पा बिराजदार, भाजप
**वळसंग** : बलवान गोतसुर्वे,भाजप
**होटगी** : अंबिका पाटील,भाजप
**हत्तूर** : पंचप्पा धनशेट्टी, भाजप
**औराद** : संदीप टेळे,भाजप
**मंद्रुप** : मळसिध्द मुगळे, भाजप
**कंदलगाव** : प्रियांका आसबे,भाजप
**भंडारकवठे** : प्रियांका कुबसंगे,शिवसेना शिंदे
**निबर्गी** : अंबिका दुपारगुडे,भाजप

*** उत्तर सोलापूर**

**नान्नज** : सुनील भोसले,भाजप
**वडाळा** : वैशाली शिलवंत, राष्ट्रवादी
**बीबी दारफळ** : सुनीता बारसकर, भाजप
**मार्डी** : तेजस्विनी बोराडे,भाजप
**कोंडी** : धनाजी भोसले, शिवसेना शिंदे
**तिऱ्हे** : ऋतुजा बंडगर, भाजप

*** माढा**

**भोसरे** : आशिष राजपूत, राष्ट्रवादी
**मानेगाव** : पंडित देशमुख, भाजप
**उपळाई बुद्रुक** : नितीन झाडबुके,भाजप
**कुर्डू** : अमृता पाटील, राष्ट्रवादी
**बेंबळे** : पोपट अनपट, राष्ट्रवादी शरद पवार
**मोडनिंब** : प्राजक्ता पाटील,राष्ट्रवादी
**टेंभुर्णी** : प्रतिभा खरात, भाजप
**रोपळे** : छायादेवी कारंडे, राष्ट्रवादी
**दारफळ** : सोनाली साठे ,अपक्ष
**भुताष्टे** : स्वाती गिड्डे, अपक्ष
**अकोले खुर्द** : संभाजी पाटील, राष्ट्रवादी
**रांझणी** : सुनीता पाटील, भाजप
**पिंपळनेर** : बिभीषण डांगे, भाजप
**लऊळ** : सोनाली माळी, भाजप

*** पंढरपूर**

**करकंब** : राहुल पुरवत,भाजप
**उंबरे** : शहाजी मुळे,राष्ट्रवादी
**भोसे** : पूनम पवार,भाजप
**गुरसाळे** : महादेव जाधव, राष्ट्रवादी
**रोपळे** : विजया भोसले, राष्ट्रवादी
**सुस्ते** : सावली गायकवाड, राष्ट्रवादी
**पुळुज** : ज्योती पांढरे, भाजप
**गोपाळपूर** : रंजना शिंदे,भाजप
**वाखरी** : निखिल गोसावी, भाजप
**पटवर्धन कुरोली** : प्रमिला झांबरे,राष्ट्रवादी
**भाळवणी** : मोहन शिंदे,भाजप
**पळशी** : अक्कबाई लोखंडे, राष्ट्रवादी
**टाकळी** : डॉ वंदना पाटील, भाजप
**खर्डी** : डॉ शुभम आगवणे, भाजप
**कासेगाव** : प्रमोद देशमुख,राष्ट्रवादी
**सरकोली** : प्रियांका जाधव, स्थानिक आघाडी



*** बार्शी**

**उपळाई ठोंगे** : मिनाक्षी रोंगे,भाजप
**आगळगाव** : सुरेखा मुंढे, भाजप
**पांगरी** : शरद बसवंत, भाजप
**कारी** : किरण घुले, भाजप
**उपळे दुमाला** : ऐश्वर्या महानवर, भाजप
**गौडगाव** : संजय भड,भाजप
**बावी आ** : राजेंद्र सुरवसे,भाजप
**पानगाव** : भीमा गव्हाणे, भाजप
**मालवंडी** : विमल काटे, भाजप
**सासुरे** : संतोष निंबाळकर, भाजप
**मानेगाव** : जयमाला जाधव, भाजप
**शेळगाव आर** : सविता साबळे,भाजप

*** माळशिरस**

**गुरसाळे** : दशरथ शेळके, भाजप
**दहिगाव** : कोमल खिलारे, भाजप
**मांडवे** : राजश्री पालवे, भाजप
**कण्हेर** : अनंतराव शेंडगे, भाजप
**भांबुर्डी** : प्रवीण वाघमोडे, राष्ट्रवादी शरद पवार
**फोंडशिरस** : सोनल पाटील, राष्ट्रवादी शरद पवार
**मेडद** : युवराज झंजे, राष्ट्रवादी शरद पवार
**संग्रामनगर** : निशा गिरमे, राष्ट्रवादी शरद पवार
**माळीनगर** : महादेव साबळे, राष्ट्रवादी शरद पवार
**लवंग** : ऋतुजा पराडे, भाजप
**जांभुड** : अप्पासाहेब पाटील, राष्ट्रवादी शरद पवार
**बोरगाव** : मनिषा नाईकनवरे, राष्ट्रवादी शरद पवार
**वेळापूर** : विमल जानकर, राष्ट्रवादी शरद पवार
**यशवंतनगर** : वैष्णवी मोहिते पाटील, राष्ट्रवादी शप
**निमगाव** : दत्तात्रय मगर, शिवसेना शिंदे
**गोरडवाडी** : रेश्मा माने, शिवसेना शिंदे
**पिलीव** : नम्रता पुकाळे, भाजप
**तांदुळवाडी** : मनिषा पाटील, राष्ट्रवादी शप

*** मंगळवेढा**

**संत दामाजी नगर** : जयश्री शिंदे (स्थानिक आघाडी)
**बोराळे** : जयश्री कवचाळे,भाजप
**हुलजंती** : अर्जुन माल्लाळे, भाजप
**मरवडे** : मोहिनी गणपाटील,भाजप
**चोखामेळानगर** : दिपाली ताड, भाजप
**लक्ष्मी दहिवडी** : विनायक यादव, भाजप
**भोसे** : आप्पासो निकम, भाजप
**रड्डे** : सुरेश कांबळे, स्थानिक आघाडी

*** मोहोळ**

**आष्टी** : अमित व्यवहारे, राष्ट्रवादी
**खंडाळी** : गणेश मुळे, राष्ट्रवादी
**नरखेड** : उल्का पाटील, भाजप
**शिरापूर (सो)** : निलम मसलकर, भाजप
**सावळेश्वर** : पार्वती गावडे, भाजप
**कामती बु.** : कोमल आवताडे, भाजप
**सय्यद वरवडे** : बाळासाहेब गायकवाड, राष्ट्रवादी शप
**पोखरापूर** : संजीव खिलारे, भाजप
**पेनूर** : संगीता वसेकर, शिवसेना शिंदे
**टाकळी सिकंदर** : अमरिका कापसे, भाजप
**कुरूल** : धनाजी माळी,राष्ट्रवादी
**घोडेश्वर** : अस्लम चौधरी, भाजप

*** करमाळा**

**रावगांव** : सध्या कांबळे, भाजप
**वीट** : पुजा ढेरे, भाजप
**वांगी** : सोनाली तकीक, भाजप
**कोर्टी** : नाना झाकणे, भाजप
**चिखलठाण** : वनमाला सरडे, राष्ट्रवादी
**हिसरे** : भरत अवताडे, राष्ट्रवादी
**केतूर** : आजिनाथ विघ्ने, राष्ट्रवादी
**साडे** : दशरथ घाडगे, राष्ट्रवादी
**उमरड** : आदिती पाटील, स्थानिक आघाडी
**जेऊर** : ललिता शिरसकर, स्थानिक आघाडी
**केम** : ज्ञानेश्वर बिचितकर, स्थानिक आघाडी
**पांडे** : स्वप्निल काळे, स्थानिक आघाडी

## माढ्यात बारावीसाठी १५ केंद्रातून ६ हजार २०५ विद्यार्थी परीक्षा देणार



### गोपाळराव देव प्रशालेत गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १० फेब्रुवारी -**
येथील गोपाळराव देव प्रशाला व आगाशे कनिष्ठ महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रथमच केंद्र सुरू असून आज परीक्षेच्या पहिल्या दिवशी परीक्षेसाठी आलेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे कार्याध्यक्ष अॅड मिलींद कुलकर्णी, कार्यवाहक राम दोशी, संचालक संतोष कुलकर्णी, प्राचार्य धनंजय केसकर, उपप्राचार्य जानकर व दीक्षित मॅडम यांनी स्वागत केले

तालुक्यात अकलूज कॉलेज ११४८, दाते प्रशाला नातेपुते ४८५, मॉडेल विविधांगी प्रशला माळीनगर ३०६, महर्षी शंकरराव मोहिते पाटील प्रशाला वेळापूर ३२०, बाबासाहेब पाटील विद्यालय सदाशिवनगर २४३, शंकरराव मोहिते इंग्लिश स्कूल धवलनगर ३२५, श्रीराम विद्यालय पानीव ३४१, विवेकानंद प्रशाला माळशिरस १७६, शिवशंभो प्रशाला कन्हेर ६१६, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील विद्यालय नातेपुते ३२२, जाधव वाडी ६४४, भिवाई प्रशाला पिरळे ५०५, लोकविकास विद्यालय वेळापूर २१५, गोपाळराव देव प्रशाला माळशिरस २१६, आगाशे प्रशाला बोरगाव ३४३ असे ६२०५ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. तालुक्यातील १५ परीक्षा केंद्रातून ६ हजार २०५ विद्यार्थी १२ वीची परीक्षा देणार असून परीक्षेची तयारी झाली असून दहा फेब्रुवारीपासून परीक्षा झाल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी यांनी दिली.

## सोलापुरात होणार जिजाऊ आणि शिवबांच्या विचारांचा जागर



### शिवजन्मोत्सव पाळणा सोहळ्याच्या तयारीला वेग

### राष्ट्रमाता जिजाऊंच्या वेशभूषेत महिलांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० फेब्रुवारी-**
गुरुवार, दि.१९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आहे. बुधवार, दि.१८ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या मध्यरात्री आयोजित केलेल्या शिवजन्मोत्सव पाळणा सोहळ्याच्या तयारीला वेग आला आहे. यात महिला वर्ग जिजाऊंच्या वेशभुषेत सहभागी होणार आहेत. यानिमित्ताने सोलापुरात जिजाऊ आणि शिवबांच्या विचारांचा जागर होणार आहे.

शिवजन्मोत्सव सोहळ्याच्या अनुषंगाने डाळिंबी आड मैदान येथे बैठक घेण्यात आली. तीत हा निर्णय घेण्यात आला. जिजाऊ पाळणा सोहळ्याचे स्वरुप, कार्यक्रमाची रुपरेषा, शिस्तबध्द आयोजन, वेळेचे नियोजन, महिलांचा सहभाग याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. 'आई तू जिजाऊ हो' ही यंदाच्या वर्षीची संकल्पना आहे, असे सांगण्यात आले.

राष्ट्रमाता जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराजांवर घडवलेले संस्कार, त्याग, मातृत्व आणि राष्ट्रनिष्ठा या मूल्यांचे स्मरण व्हावे, या उद्देशाने हा पाळणा सोहळा साजरा केला जातो. यातून सामाजिक भान, राष्ट्रप्रेम आणि सांस्कृतिक जाणीव अधिक दृढ होत असल्याचे मत चंद्रिका चव्हाण, शोभा मोरे, नलिनी जगताप, सुधा अळ्ळीमोरे, प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांनी व्यक्त केले.

यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेविका श्रीदेवी फुलारे, श्रध्दा पवार, मनोरमा सपाटे, मंदाकिनी तोडकरी, अलका भवर, मृण्मयी गवळी आणि युपीएससी परीक्षेमध्ये यश मिळविलेल्या वैष्णवी गायकवाड यांचा गौरव करण्यात आला. यावेळी पाळणा गीताचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. कार्याध्यक्षा उत्तरा बरडे आणि चारुशीला जगदाळे यांनी प्रास्ताविक केले.

याप्रसंगी मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्ट अध्यक्ष पद्माकर काळे, माजी उपमहापौर सुषमा घाडगे, नगरसेवक शिवाजी वाघमोडे, उत्सव अध्यक्ष जयवंत सलगर यांच्यासह श्रीकांत घाडगे, राजकुमार काकडे, श्रीकांत डांगे, संजीवनी मुळे, नीलिमा शितोळे, रेखा सलगर, प्रतिभा काळे, तेजा घाडगे, उज्ज्वला साळुंखे, रेश्मा घुले, अर्चना बरडे, सुनंदा साळुंखे, देवीदास घुले, सचिन स्वामी आदी उपस्थित होते.

## बिल्डर असोसिएशन ऑफ इंडियातर्फे महापौर, उपमहापौरांचा सत्कार

### सभागृहनेते नरेंद्र काळे यांचाही सन्मान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० फेब्रुवारी-**
बिल्डर असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर सेंटरतर्फे नवनिर्वाचित महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर तसेच सभागृह नेते नरेंद्र काळे यांचा सत्कार करण्यात आला.

असोसिएशनच्या सोलापूर सेंटरचे अध्यक्ष संतोष कलकुटगी आणि यशवंत पाथरूट यांच्या हस्ते फेटा बांधून, शाल परिधान करून, पुष्पगुच्छ देऊन नूतन महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर तसेच सभागृह नेते नरेंद्र काळे यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी असोसिएशनचे अध्यक्ष संतोष कलकुटगी म्हणाले, नूतन महापौर विनायक कोंड्याल हे चौथ्यांदा निवडून आले आहेत. विकसनशील असलेले सोलापूर विकसित सोलापूर होण्याच्या दिशेने पाऊल टाकत आहे. अशा काळात विनायक कोंड्याल यांच्यासारखे विकासाची दृष्टी असणारे नगरसेवक महापौर झाल्यामुळे शहराच्या सर्वांगीण प्रगतीचा वेग निश्चित वाढणार आहे. कोणत्याही शहराच्या विकासात बांधकाम उद्योजकांचेदेखील योगदान आवश्यक असते. त्यामुळे बिल्डर असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर सेंटरदेखील सोलापूर शहराच्या विकासात आपला वाटा उचलेल अशी ग्वाही असोसिएशनचे अध्यक्ष संतोष कलकुटगी यांनी दिली. उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर या उच्चशिक्षित आहेत. शहराच्या विकासाबाबत त्यांना तळमळ आहे. त्यामुळे त्यांच्या उपमहापौरपदाच्या कार्यकाळात त्यांच्याकडूनही अनेक सकारात्मक कामे निश्चितपणे होतील. सभागृह नेते नरेंद्र काळे हेदेखील अभियंता असून त्यांना यापूर्वीचा सभागृहातील कामकाजाचा, शहर विकासाचा मोठा अनुभव आहे. त्यामुळे त्यांच्या अनुभवाचाही फायदा शहराला होणार आहे, असेही असोसिएशनचे अध्यक्ष संतोष कलकुटगी याप्रसंगी म्हणाले.

यावेळी बिल्डर असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर सेंटरचे संतोष कलगुटगी, अशोक गांधी, राजेश देशमुख, अमर बिराजदार, मनोज म्हेत्रस, युवराज चुंबळकर, सलीम शेख, रामभाऊ दुधाळ, यशवंत पाथरूट, व्यंकटेश कोटा, सुजित पाटोळे, हनुमंत कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## पिलीवमध्ये भाजपाच्या विजयाचा जल्लोष



**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १० फेब्रुवारी-**
नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत पिलीव जिल्ह्य परिषद व पंचायत समिती गणात झालेल्या चुरशीच्या लढतीत भाजपाला दैदीप्यमान यश मिळाले आहे. या विजयाबद्दल पिलीव येथील बाजारपेठेतून पिलीव परीसरातील भाजपा कार्यकर्त्यांनी फटाक्याची आतिषबाजी करीत तसेच गुलालाची मुक्त उधळण करीत मोठ्या जल्लोषात विजयी मिरवणूक काढण्यात आली.

भाजपाचे चंद्रकांत ज्ञानेश्वर जाधव यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे रणजितसिंह जयसिह जाधव यांच्यावर ६४७ मतांनी मात करीत विजय संपादन केला तर पिलीव पंचायत समिती गणात भाजपचे पश्चिम विभागाचे जिल्हाध्यक्ष तथा जलनायक शिवराज पुकळे यांच्या पत्नी नम्रता पुकळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे सोलापूर जिल्ह्या परिषदेचे माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती संग्रामसिंह जहागिरदार यांच्या पत्नी यज्ञासेना जहागिरदार यांचा अत्यंत चुरशीने झालेल्या लढतीत ४२७ मतांनी मात करीत रोमहर्षक विजय संपादन केला. तसेच दहीगाव जिल्ह्या परिषद गटातून भाजपचे माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या पत्नी संस्कृती सातपुते यांनी माळशिरस तालुक्याचे विद्यमान आमदार उत्तम राव जानकर यांचे चिरंजीव जिवन जानकर यांचा पराभव करीत विजय संपादन केला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


# सगळ्यांचे अंदाज फोल; पालकमंत्री गोरेंनी आणली झेडपीवर भाजपाची सत्ता




- जिल्ह्यात ३७ सभा घेत ३८ जागा आणल्या निवडून
- इतिहासात पहिल्यांदाच भाजपाचा होणार अध्यक्ष
- नगरपालिका, महापालिकेनंतर सोलापूर जिल्हा परिषदही आली भाजपच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० फेब्रुवारी-**

सगळ्यांच्या अंदाज फोल ठरवत पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वात भाजपने जिल्हा परिषदेवर एक हाती सत्ता मिळवली. त्यांनी केलेले योग्य नियोजन, सर्वांची बांधलेली मोट, शतप्रतिशत भाजपाचा नारा यामुळे हे शक्य झाले.. भाजप जिल्ह्यात खोलवर रुजवण्याचा त्यांचा प्रयत्न सफल होताना दिसतोय. याचा फायदा भविष्यातील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत होणार आहे. जिल्ह्यातील दोन खासदार तसेच ११ पैकी सहा आमदार हे विरोधी पक्षाचे आहेत. विरोधी पक्षाच्या आमदाराच्या मतदार संघातील भाजपाच्या नेत्यांना पालकमंत्र्यांनी ताकद दिली.

जिल्ह्याची संपूर्ण प्रचाराची जबाबदारी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी स्वतःच्या खांद्यावर घेतली. सकाळी सहा ते रात्री बारापर्यंत सभा, गाठीभेटी, रॅली असे दिवसातील १८ तास पालकमंत्री गोरे प्रचारात व्यस्त होते. जिल्ह्यात त्यांनी तब्बल ३७ सभा घेतल्या. स्वतःच्या मान खटाव मतदारसंघातील निवडणुकीत कमी वेळ देता आला त्यामुळे नुकसान ही सहन करावे लागले मात्र सोलापूर जिल्ह्यात सभा आणि नियोजनासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी झोकून काम केले. जिल्हा परिषदेची ही निवडणूक पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी एक हाती लढवली. निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर आणत विरोधकांचा आवाज क्षीण करुन टाकला. केंद्रात आणि राज्यात असलेली भाजपाची सत्ता याचा फायदा जिल्ह्यातील विविध विकासकामांसाठी होणार आहे हे पटवून दिले. जिल्ह्याचा विकास करायचा असेल तर झेडपीवर भाजपाची सत्ता महत्त्वाची असल्याचे सांगत विकासाच्या मुद्द्यावर विरोधकांना घेरले. . सोलापूर जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच भाजपची एकहाती सत्ता आली. ६८ पैकी ५९ जागा लढवून ३८ जागा भाजपने जिंकल्या. सोमवारी आलेल्या निकालावरून गोरे यांचा दबदबा वाढल्याचे दिसते

## नगरपालिका, महापालिकेनंतर झेडपी, आठ पंचायत समिती ताब्यात

- नगरपालिका निवडणूकीत पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वात सर्वात जास्त १३१ नगरसेवक जिल्ह्यात निवडून आले. चार नगरपालिकांमध्ये भाजपाचा नगराध्यक्ष झाला
- महापालिका निवडणूकीत पालकमंत्री गोरे यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने सोलापूर महापालिकेच्या १०२ पैकी ८७ नगरसेवक निवडून आले
- दोन्ही दणदणीत विजयानंतर पालकमंत्री गोरे यांच्या नेतृत्वात जिल्हा परिषदेत ६८ पैकी ३८ सदस्य निवडून आले. ११ पैकी तब्बल आठ पंचायत समिती भाजपाच्या ताब्यात आल्या.
- जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच झेडपीत भाजपाचा अध्यक्ष होणार

## शत प्रतिशन भाजपाचा विधान परिषद, लोकसभा, विधानसभेत फायदा

नगरपालिका, महानगरपालिकेनंतर भाजपने सोलापूर जिल्ह्यात प्रथमच पक्षाच्या चिन्हावर झेडपी निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. चिन्हावर पक्षाला यश मिळावे यासाठी पालकमंत्री गोरे जिल्ह्यातील भाजपाचे आमदार, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी दिवसरात्र मेहनत घेतली. जिल्ह्यात भाजप खोलवर रुजवण्यासाठी प्रयत्न केले. याचे फलित भाजपाला मिळाले. जिल्हा परिषदेत तसेच आठ पंचायत समितीत एकहाती सत्ता मिळाली. याचा फायदा येणाऱ्या विधान परिषद तीन वर्षानी होणाऱ्या लोकसभा तसेच विधानसभा, निवडणूकीत होणार असल्याचे दिसते.













लातूर
दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूरच्या महापौर - उपमहापौरांनी स्वीकारला पदभार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० फेब्रुवारी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या नूतन महापौर जयश्री सोनकांबळे, उपमहापौर एड. स्नेहल उटगे यांनी मंगळवारी आपला पदभार स्वीकारला. यावेळी आमदार अमित देशमुख यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

लातूर मनपाच्या सार्वत्रिक निवडणुकीत आ. अमित देशमुख यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस - वंचित बहुजन आघाडीने ७० पैकी ४७ जागा जिंकून मंडपावर निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. यामध्ये एकट्या ४३ जागा जिंकण्याचा पराक्रम काँग्रेसने केला आहे. मागच्या मनपा निवडणुकीत ३६ जागा जिंकून सत्ता मिळवणाऱ्या भाजपाला या निवडणुकीत मात्र केवळ २२ जागांवर समाधान मानावे लागले. नूतन महापौर - उपमहापौर यांनी आपल्या नेत्यांच्या प्रमुख उपस्थितीत पदभार स्वीकारताना आपल्यावर विश्वास टाकणाऱ्या आ. अमित देशमुख यांच्या तसेच सामान्य लातूरकरांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा आपण प्रयत्न करू असे सांगितले. नूतन पदाधिकाऱ्यांचा आ. अमित देशमुख यांनी शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आ. अमित देशमुख यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना काँग्रेसच्या नेतृत्वात लातूर शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आपण आणि आपले सर्व सहकारी नगरसेवक प्रयत्नशील राहू,असे आश्वासन दिले. यावेळी मनपा आयुक्त मानसी मीना यांच्यासह मनपाचे सर्व अधिकारी - कर्मचारी, विद्यमान नगरसेवक तसेच माजी पदाधिकारी उपस्थित होते.



## विविध वृत्त...

### आज जिल्हा विधी सेवा प्राधिकरण मार्फत कायदेविषयक मार्गदर्शन

**लातूर :** जिल्ह्यातील सर्व आजी, माजी सैनिक, वीरमाता, वीरपत्नी, माजी सैनिक विधवा व त्यांचे अवलंबित यांच्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणमार्फत बुधवार, ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर हे यावेळी महसूल विषयक, कौटुंबिक वादविवाद संदर्भातील अडीअडचणी जाणून घेण्यासाठी, त्यावर योग्य ते कायदेविषयक मार्गदर्शन व आवश्यक ती मदत करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. तरी लातूर जिल्ह्यातील सर्व आजी, माजी सैनिक, विधवा व त्यांचे अवलंबित यांनी लातूर जिल्हा सैनिक कार्यालय येथे आवश्यक त्या कागदपत्रासोबत उपस्थित राहावे, असे आवाहन लातूर येथील जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.

### राजमाता जिजामाता संकुलातर्फे प्राचार्या शुभांगी काळे यांचा सत्कार

**लातूर :** येथील शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या संचालकपदी प्राचार्या शुभांगी विक्रम काळे यांची निवड झाल्याबद्दल राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाच्यावतीने सोमवारी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते आमदार विक्रम काळे आणि प्राचार्या शुभांगी काळे यांचा सत्कार करण्यात आला. शिवछत्रपती शिक्षण संस्था आणि राजर्षी शाहू कॉलेजचे नाव शिक्षणातील आगळ्या वेगळ्या पॅटर्नमुळे देशभरात गाजत आहे. मी राजर्षी शाहू महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. आज या संस्थेची संचालक म्हणून मला काम करण्याची संधी मिळाली आहे, ही माझ्यासाठी खूप अभिमानाची बाब आहे, असे सांगून संस्था आणि कॉलेजच्या प्रगतीसाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही प्राचार्या शुभांगी काळे यांनी दिली. प्राचार्या शुभांगी काळे यांना शिक्षण क्षेत्रातील कामाचा चांगला अनुभव आहे. या अनुभवाच्या जोरावर त्या शिक्षण क्षेत्रात उत्तम कामगिरी करतील, असे आमदार विक्रम काळे म्हणाले. तर प्राचार्या शुभांगी काळे यांच्या या निवडीमुळे मुलींचे प्रश्न मार्गी लागतील व 'शाहू पॅटर्न'ला चांगली दिशा मिळेल, असा विश्वास प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी व्यक्त केला. यावेळी शांताबाई वसंतराव काळे, कवि योगीराज माने, विपुल काळे, राजमाता जिजामाता विद्यालयाचे समन्वयक राजीव मुंढे, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर आदी उपस्थित होते.

### दयानंदमध्ये सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड

**लातूर :** दयानंद कला महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ करिता सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाच्या माध्यमातून महाविद्यालयात विविध समाज उपयोगी उपक्रम राबविले जातात. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या अनमोल मार्गदर्शनानुसार सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचे समन्वयक प्रा. डॉ.रामेश्वर खंदारे यांनी मुलाखतीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे कलागुण व कौशल्य पाहून या अभ्यास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची शै. वर्ष २०२५ - २६ करिता निवड केली. याप्रसंगी प्रा.स्फूर्ती समुद्रे प्रा. चैतन्य शिंदे यांचेही अनमोल सहकार्य लाभले. या अभ्यास मंडळाचे नुतन अध्यक्ष म्हणून वसंत कुलकर्णी, उपाध्यक्ष कामाक्षा मुदाळे, सचिव त्रिमुख इगवे, कोषाध्यक्ष विमल पाल, सोशल मिडीया संयोजक देवांश पाचंगे ,प्रसिद्धी प्रमुख विशाल भांगुरे, कलामंच प्रमुख निलेश वाघमारे, तसेच सदस्य म्हणून सोनिया कांबळे ,स्वाती जाधव ,अमृता काळे, अश्विनी चव्हाण, शुभम जानापुरे ,अभिषेक ठाकूर यांची निवड करण्यात आली.

# 'कचरा मुक्त लातूर'साठी यशस्वी लढा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० फेब्रुवारी :** लातूर शहर स्वच्छ, सुंदर आणि हरित व्हावे, ही केवळ घोषणा न ठेवता ती प्रत्यक्षात उतरवण्याचे काम गेल्या साडेसहा वर्षांपासून अखंड २४४६ दिवस 'आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन' निःस्वार्थपणे करत आहे. कचरा मुक्त लातूर हे स्वप्न साकारण्यासाठी फाउंडेशनने सुरू केलेला हा सामाजिक लढा आज शहरासाठी प्रेरणादायी,यशस्वी ठरत आहे.



वृक्ष लागवड व वृक्ष संगोपनासोबतच शहर स्वच्छतेसाठी सुरू असलेल्या या अभियानात मागील साडेसहा वर्षांत तब्बल १२४ ठिकाणी स्वच्छता मोहिमा राबवण्यात आल्या आहेत. या सर्व मोहिमांची तारीख व ठिकाणानुसार सविस्तर यादी जाहीर करण्यात आलेली असून, हे कार्य केवळ आकडेवारीपुरते मर्यादित नसून त्यामागे समाजाप्रती असलेली जबाबदारीची भावना स्पष्टपणे दिसून येते.

लातूर शहरातील सर्व प्रमुख दुभाजक (डिव्हायडर) ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनच्या सदस्यांद्वारे *वारंवार स्वच्छ करण्यात आलेले आहेत. विशेषतः पावसाळ्यात दुभाजकांमध्ये वाढलेले गवत काढून ते स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी फाउंडेशनच्या सदस्यांनी सातत्याने पार पाडली आहे. याशिवाय शहरातील विविध ग्रीन बेल्ट, मंदिरे, सार्वजनिक ठिकाणे, तसेच मोकळे प्लॉट येथे साचलेला कचरा काढून स्वच्छता करण्यात आली. अनेक ठिकाणी वर्षानुवर्षे कचऱ्याचे ढीग असलेली ठिकाणे आज स्वच्छ व देखणी दिसत आहेत.विशेष सामाजिक उपक्रमांतर्गत भित्तीपत्रके मुक्त लातूर ही मोहिम राबवण्यात आली. शहरातील अनेक भिंतींवर बेकायदेशीररीत्या चिकटवलेली जाहिरातीची पत्रके काढून भिंती स्वच्छ करण्यात आल्या, ज्यामुळे शहराच्या सौंदर्यात लक्षणीय बदल झाला.

शहरात कचरा रस्त्यावर व मोकळ्या जागेत टाकला जाण्याचे मूळ कारण शोधताना, अनेक लहान व्यापारी, पानपट्टी चालक, फेरीवाले व छोटे व्यावसायिक यांच्याकडे कचरा साठवण्यासाठी पेट्याच नसल्याचे लक्षात आले. या समस्येवर ठोस उपाय म्हणून आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन तर्फे ७०० पेक्षा अधिक कचरा पेट्यांचे मोफत वितरण करण्यात आले. हा उपक्रम 'कचरा मुक्त लातूर' च्या दिशेने टाकलेला एक महत्त्वाचा पाऊल ठरला आहे.

आपल्याकडे प्रतिवर्षी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. अनंत चतुर्दशी दिवशी गणरायाच्या विसर्जनासाठी विहिरी व नद्यांकडे मोठी गर्दी होत असते. मात्र यामुळे पाण्याचे प्रदूषण व निर्माल्यांच्या प्लास्टिक पिशव्यांमुळे पर्यावरणाला मोठा धोका निर्माण होतो. ही बाब लक्षात घेऊन आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशन च्या सदस्यांनी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी निर्माल्य संकलन केंद्र उभारले. तसेच ताडपत्रीचा वापर करून पर्यावरणपूरक हौद प्रतिवर्षी तयार केला जातो. याच हौदामध्ये गणेशमूर्ती विसर्जन करण्याचे आवाहन लातूरकरांना केले जाते. प्रतिवर्षीच या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवतात. आज या सर्व कार्यामुळे *सामान्य लातूरकर ग्रीन लातूर वृक्ष फाउंडेशनच्या कार्याचे मनापासून कौतुक करत आहेत. कोणतीही प्रसिद्धी, आर्थिक लाभ किंवा राजकीय पाठबळ न घेता सुरू असलेले हे कार्य शहरातील नागरिकांना स्वच्छतेसाठी पुढे येण्याची प्रेरणा देत आहे.

## रेणापुरात काँग्रेस २, भाजप - मनसे 1 जागेवर विजयी

**तभा वृत्तसेवा/ईश्वर बद्दर**

**रेणापूर, दि. १० फेब्रुवारी :** रेणापूर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या चार गटासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली त्यामध्ये कॉंग्रेसचे दोन,भाजपचा एक, मनसेचा एक उमेदवार विजयी झाले आहेत. तर पंचायत समितीच्या आठ गणात भाजप तीन, कॉंग्रेस तीन, तर मनसेचे दोन उमेदवार विजयी झाले.



जिल्हा परिषद चार गटाचे विजयी उमेदवार पानगाव मनसेचे डॉ. सुनील नागरगोजे, खरोळा सौ.शिवकन्या महेंद्र गोडभरले,पोहरेगाव सौ.मनीषा गंगासिंह कदम कामखेडा सौ. आशाताई शिवाजीराव भिसे या विजयी झाल्या. पंचायत समिती पानगाव गणातुन मनसेच्या सौ. श्रीदेवी प्रकाश गालफाडे, कोष्टगाव गणातून मनसेच्या सौ.मोनिका रवी सूर्यवंशी, कारेपुर गणातून भाजपाच्या सौअंजली राजेश काळे, खरोळा गणातून भाजपाच्या सौ.शितल प्रताप राऊतराव कामखेडा गणातून भाजपचे शरद दरेकर, मोटेगाव गणातून कॉंग्रेसचे उद्धव जाधव, पोहरेगाव गणातून कॉंग्रेसचे तात्याराव वाघमारे, निवाडा गणातुन कॉंग्रेसचे बालाजी गोटके विजयी झाले.

जिल्हा परीषद पानगाव गटातून उमेदवाराना मिळालेली मते : मनसेचेडॉ सुनील नागरगोजे ७८०६ मते घेऊन विजयी झाले, कॉंग्रेसचे गणेश तुरूप ४६१५ मते घेतली,भाजपाचे सतीश आंबेकर ४२१५ मते, खरोळा जिल्हा परिषद गट भाजपच्या उमेदवार सौ.शिवकन्या महेंद्र गोडभरले या ९३६८ मते घेऊन विजयी झाल्या तर कॉंग्रेसच्या सौ रुपाली विलास भोसले यांना ८११३ मते मिळाली. कामखेडा जिल्हा परिषद गटातुन कॉंग्रेसच्या उमेदवार सौ.आशा शिवाजी भिसे ६८७१ मते घेऊन विजयी झाल्या तर भाजपच्या सरीता शंकर भिसे यांना ६८६९ मते मिळाली तर शिदे सेनेच्या उमेदवार आशा राजेंद्र दाणे यांना ३६३७ मते मिळाली. पोहरेगाव जिल्हा परिषद गटाच्या कॉंग्रेसच्या उमेदवार सौ मनिषा गंगासिंह कदम ९९४८ मते होऊन विजयी झाल्या तर भजपच्या सौ. मनिषा दशरथ सरवदे यांना ८६०६ मते मिळाली.

## विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास वृध्दीसाठी दयानंद महाविद्यालयात गुलाब पुष्पाने स्वागत



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० फेब्रुवारी :** बारावी बोर्ड परीक्षेच्या तणावातून विद्यार्थ्यांनी मोकळा श्वास घ्यावा तसेच आनंदी, तणावमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडाव्यात, या उद्देशाने दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद कला महाविद्यालयात प्रति वर्षाप्रमाणे बारावी बोर्ड परीक्षार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन उत्साहात स्वागतपर कार्यक्रमाचे आयोजन उपप्राचार्य तथा केंद्र संचालक डॉ. दिलीप नागरगोजे यांनी केले.

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष तथा शालेय समितीचे अध्यक्ष ललितभाई शाह व सचिव रमेश बियाणी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. हळुवार सुमधुर बासरीचे सूर, रंगीबेरंगी रांगोळ्यांची आकर्षक आरास, विविध फुग्यांनी सजवलेला परिसर व प्रवेशद्वार यामुळे संपूर्ण महाविद्यालयाचा परिसर मंगलमय झाला होता. या प्रसन्न वातावरणात बारावी बोर्ड परीक्षार्थ्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.

या स्वागत समारंभासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तृप्ती अंधारे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत आत्मविश्वासाने परीक्षा देण्याचा सल्ला दिला. परीक्षेबाबत काही विद्यार्थ्यांच्या मनात अनामिक भीती व हुरहुर असते. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावणे, आत्मविश्वास वाढवणे तसेच तणावमुक्त व भीतीमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्यासाठीच हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, प्रा. डॉ. दयानंद शिरूरे अधिक्षक श्री संजय व्यास,माजी राज्य मंडळ सदस्य डॉ. संदीपान जगदाळे, डॉ. गोपाल बाहेती, प्रा. जिगाजी बुद्रुके, प्रा. सुधीर गाडवे, प्रा. दशरथ ननावरे व,प्रा महेश जंगापल्ले आदी मान्यवर उपस्थित होते.

## बारावी परीक्षेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० फेब्रुवारी :** दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे बारावी बोर्ड परीक्षेच्या पहिल्या दिवशी परीक्षा केंद्रावर संस्था आणि महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांचे प्रवेशद्वारावर गुलाब पुष्प देऊन मनःपूर्वक स्वागत करण्यात आले. परीक्षा केंद्रावर येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला शुभेच्छा देत सकारात्मक वातावरण निर्माण करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा तणाव कमी होऊन आत्मविश्र्वास वाढल्याची भावना अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. महाविद्यालय प्रशासन, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत हा स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. परीक्षेसाठी आवश्यक सर्व सुविधा वेळेत उपलब्ध करून देत शिस्तबद्ध नियोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेचे सचिव शाम देशमुख यांनी यावेळी दिली.

भयमुक्त आणि तणावमुक्त वातावरणात परीक्षा द्यावी, असे आवाहन प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी विद्यार्थ्यांना केले. परीक्षा ही तुमच्या ज्ञानाची चाचणी आहे, भीती निर्माण करणारी प्रक्रिया नव्हे. आत्मविश्र्वास ठेवा, वेळेचे योग्य नियोजन करा आणि शांत मनाने प्रश्नपत्रिका सोडवा, असे मार्गदर्शन त्यांनी केले. नियमित अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःवरील विश्र्वास यामुळे यश निश्र्चित मिळते, असे सांगत प्राचार्यांनी सर्व विद्यार्थ्यांना उज्ज्वल यशासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. परीक्षा केंद्रप्रमुख म्हणून प्रा. विवेक कदम, प्रा. सोपान डोपे, हनुमंत शिंदेहे काम पाहत आहेत.

यावेळी गणेश देशमुख,मुख्याध्यापक आरडी गायकवाड, पांडुरंग चेवले, डॉ. शहराज मुळे, डॉ. नरेंद्र देशमुख, डॉ. महवीर कटके, डॉ. माना गायकवाड, प्रा. संदिपान चेवले, डॉ. विवेक जाधव, डॉ. अंगद कोते, डॉ. अजित भांजी,डॉ. जयदेवी पवार, डॉ. वैशाली माढेकर, डॉ. सुरेशकुमार कांबळे, डॉ. कांतराव पोले, डॉ. पांडुरंग मुंढेयांनीही विद्यार्थ्यांना परीक्षा करिता शुभेच्छा दिल्या.

### शैक्षणिक कागदपत्रे हरवली आहेत


अनुराग संजय बेंबडे या नावाची पोद्दार इंटरनॅशनल स्कुल, लातूरची दहावी पासची टी.सी., गुणपत्रिका व सनद तसेच कमला नेहरू महाविद्यालय, बोरी, ता.जि . लातूर ची बारावी पासची टी.सी., गुणपत्रिका व सनद ही महत्वपूर्ण शैक्षणिक कागदपत्रे रेणापूर - लातूर मोटारसायकल प्रवासात हरवले आहेत. ज्यांना सापडली असल्यास त्यांनी कृपया पुढील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा, योग्य ते बक्षीस दिले जाईल.

**संपर्क : ८९९९८ ४१४३४**

## स्वामी रामानंदतीर्थ व्याख्यानमालेच्यावतीने डॉ.अभय बंग यांच्या व्याख्यानाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १० फेब्रुवारी :** येथील स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेच्या वतीने बुधवार, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी 'आरोग्य-स्वराज्य' या विषयावर डॉ. अभय बंग यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.



आपल्या मनातील महाराष्ट्राच्या नकाशात गडचिरोली ची दखलसुद्धा असत नाही. अधिकाऱ्यांना ती काळ्यापाण्यापेक्षा भयाण शिक्षा वाटते. अशा आदिवासी, दरिद्री आणि दुर्गम भागात, गेल्या ४१ वर्षांपासून डॉ.अभय व डॉ. राणी बंग हे दांपत्य वैद्यकीय सेवा देत आहेत. आदिवासी भागात बालपणातील कुपोषणामुळे त्यांच्या आरोग्याची दैना उडते. बालकांची वाढच व्यवस्थित होत नाही, बालपणातच असंख्य रोग जडतात. हे सिध्द करून बंग दांपत्यांनी कुपोषणाच्या जीर्ण समस्येला राष्ट्रीय पातळीवर आणले. त्या भागातील सर्वसामान्यांनाच आरोग्यदूत३९;करून बालमृत्यू रोखण्यासाठी कृतीआराखडा अंमलात आणला. त्यांच्या शोधनिबंधांचा जगभर सन्मान झाला. त्यांनी सुचवलेल्या उपाययोजनांना जागतिक आरोग्य संघटना व युनिसेफ यांनी स्वीकारले आहे.

डॉ.अभय व डॉ. राणी बंग यांचे शोधग्राम हे , संपूर्ण देशातील सामाजिक कार्यकर्त्यांसाठी स्फूर्तीस्थान झाले आहे. मी मी आणि केवळ मीमध्ये रममाण होत चाललेल्या तरूणांनी सामाजिक कार्याची जबाबदारी का व कशी घ्यावी? याचे प्रशिक्षण देण्याकरिता डॉ. बंग यांनी निर्माण उपक्रम चालू केला आहे. त्यातून शेकडो कार्यकर्ते तयार झाले असून ते देशभर कार्यरत आहेत. एकाच वेळी संशोधन आणि वैद्यकीय सेवा देत असलेले डॉ. बंग हे आरोग्य विचार सर्वदूर पोहोचवण्यासाठी लेखनही करत आहेत. त्यांनी 'माझा साक्षात्कारी हृदयरोग' मधून हृदयविकाराचा झटका आणि तो रोखण्यासाठी जीवनशैली कशी असावी? हे सांगितले. 'सेवाग्राम ते शोधग्राम' या

पुस्तकातून त्यांचा वैयक्तिक प्रवास आणि त्यांचे कार्य उलगडून दाखवले. तरुणांना पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे 'या जीवनाचे काय करू?' या पुस्तकातून सुचवली. त्यांचे 'आरोग्य-स्वराज्य' हे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. त्यात त्यांनी 'आपण आजार होण्याआधी आरोग्य कसे जपावे? आजार झालाच तर जवळ, स्वस्त उपचार देण्यासाठी आरोग्य धोरण कसे असावे?' यांवरील सखोल चिंतन मांडले आहे. ही संकल्पना स्पष्ट करून संवाद साधण्यासाठी, ते लातुरात येत आहेत.

११ फेब्रुवारी २०२६ (बुधवार ) रोजी सायंकाळी ५.३० वाजता, श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या 'कस्तुर-कंचन' सभागृहात डॉ. अभय बंग हे 'आरोग्य-स्वराज्य' यावर विचार मांडणार आहेत. लातूरकरांनी अवश्य उपस्थित रहावे असे आवाहन स्वामी रामानंदतीर्थ व्याख्यानमालेच्यावतीने श्रीनिवास लाहोटी, सुमती जगताप,डॉ.अजित जगताप आणि अतुल देऊळगावकर यांनी केले आहे.

### जाहिर प्रगटन

**दै.तरुण भारत**

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते कि , माझे पक्षकार **क्षिरसागर सुहास लक्ष्मण , रा. हिप्परगा ता.औसा जि लातूर** यांनी मला दिलेल्या माहिती व कागद पत्रावरुन व वकिल म्हणून अधिकृत केले वरून सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहिर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना **सौ विद्या आण्णासाहेब पवार , रा. फादर मायकेल सोसायटी ,विश्रांतवाडी ,पुणे** यांनी खरेदी खत दस्त क्र. ल. त. र – २-६३००/२००९ अन्वये खरेदी मालकीचा व कब्जेवाहिवाटीचा खुला प्लॉट मौ. चांडेश्वर ता. जि लातूर येथील जमीन गट नं ६० मधील खुला प्लॉट ज्यांचा एन. ए नं. २००६/जे . एम . बी /लातूर /सी . आर -८५७ ,दि- ०५/१२/२००६ ई . अन्वये मे. सब डिव्हीजनल ऑफिस ,लातूर यांनी मंजूर केलेला खुला प्लॉट याचा ले आऊट क्र. एल . टी. आर/एन. ए /सर्वे नं ६०/लातूर /एन. आर. एल/१७६३, दि.२७/११/२००६ ई. अन्वये मे. नगर रचनाकार, लातूर यांनी मंजूर केलेल्या पैकीचा खुला प्लॉट नं.८१(पूर्ण) याची लांबी पूर्व –पश्चिम १७ मी व रुंदी दक्षिण-उत्तर १२ मी . याचे एकूण क्षेत्रफळ २०४. चौ.मी आहे. प्लॉट चतु:सिमा - पुर्वेस - गट ६१ मधील जमीन, पश्चिमेस – ९ मी रुंदीचा रस्ता , दक्षिणेस - प्लॉट क्र ८२ उत्तरेस – प्लॉट क्र ८०

येणे प्रमाणे वरील चतु : सिमेच्या आतील मिळकत खरेदी करणेचा **लेखी** करार केला असुन ठरावापोटी ईसारा रक्कम दिलेली आहे तसेच सदरील मिळकत ही निर्वेध व निर्जोखिम असल्याची हमी विध्यमान मालकाने माझ्या पक्षकारास दिलेली आहे तरी सदर मिळकतीवर जर कोणाचा उजर , हक्कसंबंध, कर्ज बोजा, गहाणखत, बक्षीस, कोर्टडिग्री, मृत्युपत्र, तारण, लिज, लिन, शेजाऱ्याचा वाद, शासकिय अथवा निमशासकिय कर्ज असेल तर त्यांनी सदर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन **सात ( ७ )** दिवसांचे आत माझ्या खालील पत्यावर लेखी आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर आक्षेप आला नाही तर सदरील मिळकत ही निर्विवाद व निर्जोखिम समजुन माझे पक्षकार नोंदनिकृत खरेदीखत करुन घेतील मुदतीनंतर आलेले आक्षेप माझे पक्षकारावर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहिर प्रगटन.

दिनांक - ०२/०२/२०२६

तर्फे. ॲड. अशोक ज्ञा. लोखंडे
नोटरी भारत सरकार.
शाहू चौक, लातूर
मो. न. ९४२१९८६४९५

जाहिर प्रगटन देणार
क्षिरसागर सुहास लक्ष्मण
**रा. हिप्परगा ता.औसा जि लातूर**
मो.नं.८६०५५५६५६७ / ७७७४८७२१४६

### जाहीर प्रगटन

दै.

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार **खमरोद्दीन महमदसाब शेख, रा.बरकत नगर, लातूर** यांनी मला दिलेल्या माहिती व कागदपत्रावरून व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना **राजाभाऊ शंकरप्पा राजनाळे**, रा.राजे शिवाजी नगर, पाखरसांगवी, ता.जि.लातूर यांनी प्लॉटचे मुळ मालक भास्कर बाजीराव वाडीकर यांचे कडून ठरावपत्र करून घेतलेल्या पैकीचा प्लॉट जो की, मौ.साखरा, ता.जि.लातूर येथील जमीन गट क्रं.१०९ पैकीचा प्लॉट क्रं. २१ चा पश्चिम भाग याची लांम्ब्री पुर्व – पश्चिम २५ फुट व रुंदी दक्षिण - उत्तर ३८.५ फुट याचे एकूण क्षेत्रफळ ९६२.५ चौ.फुट असून याची चतु : सीमा खालील प्रमाणे :-
पुर्वेस - सदर प्लॉट क्रं.२१ चा प्लॉटचा उर्वरीत भाग, पश्चिमेस - प्लॉट क्रं.२२, दक्षिणेस - प्लॉट क्रं.१९, उत्तरेस - १२ मी. रुंदीचा रस्ता.

येणे प्रमाणे वरील चतु:सीमेच्या आतील मिळकत विद्यमान मालकाकडुन **लेखी** करार करुन घेऊण,इस्सारापोटी काही रक्कम माझे पक्षकाराकडुन स्विकारुन सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास दिली आहे. तरी सदर मिळकती बाबत जर कोणाचा उजर,आक्षेप,हितसंबंध,हक्कसंबंध,कर्जबोजा,गहाणखात,बक्षीसपत्र,कोर्ट डिग्री,मृत्युपत्र,तारण,लीज,शेजाऱ्याचा वाद,शासकिय अथवा निमशासकिय कर्ज, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून **सात ( ०७ )** दिवसाच्या आत माझे खालील कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर / आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर/आक्षेप नाही आल्यास सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम आहे असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत मूळ मालकाकडून आपल्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर येणारे आक्षेप माझे पक्षकारावर बंधणकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक - १०/०२/२०२६

तर्फे ॲड.अशोक ज्ञा.लोखंडे
नोटरी भारत सरकार.
शाहू चौक,लातूर
मो नं.९४२१९ ८६४९५

जाहीर प्रगटन देणार
**खमरोद्दीन महमदसाब शेख,**
**रा.रा.बरकत नगर, लातूर**
मो नं.९८५०८३६८८७/९८३०१०६६५८

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

### नवनिर्माण व्याख्यानमालेचे आयोजन

**लातूर:** बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे व नवनिर्माण प्रतिष्ठान, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक प.पू. श्री गोळवलकर गुरुजी यांच्या जन्मदिनानिमित्त दि.११ ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्रतिवर्षाप्रमाणे नवनिर्माण व्याख्यानमालेचे आयोजन दयानंद सभागृहात संध्याकाळी सहा वाजता करण्यात आले आहे. सन २०२५-२६ या वर्षात वंदे मातरम या राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापन दिन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेचे शताब्दी वर्ष व पंडित दीनदयालजी उपाध्याय यांनी समाज उन्नतीसाठी मांडलेले एकात्म मानव दर्शन या सिद्धांताचे हीरक महोत्सवी वर्ष अशा विचारांच्या त्रिवेणी संगमाचा योग लक्षात घेऊन ही व्याख्यानमाला आयोजित केली आहे. या व्याख्यानमालेत दि. ११ फेब्रुवारी बुधवार रोजी नाशिकच्या स्वामी विवेकानंद केंद्राचे सहसंचालक प्रकाश पाठक यांचे एकात्म मानव दर्शन या विषयावर, मराठवाडा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अनंतराव पांडे यांचे पंचपरिवर्तनातून सामर्थ्यशाली समाज व वैभवशाली राष्ट्र निर्मिती तर दि.१३ फेब्रुवारी रोजी पुणे येथील आदित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष विद्यावाचस्पती गुरुदेव शंकरराव अभ्यंकर यांचे वंदे मातरम राष्ट्रीय गीताचा १५० वा वर्धापन दिन या विषयावर व्याख्यान होणार आहे. या व्याख्यानमालेस प्रमुख अतिथी म्हणून अनुक्रमे भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष सुशील दादा वाजपेयी, अष्टांग योग केंद्राचे संचालक योगाचार्य दिलीपराव भातलवंडे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरेचे माजी कुलगुरू कर्नल डॉ. कारभारी काळे यांची उपस्थिती राहणार आहे.

### दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे हर्बोस्कोप राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा

**लातूर:** दयानंद शिक्षण संस्था लातूर द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर यांच्या वतीने हर्बो स्कोप-२०२६ ही राष्ट्रीय स्तरावरील हर्बल ड्रग मायक्रोस्कोपिक इमेज स्पर्धा नुकतीच उत्साहात पार पडली. या स्पर्धेचा उद्देश हर्बल औषधांची सूक्ष्मदर्शकीय ओळख व प्रमाणीकरणाबाबत वैज्ञानिक समज वाढवणे, विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास घडवणे तसेच या क्षेत्रातील जनजागृती करणे हा होता.या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धे साठी देशभरातून एकूण १८८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. स्पर्धे स प्राप्त झालेल्या नोंदींचे मूल्यमापन इंस्टीट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मुंबई, राजस्थान युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सेस जयपुर, आर.सी. पटेल इंस्टीट्यूट ऑफ फार्मासुटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, शिरपूर अशा नामांकित संस्थांमधील तीन स्वतंत्र तज्ज्ञ परीक्षकांनी केल्याने स्पर्धेतील पारदर्शकता व निष्पक्षता अबाधित राहिली. अशा या उपक्रमाबाबत दयालानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांनी आयोजकांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला चालना देणारे असे उपक्रम भविष्यातही राबवावेत, असे मत व्यक्त केले. तसेच दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव विशाल लाहोटी, सहाय्यक सचिव अजींक्य सोनवणे व कोषाध्यक्ष संजय बोरा यांनी या राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमाबद्दल महाविद्यालयाचे कौतुक केले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख व प्राध्यापकवृंद उपस्थित होते. हर्बोस्कोप स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना हर्बल ड्रग मायक्रोस्कोपी विषयातील ज्ञान वृद्धिंगत करण्याची तसेच संशोधनाभिमुख दृष्टिकोन विकसित करण्याची संधी मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले.

### उदगीर नगरपरिषदेचा अतिक्रमणावर हातोडा; नागरिकांतून होतेय स्वागत

**उदगीर :** उदगीर नगर परिषदेच्या निवडणुका संपन्न झाल्यानंतर नूतन नगराध्यक्ष आणि मुख्य अधिकारी यांच्या आदेशानुसार उदगीर शहरातील अतिक्रमण हटाव मोहीम सुरू झाली आहे. उदगीर शहरात वाढलेले अतिक्रमण आणि रस्त्याच्या दुतर्फा थांबणारे हातगाडी आणि ठेलेवाले यांच्यामुळे रहदारीला मोठ्या प्रमाणात अडथळा होत होता. या संदर्भामध्ये वेळोवेळी ओरड करून देखील या गोष्टीकडे फारसे कोणी लक्ष देत नव्हते. मात्र निवडणुका झाल्यानंतर नगरपालिकेकडून मोठा निर्णय घेऊन अतिक्रमण हटाव ची मोहीम राबवली जात आहे.

उदगीर येथील भाजी मंडई परिसरात संध्याकाळच्या वेळी महिलांना आणि मुलींना भाजी घेण्यासाठी बाजारात जाणे देखील कठीण झाले होते. दुकानदाराचे दुकान समोर झालेले अतिक्रमण आणि दुसऱ्या बाजूला हातगाडीवाले, ठेलेवाले यांची गर्दी त्यातही रस्त्याच्या मध्यभागी करण्यात आलेली दुचाकीची पार्किंग यामुळे रस्ता अत्यंत अरुंद झाला होता. त्या रस्त्याला मोकळा श्र्वास घेण्याची संधी आता अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे मिळू शकेल अशी शक्यता वर्तवली जात आहे. एका बाजूला या अतिक्रमण हटामुळे काही लोक समाधान व्यक्त करत आहेत. तर काही लोक गोरगरिबांच्या रोजी रोटी वर गदा आणला जात आहे अशी उरळी करत आहेत.

### पदाधिकारी कार्यकर्ते व जनतेचे मन:पूर्वक आभार : आ. देशमुख

**लातूर:** लातूर जिल्हा परिषद निवडणुकीत काँग्रेस पक्ष सर्वाधिक २३ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. हा जिल्हा पूर्वीपासूनच काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो आहे आणि आजही तो काँग्रेसचाच बालेकिल्ला असल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे. असे नमूद करून जिल्ह्यातील जनतेने भरघोस पाठिंबा आणि आशीर्वाद देत काँग्रेस पक्षावर व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी मी आणि माझे सर्व सहकारी प्रयत्नशील राहतील असे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या निकालाच्या संदर्भाने प्रतिक्रिया व्यक्त करताना आमदार अमित देशमुख यांनी म्हटले आहे की, काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर साहेब, आदरणीय शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेब, आणि आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांचा जिल्हा म्हणून लातूर जिल्ह्याची राज्यात आणि देश पातळीवर ओळख आहे. या नेत्यांनी सुसंस्कृत आणि विकासाचे राजकारण करून लातूरला कायम पुढे नेण्याचे काम केले आहे. आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात आर्थिक सुबत्ता आणून विकास प्रक्रियेला गती देण्याचे काम आम्ही सुरू ठेवले आहे.

# देवणी तालुक्यात भाजपने मारली बाजी

## पंचायत समिती ताब्यात ठेवण्यात यश


**रामलिंग शेषेराव शेरे** जवळगा जि. प. गट


**सौ. उषाताई संभाजी पाटील,** वलांडी जि. प. गट


**औदुंबर रामदास पांचाळ,** बोरोळ जि. प. गट


**सौ. महादेवी शंकर पाटोळे,**जवळगा पं. स. गण


**सौ. महादेवी शंकर पाटोळे,**जवळगा पं. स. गण


**बाळू माधवराव पाटील,** वलांडी पं. स. गण


**सगर नागनाथ दत्तात्रय,** विळेगाव पं. स. गण


**बिरादार गजानन गोविंद,** बोरोळ पं. स. गण


**अश्विनी सुनिल हुंचनाळे,** तळेगाव पं. स. गण

**तभा वृत्तसेवा/रियाज मोमीन**

**वलांडी दि. १० फेब्रुवारी :** देवणी तालुक्यातील तीन जिल्हा परिषद व सहा पंचायत समितीसाठी सोमवारी (ता. ०९) शांततेत मतमोजणी झाली. तीन जिल्हा परिषद गटात दोन भाजपा तर एका गटात काँग्रेसने विजय मिळवला आहे. तर सहा पंचायत समिती गणात चार गण भाजपा तर एका गणात काँग्रेस व एका गणात राष्ट्रवादी काँग्रेसने विजय मिळवला आहे.

तालुक्यातील जवळगा व वलांडी जिल्हा परिषद गट भाजपाने पुन्हा ताब्यात ठेवला तर बोरोळ गटात काँग्रेसने विजय मिळवला. वलांडी, जवळगा, दवणहिप्परगा, तळेगाव (भोगेश्र्वर) या चार गणात भाजपाने विजय मिळवला तर बोरोळ पंचायत समितीत राष्ट्रवादी काँग्रेसने जोरदार विजय मिळवला. विळेगाव पंचायत समिती गण काँग्रेसने ताब्यात घेतली आहे.

जवळगा जिल्हा परिषद गटामध्ये भाजपाने रामलिंग शेरे यांनी काँग्रेसचे विकास डगवाले यांचा पराभव करीत पुन्हा एकदा भाजपाला विजय मिळवुन दिला आहे. वलांडी जिल्हा परिषद गटात तळेगावकर कुटुंबीयांच्या उषा संभाजीराव पाटील तळेगावकर यांनी काँग्रेसच्या अंजली अजित बेळकोणे यांचा पराभव केला आहे. तर बोरोळ जिल्हा परिषद गटात काँग्रेसचे औदुंबर पांचाळ यांनी भाजपाचे धोंडीराज गुणाले यांचा पराभव करीत तालुक्यात एकमेव जागा राखण्यात यश मिळवले आहे.

पंचायत समितीच्या जवळगा गणामध्ये भाजपाच्या महादेवी पाटोळे यांनी काँग्रेसच्या सुरेखा सोनकांबळे यांचा पराभव केला आहे. तर दवणहिप्परगा पंचायत समिती गणामध्ये भाजपाच्या अंकिता पाटील यांनी काँग्रेसच्या प्रभावती पाटील यांचा पराभव करीत सत्ता कुंटुबातच ठेवण्यात यश मिळवले आहे. वलांडी पंचायत समिती गणात भाजपाचे बाळासाहेब पाटील यांनी काँग्रेसचे उमेश बिरादार यांचा पराभव केला आहे. विळेगाव गणात काँग्रेसचे नागनाथ सगर यांनी भाजपाचे विजयकुमार बोरोळ यांचा पराभव केला आहे. बोरोळ गणामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे गजानन बिरादार (भोपणीकर) यांनी भाजपाचे प्रमोद पाटील यांचा पराभव केला आहे. बोरोळमध्ये जिल्हा परिषद गटामध्ये काँग्रेसने विजय मिळवला असला तरी पंचायत समिती गणामध्ये काँग्रेसचा उमेदवार तिसऱ्या स्थानावर राहिला आहे. तळेगाव पंचायत समिती गणामध्ये भाजपाच्या अश्रि्वनी हंचनाळे यांनी काँग्रेसच्या प्रणीती चामले यांचा पराभव केला आहे. विजयी उमेदवारासह समर्थकांनी जल्लोष करीत विजय साजरा केला. जेसीबीच्या साह्याने गुलाल उधळुन आतिषबाजी करीत आनंदोत्सव साजरा केला.

जवळगा जिल्हा परिषद गटात काँग्रेसच्या मातब्बर उमेदवारासमोर भाजपाच्या रामलिंग शेरे यांनी कडबी झुंज देत एकहाती विजय मिळवला. जवळगा गटातील लढतीकडे तालुक्यासह सिमावर्ती भागातील नागरीकांचे लक्ष लागले होते. मात्र सुरुवातीपासुनच विकासाच्या मुद्यावर प्रचारयंत्रणा सक्षम करीत गावपातळीवरील कार्यकर्त्यांचे पाठबळ मिळवत जोरदार मुंसडी मारली. काँग्रेस व भाजपाने दोन्ही उमेदवारा लिंगायत समाजातील व एकाच गावातील दिल्याने मोठी चुरस निर्मान झाली होती. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसने मराठा उमेदवार देत तिरगी लढत दिली होती. मात्र भाजपाच्या रामलिंग शेरे यांनी गेल्या दोन दशकात केलेल्या सामाजिक कामाचा निकालातुन प्रत्यय आला.

वलांडी जिल्हा परिषद गटात तळेगावकर विळेगावकर या दोन्ही पांरपारिक राजकीय विरोध घराण्यामध्ये पुन्हा एकदा चुरशीची लढत झाली. यात विद्यमान काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अजित बेळकोणे यांच्या पत्नी अंजली बेळकोणे यांचा पराभव करत भाजपाच्या उषाताई संभाजीराव पाटील तळेगावकर यांनी विजय मिळवीत तळेगावकर कुंटुबाला राजकीय बळ देण्यात यश मिळवले आहे. जिल्हा परिषदेत प्रवेश करण्यासाठी गेल्या अनेक निवडणुकीत पराभवाला सामोरे जाणाऱ्या तळेगावकर कुंटुबीयांना विजयाचा गुलाल लागला आहे. जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद सर्वसाधारण महिलेसाठी असल्याने वलांडीच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. शिवाय तळेगावकर कुटुबीयांचे खंदे समर्थक तथा पंचायत समिती सभापतीपदाचे एकमेव दावेदार बाळासाहेब पाटील यांनी निवडुन आणत पंचायत समितीचे सभापतीपद आपल्या ताब्यात ठेवण्यात यश मिळवले आहे.

बोरोळ जिल्हा परिषद गटात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे यांचा खंदा समर्थक औंदुबर पांचाळ यांनी भाजपाच्या धोंडीराज गुणाले यांचा पराभव करीत तालुक्यात काँग्रेसचे खाते उघडले आहे. बोरोळ पंचायत समिती गणामध्ये गजानन भोपणीकर यांनी सुरुवातीपासुनच नियोजनबद्ध व अचुक प्रचारयंत्रणा राबवत मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला आहे.

## विद्यार्थ्यांसाठी अर्थसंकल्पावर म. गांधी महाविद्यालयात व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. १० फेब्रुवारी :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १ फेब्रुवारी २०२६ रोजी सन २०२६-२०२७ चा केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पातील तरतुदींची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी या हेतूने येथील विचार विकास मंडळ संचलित महात्मा गांधी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने डॉ. प्रकाश देशमुख यांचे विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. त्यांनी केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ या विषयावर विस्तृत व्याख्यान दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार हे होते. प्रमुख व्याख्याते प्रकाश देशमुख यांनी तुटीचा अर्थसंकल्प, विशेष अर्थसंकल्प याविषयी



माहिती देऊन केंद्रीय अर्थसंकल्पातील शिक्षण, शेती, उद्योग, रोजगार अशा विविध घटकांच्या अनुषंगाने विस्तृत चर्चा केली. अध्यक्षीय समारोपप्रसंगी महाविद्यालयाचे स्टाफ सेक्रेटरी डॉ. पी. कांबळे यांनी अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने आपले यथोचित मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ राजेश्री जाधव यांनी केले. कार्यक्रमास भूगोल विभाग प्रमुख डॉ. नितीन देशमुख, प्रसिद्धी विभाग प्रमुख डॉ. यादव सूर्यवंशी, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बालाजी माकणे-पाटील, डॉ. राजेश जोंधळे, डॉ. एस. बी. साठे, श्री. सुधाकर कदम तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन मेकले प्रिती यांनी केले आभार गुळवे निखिल यांनी मानले.

## मूलभूत आणि उपयोजित विज्ञान संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर : डॉ.शेषनाथ भोसले



**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. १० फेब्रुवारी :** क्वांटम कॉम्प्युटिंग, जैवतंत्रज्ञान, शाश्र्वत ऊर्जा आणि नॅनोतंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांत मोठी क्रांती होत आहे. अत्याधुनिक संशोधनाचा वापर आधुनिक पद्धतीने झाला पाहिजे. मूलभूत आणि उपयोजित विज्ञान संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर ही काळाची गरज आहे असे उद्गार केंद्रीय विद्यापीठ गुलबर्गा कर्नाटक येथील रसायनशास्त्राचे डॉ.शेषनाथ भोसले यांनी काढले. छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात विज्ञान शाखेने आयोजित केलेल्या मूलभूत आणि उपयोजित विज्ञान संशोधनातील उदयोन्मुख कल या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रावेळी ते बोलत होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्रीरंगराव पाटील, उद्घाटक म्हणून स्वा.रा.ती.मराठवाडा विद्यापीठातील भौतिकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजाराम माने, प्रमुख उपस्थिती किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव पी टी शिंदे, सहसचिव हिरागिर गिरी, कोषाध्यक्ष गुंडेराव पाटील, डॉ.अंबादास कदम, डॉ.शिंदे एस.एल.,डॉ. सोनवणे आर. एस., पृथ्वीराज पाटील, पुंडलिकराव पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.एम.मांजरे, आयक्वेशीचे समन्वयक डॉ.विष्णू पवार यांची होती.

यावेळी विविध संशोधकाच्या शोधनिबंधाचे युनिव्हर्सल रिसर्च ॲनालिसिस जर्नल या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. प्राचार्य डॉ.मांजरे यांनी महाविद्यालयाच्या उभारणीपासून आजपर्यंतचा इतिहास आणि महाविद्यालयाने ए प्लस ग्रेड घेतलेल्या सर्व घडामोडीचा वृत्तांत मांडला.

पुढे बोलताना डॉ.भोसले म्हणाले, विद्यार्थ्यांनी मेहनत करावी. संशोधनामध्ये वेळ द्यावा. त्याशिवाय प्रगती होत नाही. तर उद्घाटक डॉ.राजाराम माने म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण नवीन गोष्टी घेऊन आलेले आहे.अध्यापक आणि विद्यार्थ्यासाठी या गोष्टी आव्हानात्मक आहेत. सर्वांनी अभ्यासपूर्वक त्याची अंमलबजावणी करावी. अध्यक्षीय समारोप अध्यक्षाच्या वतीने पृथ्वीराज पाटील यांनी केला. त्यावेळी ते म्हणाले,

सध्या विद्यार्थ्यांनी एआयचा वापर करावा. विद्यार्थ्यांचा कल जटील समस्या सोडवणे, नवीन साहित्य निर्मिती आणि आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाद्वारे व्यावहारिक उपाय शोधण्यावर केंद्रित असावा असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.उर्मिला शिरसे, डॉ.व्ही. के.भालेराव यांनी तर प्रास्ताविक डॉ. एच.ए.तिरपुडे यांनी आणि आभार डॉ. विष्णू पवार यांनी मानले. कार्यक्रमाला विविध महाविद्यालयातून आलेले संशोधक प्राध्यापक व विद्यार्थी, महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पानगाव जि.प आणि पंचायत समित महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा विजय

**तभा वृत्तसेवा**

**पानगाव, दि. १० फेब्रुवारी :** रेणापूर तालुक्यातील पानगाव येथे चार जि. प. आणि ८ पं. स. च्या निवडणूकीसाठीआज ा ७ फेब्रुवारी रोजी मतदान पार पडले होते आज सोमवार ९ फेब्रुवारी रोजी निकाल लागला सकाळ १० वाजल्यापासून ा रेणापूर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे १६ टेबल वर ११ फेऱ्या मत मोजणी सरू झाली सकाळी पहिल्या फेरी पासून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार आघाडी वर दिसून येत होते. पानगाव जिल्हा परिषद साठी डॉ सुनील नागरगोजे तर पानगाव पंचायत समिती च्या श्रीदेवी गालफाडे तर कोष्टगाव पंचायत समिती मध्ये मोनिका सर्यवंशी विजयी झाल्या तालुक्यातील हा गणाची स्व गोपीनाथ मुंढे साहेबाचा मतदार संघ म्हणून ओळख होती आता पर्यत भारतीय जनता पार्टी ची सत्ता असलेल्या मतदार संघा मध्ये पहिल्यादाच महाराष्ट्रनवनिर्माण सेनेनला यश प्राप्त झाले त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्ते मध्ये आनंद आहे शेतकऱ्या विविध च्या प्रशांनावर नेहमी अग्रेसर असेल शेतकरी नेते म्हणून ओळख असलेल्या संतोष नागरगोजे यांच्या मार्गदर्शना खाली ही निवडणुकीला महाराष्ट्र नवनिर्माण सेना सामोरी गेली होती

संतोष नागरगोजे यांनी केलेल्या कामाच्या जीवावर आम्ही ही निवडणूक लढवत आहोत अत्यंत आटीतटी निवडणुकी मनसे हा विजय प्राप्त केला आहे. तालुक्यातील सर्वात मोठे सर्कल म्हणून ओळख असलेल्या पानगाव सर्कल मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला अभूतपूर्व यश मिळाल्या मुळे कार्यकर्ते आनंदी आहेत

शेतकरी नेते कोणतेही पद किंवा कोणतीही सत्ता नसताना केवळ गोर गरीबाच्या केलेल्या कामावर प्रचार केला होता आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केलेल काम घेऊन मतदारा समोर जात होते

पानगांव जिल्हा परिषद गटात मनसेचे जिल्हा परिषद व पंचायत समितीचे एकूण तीन उमेदवार विजयी .

रेणापूर तालुक्यातील पानगाव जिल्हा परिषद गणात प्रस्थापितांना धक्का देत मनसेने बाजी मारल्याचे दिसून येत आहे .मनसे सरचिटणीस संतोष भाऊ नागरगोजे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेसाठी उभे असलेले सुनील गणपतराव नागरगोजे हे ३१९१ मतानी विजयी झाले असून .पानगाव पंचायत समिती गणातून श्रीदेवी प्रकाश गालफाडे ह्या११०० झाल्या आहेत .कोष्टगांव गाव गणातून सौ मोनिका रवि सुर्यवशी ह्य २८० मतांनी विजयी झालेल्या आहेत .सर्व विजयी उमेदवाराचे सर्कलमधील सर्व मतदाराने ढोल ताशाच्या गजरात मिरवणुकीने आनंद व्यक्त केला आहे .

## चाकूर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जिल्हा परिषद चार तर पंचायत समितीत आठ जागेवर विजय

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. १० फेब्रुवारी :** चाकूर तालूक्यातील पाच जिल्हा परिषद व दहा पंचायत समितीच्या निवडणुकीची मतमोजणी पुर्ण झाली असून सर्व जागेचे निकाल हाती आली आहेत.जिल्हा परिषद मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे चार व भाजपने एका जागेवर विजय मिळविला असून पंचायत समितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आठ जागेवर विजय मिळवित राष्ट्रवादी काँग्रेसने चाकूर तालुक्यात एकहाती सत्ता मिळवली आहे.

चाकूर येथील तहसील कार्यालयात निवडणुक निर्णय अधिकारी संगिता टकले, सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी नरसिंग जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मतमोजणी करण्यात आली, निवडणुकीत ६७ टक्के मतदान






झाले होते.सकाळी दहा वाजता मतमोजणी सुरू झाली सुरवातीला टपाली मतदानाची मोजणी करण्यात आली.दहा टेबलवर सर्वच गटाच्या मतमोजणीला एकाच वेळी सुरूवात करण्यात आली.हळुहळू निकाल स्पष्ट होऊ लागले आणि जिल्हा परिषद व पंचायत समितीत राष्ट्रवादी (अजित पवार)चाकूर तालुक्यात एक नंबरचा पक्ष ठरला आहे.

विजयी झालेले उमेदवार पुढील प्रमाणे जिल्हा परिषद गट नळेगाव -

रोहिणा- उषा सोनकांबळे मिळालेली मते ९८६० (राष्ट्रवादी काँग्रेस), वडवळ नागनाथ - भानुदास पोटे ९२४८ मते (राष्ट्रवादी काँग्रेस), चापोली - रंजना चाटे १००५७ मते (राष्ट्रवादी काँग्रेस), जानवळ - दयानंद सुरवसे ६९०७ (राष्ट्रवादी काँग्रेस), नळेगाव अमर पाटील ८१२९ मते (भाजप) हे विजयी झाले आहेत. पंचायत समितीच्या दहा गणात नळेगाव- शिवम देवशेटवार ५३०६ (भाजप), सुगाव - भुजंग शिंदे ३६४२ (राष्ट्रवादी काँग्रेस), जानवळ -सावित्रीबाई केदार २८६७ (राष्ट्रवादी काँग्रेस), झरी - मनिषा जाधव ३७१२ (राष्ट्रवादी काँग्रेस), वडवळ नागनाथ मिरावती कसबे ५३८८ ( राष्ट्रवादी काँग्रेस), आष्टा विजयमाला शेळके ३८१८ (भाजप), चापोली - गजानन होनराव ३३०२ (राष्ट्रवादी काँग्रेस), अजनसोंडा -सुप्रिया हाके ४६३२ (राष्ट्रवादी काँग्रेस), रोहिणा - जयश्री नागरगोजे ५२२५ (राष्ट्रवादी काँग्रेस), आटोळा - संतोष कलवले ५४९२ मते (राष्ट्रवादी काँग्रेस) घेऊन विजयी झाले आहेत. विजयी उमेदवार यांना निवडणूक निर्णय अधिकारी संगिता टकले यांनी प्रमाणपत्र देऊन पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.विजयी उमेदवारांनी गुलालाची उधळण करीत पेढे भरवून फटाक्यांच्या अतिशबाजी करून ढोल ताशांच्या गजरात विजयी जल्लोष साजरा केला.

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नळदुर्ग पोलिसांकडून अवैध मद्य जप्त; दोघांविरुद्ध गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१० फेब्रुवारी -**

नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध मद्यविक्रीविरोधात कारवाई करत पोलिसांनी दोन ठिकाणी छापे टाकून देशी व विदेशी दारूच्या सिलबंद बाटल्या जप्त केल्या आहेत. या प्रकरणी दोन वेगवेगळे गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

दि. ०९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १३.१५ वाजण्याच्या सुमारास चिकुंद्रा ते किलज रोडलगत जय सेवालाल धाबा येथे संतोष सिद्राम पवार (वय ३२, रा. मारखोरी तांडा, किलज, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) याच्याकडे अवैध विक्रीच्या उद्देशाने ठेवलेल्या अंदाजे ४ हजार ७०० रुपये किंमतीच्या देशी व विदेशी दारूच्या ४१ सिलबंद बाटल्या पोलिसांनी जप्त केल्या.

तसेच याच दिवशी दुपारी १५.२० वाजता खंडोबा मंदिरासमोरून चिंकुद्राकडे जाणाऱ्या रोडलगत शेतकरी धाबा येथे प्रविण सुधाकर लोहार (वय २५, रा. मुर्टा, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) याच्याकडे अवैध विक्रीसाठी ठेवलेल्या अंदाजे ३ हजार ६०० रुपये किंमतीच्या देशी व विदेशी दारूच्या ३६ सिलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या.

या दोन्ही प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम ६५(ई) अन्वये स्वतंत्र दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून याबाबत पुढील तपास सुरू आहे.



# धाराशिव जिल्हा परिषदेवर येणार महिलाराज!

## ▶▶ मिनी मंत्रालयाच्या सक्रिय राजकारणात ५० नवख्या सदस्यांची प्रथमच इंट्री...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० फेब्रुवारी -**

जिल्हा परिषद निवडणुकीत महिलांनी बहुमत मिळवत महिलाराज प्रस्थापित केले असतानाच यंदाच्या निवडणुकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे नवख्या उमेदवारांचे मोठे प्रतिनिधित्व होय. धाराशिव जिल्हा परिषद निवडणुकीत एकूण ५५ जागांपैकी ३० जागांवर महिला उमेदवारांनी विजयश्री प्राप्त केला आहे.

धाराशिव जिल्हा परिषदेच्या एकूण ५५ सदस्यांपैकी केवळ ५ सदस्य अनुभवी असून तब्बल ५० सदस्यांची जिल्हा परिषदेत प्रथमच निवड झाली आहे. या निकालामुळे जिल्हा परिषदेत महिलांचे स्पष्ट बहुमत निर्माण झाले असून स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांचे वाढते नेतृत्व अधोरेखित झाले आहे.

जिल्हा परिषदेत प्रथमच मोठ्या प्रमाणात नव्या चेहऱ्यांचा भरणा झाला असून राजकारणात नवचैतन्य निर्माण झाले आहे. पहिल्यांदाच निवडून आलेले सदस्य जनतेच्या अपेक्षा, विकासकामे आणि प्रशासनातील बदल याबाबत उत्साही असल्याचे चित्र आहे. नवख्या सदस्यांकडून पारदर्शकता, गतिमान निर्णयप्रक्रिया आणि नव्या कल्पनांची अंमलबजावणी होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

महिलांचे बहुमत आणि नवख्या सदस्यांची मोठी संख्या यामुळे जिल्हा परिषदेत नेतृत्वाची नवी दिशा ठरण्याची शक्यता आहे. अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच विविध विषय समित्यांच्या निवडीतही नवे चेहरे पुढे येण्याची चिन्हे आहेत. ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण आणि महिला व बालकल्याण यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये नवे धोरणात्मक निर्णय अपेक्षित आहेत.




अनुभवी सदस्यांची संख्या कमी असली तरी नव्या सदस्यांचा उत्साह आणि जनतेचा विश्वास जिल्हा परिषदेच्या कारभाराला वेग देणारा ठरू शकतो. धाराशिव जिल्हा परिषदेत यंदाचा हा निकाल बदलाचे व नव्या पर्वाचे संकेत देणारा मानला जात आहे.

धाराशिव जिल्हा परिषदेत यंदा मोठ्या प्रमाणात नवख्या सदस्यांची एन्ट्री झाली असून जिल्हा विकासाचे ठोस व्हिजन घेऊन हे नवे उमेदवार कामाला लागणार असल्याचे चित्र आहे. तब्बल ५० सदस्य प्रथमच निवडून आले असून, त्यांच्याकडून पारंपरिक राजकारणापेक्षा विकासाभिमुख कारभाराची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नव्या सदस्यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य सुविधा, शिक्षण व्यवस्था, महिला व बालकल्याण, स्वच्छता आणि रोजगारनिर्मिती यांना प्राधान्य देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

ग्रामीण भागातील मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी नव्या कल्पना, आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रशासनाशी समन्वय साधून काम करण्यावर भर दिला जाणार आहे. विशेष म्हणजे महिलांचे बहुमत आणि नवख्या सदस्यांची संख्या यामुळे जिल्हा परिषदेत संवेदनशील, पारदर्शक आणि गतिमान निर्णयप्रक्रिया होण्याची शक्यता आहे.

जनतेने दिलेल्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी विकासकामांत गुणवत्ता, वेळबद्धता आणि लोकसहभाग यावर लक्ष केंद्रित केले जाईल, असे नवनिर्वाचित सदस्य सांगत आहेत. या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्हा परिषदेत नव्या नेतृत्वाखाली विकासाचे नवे पर्व सुरू होणार असून, जिल्ह्याच्या प्रगतीसाठी ठोस व दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतले जातील, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

### अनुभवी सदस्यांची भूमिका महत्त्वाची!



धाराशिव जिल्हा परिषदेत नवख्या सदस्यांची संख्या मोठी असली तरी काही अनुभवी सदस्य आणि गटनेते म्हणून यांची भूमिका आगामी काळात अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. जिल्हा परिषद कारभाराला दिशा देणे, नव्या सदस्यांना मार्गदर्शन करणे तसेच पक्षाची भूमिका प्रभावीपणे मांडणे ही जबाबदारी या अनुभवी नेत्यांवर राहणार आहे. भाजपकडून अर्चनाताई पाटील, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून कांचनमाला सांगवे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाकडून महेंद्र धुरगूडे तसेच अपक्ष धनंजय सावंत हे अनुभवी सदस्य म्हणून पुढे येत आहेत. अध्यक्ष, उपाध्यक्ष निवड, विषय समित्यांची रचना आणि धोरणात्मक निर्णयांमध्ये त्यांचा प्रभाव निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. विशेषतः तब्बल ५० नवख्या सदस्यांसाठी हे नेते मार्गदर्शकाची भूमिका बजावतील. यापूर्वी जि.प. सदस्य म्हणून केलेलं काम आणि अनुभव, प्रशासनाची जाण आणि राजकीय समन्वय याच्या बळावर जिल्हा परिषदेत स्थैर्य व कार्यक्षमतेचा समतोल राखण्यात त्यांचे योगदान मोलाचे ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### तुळजापूरात सर्व नव्या चेहऱ्यांना संधी, अनुभवी नेत्यांना मतदारांनी नाकारले

तुळजापूर तालुक्यात पार पडलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत मतदारांनी प्रस्थापित राजकारणाला धक्का देत परिवर्तनाचा स्पष्ट कौल दिला आहे. अनेक वर्षे राजकारणात सक्रिय असलेल्या, प्रभावशाली आणि अनुभवी नेत्यांना मतदारांनी नाकारत नव्या चेहऱ्यांवर विश्वास टाकला आहे. या निवडणुकीत विविध पक्षांतर्फे प्रथमच जिल्हा परिषदेत निवडून गेलेल्या उमेदवारांनी लक्षवेधी यश संपादन केले आहे. भाजपातर्फे काटी गटातून अशा भाले, सिंदफळ गटातून शितल ढाले, काक्रंबा गटातून दयानंद शिंदे, नंदगाव गटातून सिद्धेश्वर कोरे आणि काटगाव गटातून निवृत्ती माळी यांनी विजय मिळवत जिल्हा परिषदेत पहिल्यांदाच प्रवेश केला आहे. शिवसेना (शिंदे गट) तर्फे शहापूर गटातून सुनील बनसोडे यांनी बाजी मारली असून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तर्फे अणदूर गटातून डॉ. जितेंद्र कानडे, काँग्रेसतर्फे प्रतीक्षा सुरवसे यांनी विजय मिळवून जिल्हा परिषदेत नव्याने स्थान मिळवले, तर समाजवादी पक्षातर्फे मंगरूळ गटातून सीमा माडजे या सर्वांनी जनतेच्या पाठिंब्याने यश संपादन केले आहे. या निवडणुकीच्या निकालातून तुळजापूर तालुक्यातील मतदार विकास, पारदर्शकता आणि नव्या नेतृत्वाला संधी देण्याच्या भूमिकेत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### जिल्ह्यात समाजवादी पक्षाची एन्ट्री...
### सीमा माडजे आणि कृष्णा रोचकरी सख्खे बहीण-भाऊ



धाराशिव जिल्हा परिषदेत समाजवादी पक्षाने पहिल्यांदा आपले पाय रुजवले आहेत. तुळजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद मंगरूळ गटातून सीमा माडजे आणि आरळी बुद्रुक पंचायत समिती गणातून कृष्णा रोचकरी यांनी यश मिळवले आहे. योगायोग असा की, सीमा माडजे आणि कृष्णा रोचकरी ही सख्खी बहीण-भाऊ असून दोघेही तुळजापूर तालुक्याचे माजी नगराध्यक्ष देवानंद रोचकरी यांचे मुले आहेत, ज्यामुळे समाजवादी पक्षाची एन्ट्री स्थानिक राजकारणात केवळ नवीन नाही, तर रोचकरी कुटुंबीय नेतृत्वाच्या अनुभवासह ठळक आहे. ही एन्ट्री स्थानिक राजकारणात मोठ्या बदलाची शक्यता दर्शवते.

### सेम नावाचा योगायोग...



धाराशिव जिल्हा परिषदेत यंदा एक वेगळाच योगायोग पाहायला मिळाला आहे. एकाच नावाचे दोन सदस्य, तेही एकाच पक्षाचे, जिल्हा परिषदेत निवडून आले आहेत. भारतीय जनता पक्षाकडून दयानंद शिंदे नावाचे दोन उमेदवार विजयी झाले आहेत. यामध्ये एक धाराशिव तालुक्यातील पाडोळी गटातून दयानंद शिंदे निवडून आले असून तुळजापूर तालुक्यातील काक्रंबा गटातून दयानंद शिंदे यांनीही विजय मिळवला आहे. एकाच नावाचे, एकाच पक्षाचे आणि वेगवेगळ्या तालुक्यांतून निवडून आलेले हे दोन्ही सदस्य सध्या चर्चेचा विषय ठरत आहेत. जिल्हा परिषद सभागृहात नावांमुळे गोंधळ होऊ नये म्हणून ओळख वेगळी ठेवण्याची गरज भासणार का ? हा योगायोग राजकीय वर्तुळात कुतूहलाचा विषय ठरला आहे.

### प्रथमच जिल्हा परिषदेत कमळ फुलले

धाराशिव जिल्ह्यात भाजपासाठी ऐतिहासिक विजयाची नोंद झाली आहे. आ. राणाजगजितसिंह पाटील, मा.आ. सुजितसिंग ठाकूर आणि जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालील मोहीमेअंतर्गत कमळ चिन्हावर प्रथमच १९ जि.प. सदस्य निवडून आले आहेत. या यशामुळे नगरपालिकेनंतर भाजपाचे जिल्ह्यातील स्थान बळकट झाले असून, आगामी काळात जिल्ह्यातील विकास आणि कामकाजावर या विजयाचा सकारात्मक प्रभाव पडण्याची शक्यता आहे.

## दहावी-बारावीच्या तोंडावर शिक्षक समायोजनाला विरोध

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० फेब्रुवारी -**

शिक्षण संचालकांनी सन २०२५-२६ च्या संचमान्यतेनुसार अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांचे जिल्हास्तरीय समायोजन दि. ३ मार्चपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र ऐन दहावी-बारावी बोर्ड परीक्षांच्या तोंडावर हे समायोजन झाल्यास परीक्षा केंद्रांचे नियोजन विस्कळीत होण्याची शक्यता असल्याने सदर समायोजन प्रक्रिया चालू शैक्षणिक सत्र संपल्यानंतर करावी, अशी आग्रही मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने शिक्षणमंत्र्यांकडे करण्यात आली आहे.

यासंदर्भात मंगळवारी (ता. १०) महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेतर्फे माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, दि. ४ फेब्रुवारी रोजी शिक्षण संचालकांनी परिपत्रक काढून सन २०२५-२६ च्या संचमान्यतेनुसार अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांची यादी दि. १३ फेब्रुवारी रोजी जाहीर करून दि. ३ मार्चपर्यंत जिल्हास्तरीय समायोजन पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. याच कालावधीत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये राज्य परीक्षा मंडळामार्फत दहावी व बारावीच्या परीक्षा होणार आहेत.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये परीक्षा केंद्रांचे नियोजन पूर्ण झाले असून केंद्र संचालक, पर्यवेक्षक, परीक्षक, परीरक्षक, नियामक व मुख्य नियामक निश्चित करण्यात आले आहेत. अशा परिस्थितीत समायोजन केल्यास परीक्षा घेणे व नियंत्रित करणे अत्यंत कठीण होणार असून संपूर्ण प्रक्रिया विस्कळीत होण्याची शक्यता आहे. तसेच अतिरिक्तसह सर्व शिक्षकांना बोर्ड परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन (व्हॅल्युएटर व मॉडरेटर) आदेशही प्राप्त झालेले आहेत.

> **अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन सत्रअखेर करावे - महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेची मागणी**

सन २०२५-२६ च्या संचमान्यतेत सिंधुदुर्ग जिल्ह्यासह अनेक जिल्ह्यांत शून्य शिक्षकी शाळा दाखविण्यात आल्या आहेत. तसेच दि. १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयात अशैक्षणिक व जाचक निकष लावण्यात आल्याने यावर्षी मोठ्या प्रमाणावर शिक्षक व कर्मचारी अतिरिक्त ठरण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत अनुदानित व अंशतः अनुदानित शिक्षकांचे समायोजन केल्यास शिक्षकांना मुद्दाम त्रास दिल्यासारखी स्थिती निर्माण होऊन शिक्षक समुदायात असंतोष व क्षोभ वाढेल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. याशिवाय पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर तसेच द्वितीय सत्र परीक्षांवरही याचा परिणाम होणार आहे. काही शाळांच्या सन २०२५-२६ च्या संचमान्यता अद्याप जनरेट झालेल्या नाहीत. अनेक शाळांनी संचमान्यतेचे प्रस्ताव शिक्षण निरीक्षक व शिक्षण उपसंचालक कार्यालयात सादर करूनही दुरुस्ती करण्यात आलेली नाही. तसेच अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांच्या वेतनाचा गंभीर प्रश्न निर्माण होणार असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. सध्या शाळांमध्ये विज्ञान विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षा, भाषांच्या तोंडी परीक्षा तसेच तांत्रिक विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा सुरू आहेत. त्यामुळे अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनास तात्काळ स्थगिती द्यावी व शैक्षणिक सत्र संपल्यानंतर सुधारित वेळापत्रक जाहीर करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनावर राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी, रमेश गटकळ, सुनील काळे, शरद करडे, किरण गरड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय तात्काळ रद्द करा : उमाकांत कुलकर्णी



**दि. १५ मार्च २०२४ च्या संचमान्यतेच्या शासन निर्णयात अशैक्षणिक व जाचक निकष लावण्यात आल्याने सन २०२५-२६ च्या संचमान्यतेनुसार राज्यातील सुमारे ६२० मराठी शाळा बंद पडणार असून १५ हजारांहून अधिक शिक्षक अतिरिक्त ठरण्याची शक्यता आहे.**

**त्यामुळे शिक्षक समायोजन प्रक्रियेस तात्काळ स्थगिती देऊन हा शासन निर्णय रद्द करावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी केली आहे.**


## नगर परिषद कार्यालय, तुळजापूर

जि. धाराशिव-४१३६०१
E-mail - tuljapurmcgmail.com

जा.क्र./नपतू/२०२६/२६९ दि.१०/०२/२०२६

### जाहीर निविदा प्रसिद्धीकरण

याद्वारे सर्व सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदार यांना कळविण्यात येते की, नगर परिषद तुळजापूर कार्यालयामार्फत ऑफलाईन खालील कामाची पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. तरी इच्छुकांनी आपली निविदा खालील दिलेल्या कालावधीत कार्यालयात सादर करावीत.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची दरपत्रक रक्कम (रु.) अंदाजे | बयाणा अनामत रक्कम (रु.) (१% प्रमाणे) | कोरी निविदा फिस फिस (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | नगर परिषद कार्यालय तुळजापूर येथील नगराध्यक्ष यांच्या कक्षा करिता फर्निचर पुरवठा करणे. | रु. ५८,४२७/- | रु. ५८५/- | रु. २१८/- |
| २ | नगर परिषद कार्यालय तुळजापूर येथील नगराध्यक्ष यांचे कक्षाची दुरुस्ती करणे. | रु.१४६४५१/- | रु.१४६४/- | रु.२१८/- |

उपरोक्त निविदा बाबतची ऑफलाईन फॉर्म विक्री, स्वीकृती व निविदा उघडण्याच्या वेळा खालील प्रमाणे राहतील.

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा फॉर्म उपलब्ध तारीख | दि. ११/०२/२०२६ ते दि. १७/०२/२०२६ |
| २ | निविदा स्वीकृती तारीख | दि.११/०२/२०२६ ते दि.१७/०२/२०२६ रोजी सायं ०६.०० वाजे पर्यंत |
| ३<br>२ | निविदा उघडण्याची तारीख | दि. १४/०२/२०२६ रोजी स ११.०० वा पर्यंत (शक्य झाल्यास) |

**अटी व शर्ती :-**
- ✻ निविदा विक्री व स्वीकृतीची संपूर्ण कार्यवाही वरील कालावधीत या कार्यालयात उपलब्ध असेल तरी सर्व इच्छुक ठेकेदारांनी वरील कालावधीत आपली निविदा ऑफलाईन पद्धतीने सादर करावीत.
- ✻ निविदा अनामत रक्कम आणि कोऱ्या निविदा रक्कम ही या कार्यालयात रोख रक्कम भरणा करावी.
- ✻ वरील निविदा सुचनेमध्ये बदल करणे, त्यात सुधारणा करणे, निविदेच्या शर्ती आणि अटीमध्ये बदल करणे किंवा एक अथवा अनेक निविदा काही कारण न देता रद्द करण्याचे व प्रलंबित ठेवण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

स्वाक्षरित/-
**(अजिंक्य रणदिवे)**
मुख्याधिकारी,
नगर परिषद तुळजापूर


## तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समितीच्या संघर्ष योद्ध्यांना महात्मा फुले महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार जाहीर



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१० फेब्रुवारी -**

सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या रेल्वे मार्गासाठी तब्बल पंचवीस वर्षे संघर्ष केलेल्या तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समितीच्या तुळजापूर येथील संघर्ष योद्ध्यांना महात्मा फुले महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

हा पुरस्कार अनाथ सेवक सामाजिक कल्याण संस्था, महाराष्ट्र राज्य, अहिल्यानगर यांच्या वतीने देण्यात येणार आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी अहिल्यानगर येथील हॉटेल गोल्ड रोज येथे होणार असून, अहिल्यानगरचे उपमहापौर धनंजय जाधव यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

या सोहळ्यात तुळजाभवानी रेल्वे संघर्ष समितीचे अध्यक्ष बबनराव गावडे, विकासराव तांबे, राऊत शेख, रत्नाकर खोले, अशोकराव साळुंखे, अंबादासराव पोपळे, सतीश पवार, मोहन भोसले, कोंडीबा प्रताप, अनिल हंगरगेकर, खय्युम शेख, राहुल मलकुनाईक गवळी, गोविंद दिवटे, तानाजी पाटील, अनमोल साळुंखे आणि दयानंद पांचाळ यांचा गौरव करण्यात येणार आहे.

सोलापूर-तुळजापूर-धाराशिव रेल्वे मार्गासाठी गेल्या पंचवीस वर्षांपासून अविरत संघर्ष करून जनआंदोलन उभे करणाऱ्या या संघर्ष योद्ध्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आल्याचे संस्थेचे अध्यक्ष तुषार अर्जुन बारुडे (अहिल्यानगर) यांनी पत्राद्वारे कळविले आहे.

रेल्वे मार्गाच्या मागणीसाठी सातत्याने लढा देणाऱ्या संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांचा हा सन्मान तुळजापूर तालुक्यासह संपूर्ण परिसरासाठी अभिमानास्पद असल्याची भावना व्यक्त होत आहे.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## अर्जुन पाचंगेचा कर्नल संतोष नवगण यांच्या हस्ते सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१० फेब्रुवारी -**

भारत शिक्षण संस्था संचलित श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथील एनसीसी कॅडेट अर्जुन पाचंगे याची 'संबळ' या कला प्रकारामध्ये २६ जानेवारी रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या गणतंत्र दिन परेडसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.



यासोबतच सांस्कृतिक वादन व गीत या प्रकारात आंतरराष्ट्रीय स्तरावरील YEP साठी भारताच्या संघातही त्याची निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, लातूरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल संतोष नवगण, कर्नल वाय. बी. सिंग तसेच कॅप्टन डॉ. ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांच्या हस्ते अर्जुन पाचंगे याचा सत्कार करण्यात आला.

या सत्कार समारंभाला डम ऑफिसर कर्नल वाय.बी. सिंग, कॅप्टन डॉ. ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले, बाजीराव पाटील, संजय चिकने, आर्मी स्टाफ व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...



### नूतन जिल्हा परिषद सदस्य विकी चव्हाण यांचा ग्रामस्थांकडून सत्कार

**वाशी, दि.१० फेब्रुवारी -**

वाशी तालुक्यातील पारडी ग्रामस्थांच्या वतीने नूतन जिल्हा परिषद सदस्य संदेश उर्फ विकी चव्हाण यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. तेरखेडा जिल्हा परिषद गट हा धाराशिव जिल्ह्यातील राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा व सर्वांचे लक्ष वेधून घेणारा गट मानला जातो. या गटात राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यात थेट अटीतटीची लढत झाली होती. दिग्गज उमेदवारांच्या विरोधात सामान्य घरातून पुढे आलेले पैलवान विकी चव्हाण यांनी मैदानात उतरून जनतेचा विश्वास संपादन केला. या चुरशीच्या आणि प्रतिष्ठेच्या लढतीत शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार विकी चव्हाण यांनी दणदणीत विजय मिळवला. या ऐतिहासिक विजयानंतर पारडी व परिसरातील ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी केशव सावंत, सुनील जाधवर, उमेश चौधरी, रेवन चौधरी, विजय कागदे, विठ्ठल चौधरी, उद्धव साळवी, सत्यवान गपाट, बालाजी नकाते, अतुल चौधरी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

### भाऊसाहेब खरसडे यांची कोकरवाडी येथील जिल्हा परिषद शाळेस धावती भेट

**परंडा, दि.१० फेब्रुवारी -**

नूतन डोजा जिल्हा परिषद गटातील नवनिर्वाचित विजयी उमेदवार भाऊसाहेब खरसडे यांनी निवडून येताच कामास सुरुवात केली असून कोकरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भेट देऊन शाळेतील विद्यार्थी व गुरु जनास संवाद साधून प्राथमिक शाळेच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. त्यावेळेस कुकरवाडी येथील ग्रामस्थ मोहन टिकोरे, कुंडलिक माने, शहाजी कदम, बाजीराव कदम, गजेंद्र कदम, प्रभाकर माळी, बाजीराव दुरुंडे, रमेश दुरुंडे, माणिक खरसडे इतर मान्यवर उपस्थित होते.

### श्रीकांतराव कुलकर्णी यांचे निधन

**धाराशिव, दि.१० फेब्रुवारी -**



धाराशिव शहरातील जुन्या पिढीतील ज्येष्ठ माजी नगरसेवक श्रीकांत अनंतराव कुलकर्णी अंबेजवळगेकर यांचे वयाच्या ९३ व्या वर्षी राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. धाराशिव नगरपालिकेला ते १९६७ आणि १९७४ असे दोन वेळा काँग्रेसच्या तिकिटावर नगरसेवक म्हणून विजयी झाले होते. उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे संचालक म्हणूनही ते काही काळ कार्यरत होते. ते आंबेजवळगा येथील मोसंबी फळबाग शेतकरी म्हणून प्रसिद्ध होते. आंबेजवळग्याच्या विकासासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, जावई, नातू, पणतू, पणती असा परिवार आहे. जिल्हा सहाय्यक सरकारी वकील ॲड. आशिष कुलकर्णी यांचे ते वडील होत.

### ईलाई पठाण यांचे निधन

**मंगरूळ, दि.१० फेब्रुवारी -**



तुळजापुर तालुक्यातील देवसिंगा नळ येथील रहिवाशी ईलाई पठाण यांचे सोमवार ९ फेब्रुवारी रोजी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. परिसरातील प्रगतिशील शेतकरी म्हणुन त्यांची ओळख होती. त्यांच्यावर देवसिंगा नळ येथील कब्रस्थान येथे सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. शिवसेनेचे धाराशिव संघटक राजअहमद पठाण यांचे ते चुलते व सामाजिक कार्यकर्ते मुनाफ पठाण यांचे ते वडील होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे.

### अरुण अमृतराव (कदम) यांचे निधन

**तुळजापूर, दि.१० फेब्रुवारी -**



तुळजाभवानी मातेचे पुजारी अरूण श्रीमंतराव अमृतराव-कदम (वय ७०) यांचे सोमवार (दि.९) रात्री सोलापूर येथील खाजगी दवाखान्यात उपचारा दरम्यान निधन झाले. त्यांचा पार्थिवावर मंगळवार (दि. १०) दुपारी तुळजापूर खुर्द येथील अमृतराव (कदम) परीवाराचा पारंपारिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ धाराशिव उपकेंद्रातील व्यवस्थापनशास्त्र विभागाचे संचालक डॉ. सुयोग अमृतराव यांचे ते वडील होते.

### मागील वादातून महिलेला मारहाण

**धाराशिव, दि.१० फेब्रुवारी -**

मागील भांडणाच्या कारणावरून चौघा आरोपींनी एका महिलेवर शिवीगाळ व मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत उषाबाई शहाजी जायभाय (वय ३५) यांनी फिर्याद दिली आहे. दि.२५ जानेवारी रोजी रात्रीच्या सुमारास आरोपी संतोष अर्जुन मुंढे, लक्ष्मण अर्जुन मुंढे व धनंजय रावसाहेब घोळवे (रा. सोनारवाडी ता. वाशी) यांनी फिर्यादीस शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी, लोखंडी रॉड व काठीने मारहाण करून जखमी केले तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

# धाराशिव जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी राजकीय हालचालींना वेग


**▶▶ शिंदे गटाच्या यशानंतर सत्तास्थापनेच्या शक्यतांवर चर्चा... ▶▶ बहुमतासाठी गणिते जुळवण्याची धावपळ....**

**सुधीर घोलप**
**वाशी, दि.१० फेब्रुवारी -**

धाराशिव जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचा निकाल जाहीर झाल्यानंतर जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून सत्तास्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. परंडा विधानसभा मतदारसंघात शिवसेना (शिंदे गट) यांना मिळालेल्या यशामुळे जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडीबाबत विविध शक्यतांवर राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

या निवडणुकीत भाजपला १९, शिवसेना (शिंदे गट) १५, शिवसेना (ठाकरे गट) ७, राष्ट्रवादी काँग्रेस ६, काँग्रेस ३, अपक्ष ४ तर समाजवादी पक्षाला १ जागा मिळाली आहे.

या संख्याबळावरून एकाही पक्षाला स्वबळावर स्पष्ट बहुमत मिळालेले नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे सत्तास्थापनेसाठी युती व आघाडीचे पर्याय तपासले जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली.




निवडणूक प्रचारादरम्यान माजी आमदार राहुल मोटे आणि विद्यमान आमदार तथा माजी मंत्री तानाजी सावंत यांच्यातील राजकीय आरोप-प्रत्यारोप व सभांमधील वक्तव्ये विशेष चर्चेत होती. प्रचाराच्या काळात एकमेकांवर जोरदार टीका करण्यात आली होती. दरम्यान, वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे झालेल्या जाहीर सभेत आमदार तानाजी सावंत यांनी, काहीही झाले तरी चालेल, पण जिल्हा परिषद अध्यक्ष हा शिवसेनेचाच बसल्याशिवाय मी गप्प बसणार नाही, असे ठाम वक्तव्य केले होते.

निवडणूक निकालानंतर या वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर सत्तास्थापनेच्या हालचालींना अधिक वेग आला आहे.

राजकीय सूत्रांच्या माहितीनुसार शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (ठाकरे गट), काँग्रेस, अपक्ष तसेच इतर घटकांच्या संख्याबळातून सत्तास्थापनेचा पर्याय विचाराधीन आहे. मात्र याबाबत अद्याप कोणताही अधिकृत निर्णय जाहीर झालेला नाही.

पडद्याआड सुरू असलेल्या राजकीय हालचाली लवकरच उघड होतील, असा अंदाज व्यक्त केला जात असून या संपूर्ण प्रक्रियेत आमदार तानाजी सावंत यांची भूमिका निर्णायक ठरू शकते, असे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. आगामी काळात कोणते पक्ष किंवा घटक एकत्र येतात आणि जिल्हा परिषद अध्यक्षपदाबाबत कोणता निर्णय घेतला जातो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.




## जळकोट गणात भाजपचे ॲड. आशिष सोनटक्के यांचा दणदणीत विजय

**विरोधकांना चारीमुंड्या चित; गणेश सोनटक्के यांचे वर्चस्व पुन्हा सिद्ध**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१० फेब्रुवारी -**



पंचायत समितीच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत जळकोट गणातून भाजपचे उमेदवार ॲड. आशिष सोनटक्के यांनी दणदणीत विजय मिळवत विरोधकांना चारीमुंड्या चित केले. त्यांनी काँग्रेसचे उमेदवार मोहन चव्हाण यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला.

जळकोट जिल्हा परिषद गट आणि गण या दोन्हीवर गेल्या अनेक वर्षांपासून माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश सोनटक्के यांचे निर्विवाद वर्चस्व राहिले आहे. सामाजिक कार्याच्या जोरावर त्यांनी जळकोट गट व गणात आपली मजबूत पकड निर्माण केली आहे.

मागील जिल्हा परिषद निवडणुकीत जळकोट गटातून त्यांचा निसटता पराभव झाला असला, तरी पराभवानंतरही गणेश सोनटक्के आणि त्यांचे पुत्र ॲड. आशिष सोनटक्के यांनी सामाजिक कार्य अखंड सुरू ठेवले.

नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत गणेश सोनटक्के यांनी जळकोट गटातून उमेदवारीची मागणी केली होती. मात्र भाजपने पंचायत समितीसाठी जळकोट गणातून त्यांचे चिरंजीव ॲड. आशिष सोनटक्के यांना उमेदवारी दिली. आमदार राणा जगजितसिंह पाटील, भाजपचे नेते सुनील चव्हाण तसेच युवा नेते मल्हार पाटील यांच्या नेतृत्वाखाली ॲड. आशिष सोनटक्के यांनी शिस्तबद्ध आणि प्रभावी प्रचार केला.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केलेली विकासकामे, गणेश सोनटक्के यांचे दीर्घकालीन सामाजिक कार्य आणि संघटित प्रचार याचा फायदा ॲड. आशिष सोनटक्के यांना झाला. परिणामी ते जळकोट गणातून मोठ्या मताधिक्याने विजयी झाले.

ॲड. आशिष सोनटक्के यांच्या विजयामुळे जळकोटवर पुन्हा एकदा गणेश सोनटक्के यांचेच निर्विवाद वर्चस्व असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## नगराध्यक्षाच्या वतीने बारावीच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१० फेब्रुवारी -**

बारावी बोर्डाच्या परीक्षेस दहा फेब्रुवारीपासून प्रारंभ झाला असून नगरीचे नगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी आणि प्रक्षाळ मंडळाचे अध्यक्ष विशाल रोचकरी यांच्या वतीने श्री तुळजाभवानी महाविद्यालय येथे बारावी HSC बोर्डाच्या पेपर साठी विद्यार्थी व विद्यार्थीनी यांना पेन व गुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी नगरसेवक रत्नदीप भोसले, अमरजीत बागल, दुर्गेश साळुंके, जितू आडेकर, हारी खुरुद,जीवन माने, सौदागर मोटे व सर्व शिक्षक मंडळी उपस्थित होते.

## स्वआधार बालगृहाच्या दिव्यांग मुलींची राज्य व राष्ट्रीय पातळीवर घवघवीत कामगिरी




**२ सुवर्ण, ४ रौप्य, ३ कांस्य पदके; राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचा नावलौकिक**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० फेब्रुवारी -**

स्पेशल ऑलिम्पिक्स भारत, महाराष्ट्र यांच्या विद्यमाने महाराष्ट्रातील विशेष शाळांमधील दिव्यांग खेळाडूंसाठी राज्यस्तरीय ॲथलेटिक्स क्रीडा स्पर्धेचे आयोजन दि. १० व ११ जानेवारी २०२६ रोजी कवीकुलगुरू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स, रामटेक (नागपूर) येथे करण्यात आले होते.

या राज्यस्तरीय स्पर्धेत तुळजाई प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था, पानगाव संचलित स्वआधार मतिमंद मुलींचे बालगृह व संलग्न शाळा, विमानतळ रोड, आळणी, ता. जि. धाराशिव येथील एकूण सहा मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या स्पर्धेत स्वआधार बालगृहातील मुलींनी उत्कृष्ट कामगिरी करत २ सुवर्ण, ४ रौप्य व ३ कांस्य अशी एकूण ९ पदके पटकावून घवघवीत यश संपादन केले. या यशामुळे संस्थेचे नाव राज्यपातळीवर उज्वल झाले.

या उल्लेखनीय राज्यस्तरीय कामगिरीच्या जोरावर सुवर्णपदक विजेत्या मुलींची राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली. त्यानुसार दि. ३ ते ७ फेब्रुवारी २०२६ दरम्यान हरियाणा राज्यातील रोहतक येथे दयानंद महर्षी विद्यापीठाच्या मैदानावर पार पडलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत स्वआधार बालगृहातील मुलींनी महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व केले.

या राष्ट्रीय स्पर्धेत देशातील २७ राज्यांमधील सुमारे ५०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेतही स्वआधार बालगृहातील मुलींनी आपली गुणवत्ता सिद्ध करत उल्लेखनीय यश संपादन केले. रुपाली हिने स्पॉट जंप या क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला, तर पुनम सुरेश पवार हिने लांब उडी या प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून महाराष्ट्र राज्याचा नावलौकिक वाढवला.

या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र राज्याच्या संघाने एकूण ३० पदकांची कमाई केली. तुळजाई प्रतिष्ठानचे सचिव शहाजी चव्हाण यांनी संस्थेच्या वतीने समाधान व्यक्त करत खेळाडू व मार्गदर्शकांचे कौतुक केले. मुख्याध्यापक गुरुनाथ थोडसरे यांनीही यशस्वी खेळाडूंना प्रोत्साहन दिले. या यशामागे क्रीडा शिक्षक नीला पवार व वैशाली पोपळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

राज्यस्तरावर मिळवलेल्या यशातून राष्ट्रीय पातळीपर्यंत झेप घेणाऱ्या स्वआधार बालगृहातील मतिमंद मुलींची ही कामगिरी जिद्द, मेहनत, आत्मविश्वास व योग्य मार्गदर्शनाचे उत्तम प्रतीक असून ही यशोगाथा संस्था, धाराशिव जिल्हा व महाराष्ट्र राज्यासाठी अभिमानास्पद ठरत आहे.

## नळदुर्गात मोफत गहू-तांदळाची मोठ्या प्रमाणात तस्करी

**▶▶ वैराग-सोलापूरच्या मुख्य तस्करांचा सहभाग; दलाल व अधिकारी संगनमताने गरीबांच्या धान्यावर डल्ला**

**विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.१० फेब्रुवारी -**

गरीब नागरिकांना मोफत देण्यात येणाऱ्या गहू व तांदळाची नळदुर्ग शहर व परिसरात मोठ्या प्रमाणात तस्करी सुरू असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या तस्करीत वैराग व सोलापूर येथील मुख्य तस्करांचा सहभाग असून, नळदुर्ग परिसरातील दलालांना हाताशी धरून स्वस्त धान्य दुकान व विविध शासकीय योजनांतर्गत दिल्या जाणाऱ्या गहू-तांदळावर डल्ला मारला जात असल्याचे उघड झाले आहे.

या संपूर्ण तस्करीला प्रशासनातील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांची मूक साथ असल्याचेही बोलले जात आहे. त्याचबरोबर नळदुर्ग येथील एका 'साहेबांचा' वसुलदार या संपूर्ण तस्करीचा सूत्रधार असल्याची जोरदार चर्चा असून, सध्या नळदुर्ग हे गहू-तांदूळ तस्करीचे मुख्य केंद्र बनल्याचे चित्र आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत देशातील गरीब नागरिकांना स्वस्त धान्य दुकानांतून मोफत धान्य देण्याचा कल्याणकारी उपक्रम सुरू केला आहे. देशातील एकही गरीब व्यक्ती उपाशी राहू नये,




हाच या योजनेचा मुख्य उद्देश आहे. मात्र काही असामाजिक घटक या योजनेचा गैरफायदा घेत गरीबांच्या तोंडचा घास पळवत असल्याचे वास्तव समोर येत आहे.

सध्या स्वस्त धान्य दुकानांतून देण्यात येणाऱ्या मोफत गहू व तांदळाची मोठ्या प्रमाणात काळ्या बाजारात तस्करी सुरू आहे. नळदुर्ग शहर व परिसरातून दररोज मोठ्या प्रमाणात गहू व तांदूळ बाहेर पाठवले जात आहेत.

नियमांनुसार काळ्या बाजारात जात असलेले धान्य पकडले गेल्यास त्या गाडीतील गहू-तांदळाची फोर्टिफाईड फूड लॅब टेस्टिंग करणे बंधनकारक आहे. मात्र संबंधित अधिकारी व कर्मचारी तोडपाणी करून ही चाचणी न करताच गाड्या सोडून देत असल्याचे प्रकार घडत आहेत.

फोर्टिफाईड फूड लॅब टेस्टिंगमध्ये अन्नातील लोह, फॉलिक ॲसिड, जीवनसत्त्वे, D, B १२, आयोडीन, झिंक आदी सूक्ष्म पोषक घटक योग्य प्रमाणात आहेत की नाही, याची तपासणी केली जाते.

ही चाचणी अन्न सुरक्षा व दर्जा नियमावली (FSSI) नुसार अत्यंत महत्त्वाची असतानाही ती मुद्दाम टाळली जात आहे. तसेच ई-वे बिल तपासून हे धान्य कुठून आले व कुठे जात आहे, याची खात्री करणे आवश्यक असताना त्याकडेही दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे धान्य तस्कर बेधडक झाले असून खुलेआम गरीबांच्या धान्यावर डल्ला मारत आहेत.

प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना, अंत्योदय योजना, प्रधान कुटुंब योजना तसेच शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या गहू-तांदळाची काही स्वस्त धान्य दुकानदारांच्या संगनमताने पिशव्यांची अदलाबदल करून शेकडो टन धान्य वैराग व सोलापूर येथील मुख्य तस्करांपर्यंत पोहोचवले जात आहे. नळदुर्ग शहर व परिसरातील गावांतून तसेच कर्नाटक राज्यातून गहू-तांदूळ अक्कलकोट-नळदुर्ग मार्गे सोलापूर व वैरागकडे नेला जात असल्याची माहिती आहे.

या गंभीर प्रकरणाची जिल्हा प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावी. स्वस्त धान्य दुकानांतून तसेच विविध योजनांतर्गत गरीबांना दिल्या जाणाऱ्या मोफत धान्याची तस्करी करणाऱ्या मुख्य तस्करांसह नळदुर्ग शहर व परिसरातील दलालांवर कठोर कारवाई करावी.

तसेच या तस्करीला साथ देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवरही कारवाई करून गहू व तांदळाच्या तस्करीला आळा घालावा, अशी जोरदार मागणी नागरिकांमधून होत आहे.

## सचिवपदी कफील सय्यद यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० फेब्रुवारी -**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या एनएसयुआय विद्यार्थी काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी कफील सय्यद यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीचे पत्र प्रदेशाध्यक्ष सागर साळुंखे यांनी समाजमाध्यमावर जाहीर करत दूरध्वनीद्वारे त्यांचे अभिनंदन केले.

या नियुक्तीबद्दल प्रदेशाध्यक्ष सागर साळुंखे, प्रदेश प्रभारी अक्षय यादव, दुसरे प्रभारी कांता ग्वाला, प्रदेश उपाध्यक्ष डॉ. शादाब रहेमान शेख यांच्यासह काँग्रेसच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## दुधी येथे वृद्ध दाम्पत्यावर अज्ञातांनी प्राणघातक हल्ला

**काठी, प्लास्टिक पाईप व उसाने मारहाण; परंडा पोलीसात गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० फेब्रुवारी -**

तालुक्यातील दुधी येथील लिमकर वस्ती परिसरात अज्ञात इसमांनी वृद्ध दाम्पत्यावर हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी परंडा पोलीस ठाण्यात अज्ञात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची फिर्याद वसंत ज्ञानदेव लिमकर (वय ८०, रा. लिमकर वस्ती, दुधी ता. परंडा जि. धाराशिव) यांनी दिली आहे. फिर्यादीनुसार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे २.०० ते ३.०० वाजण्याच्या सुमारास दुधी येथील शेत गट क्रमांक ३६ मधील घराच्या दरवाजावर अज्ञात दोन इसमांनी ठोठावले. दरवाजा वाजल्याने फिर्यादी वसंत लिमकर बाहेर गेले असता, त्या अज्ञात इसमांनी काठीने मारहाण करून त्यांना जखमी केले.

फिर्यादीचा आवाज ऐकून त्यांची पत्नी मंगल लिमकर बाहेर आली असता, त्या महिलेलाही सदर इसमांनी प्लास्टिक पाईप व उसाने मारहाण करून गंभीर जखमी केले. हल्ल्यानंतर अज्ञात इसम घटनास्थळावरून फरार झाले.

या प्रकरणी फिर्यादी वसंत लिमकर यांनी दि.९ फेब्रुवारी २०२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत पुढील तपास परंडा पोलीस करत आहेत.